डिसेंबर २०१८/पाने ६०/किंमत ₹१०

# लोकराज्य



## क्रांतिसूर्याला विनम्र अभिवादन!



# महालाभार्थी

महा लाभार्थी

## ३०० हून अधिक शासकीय योजनांपैकी तुम्ही कोणत्या योजनांना पात्र ठरू शकता याची आजच व्यक्तिअनुरूप पद्धतीने माहिती करून घ्या.

मुख्यमंत्री कार्यालय, महाराष्ट्र राज्य व एमकेसीएल यांचा संयुक्त उपक्रम

## काय आहे महालाभार्थी?

नागरिकांना लागू होणाऱ्या विविध शासकीय योजनांची माहिती व्यक्तिअनुरूप स्वरूपात पोहोचविण्यासाठी 'महालाभार्थी' वेबपोर्टलची निर्मिती झालेली आहे. महाराष्ट्र शासनाचे मुख्यमंत्री कार्यालय व महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (एमकेसीएल) यांनी संयुक्तपणे हे वेबपोर्टल विकसित केले आहे.


नागरिकांना त्यांच्या गरजेनुसार वेबपोर्टलवर विविध योजना पाहता येतात, तसेच आवश्यक ती माहिती भरून सदर योजनांसाठी ते आपली संभाव्य पात्रता पडताळून पाहू शकतात.

माननीय मुख्यमंत्री यांच्या स्वाक्षरीसह नागरिकांना उद्देशून असलेले पत्र या वेबपोर्टलवर मिळते. या पत्रामध्ये संभाव्य पात्र योजनांची नावे, योजनांतर्गत मिळणारे लाभ, त्यासोबत जोडावयाची कागदपत्रे आणि लाभासाठी कोणाला संपर्क करावा इत्यादी माहिती दिलेली आहे.

योजनांसाठीचे विहित नमुन्यातील अर्ज आणि संबंधित शासकीय निर्णयसुद्धा वेबपोर्टलवरून उपलब्धतेनुसार डाऊनलोड करता येतात.

स्वत:ची 'महालाभार्थी-प्रेरक' म्हणून नोंदणी करून संगणक साक्षर नसलेल्या नागरिकांना आपण 'महालाभार्थी' पोर्टलची सेवा देऊ शकता.

## नागरिकांसाठी प्रक्रियेचे टप्पे




१. मोबाईल क्रमांक वापरून 'महालाभार्थी' पोर्टलवर नोंदणी करा.

२. लॉगीन आईडी आणि पासवर्ड वापरून लॉगीन करा.

३. आपली प्राथमिक माहिती भरा.

४. आपली शैक्षणिक माहिती भरा.

५. आपल्या गरजा निवडा जसे: घर, रोजगार इत्यादी. अथवा भूमिका निवडा जसे: शेतकरी/विद्यार्थी इ.



६. विविध योजनांच्या दर्शवलेल्या लाभांपैकी आपल्या आवडीनुसार योजना निवडा.

७. आपण निवडलेल्या योजनांनुसार, आपली संपूर्ण माहिती भरा.

८. आपली पात्रता तपासण्यासाठी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे द्या.

९. आपल्याला, आपण पात्र असलेल्या योजना, शासन निर्णय (GRs) आणि अर्ज यांची यादी दर्शवली जाईल.

१०. आपण पात्र असलेल्या योजना, आवश्यक असलेली कागदपत्रे आणि संपर्क कार्यालय यांची संपूर्ण माहिती छापील स्वरूपात (प्रिंट-आउट) काढून घ्या.

महाराष्ट्र शासन

**अधिक माहितीसाठी आजच cmo.maharashtra.gov.in या वेबपोर्टलला किंवा नजीकच्या MS-CIT केंद्राला भेट द्या.**

MKCL
॥ ज्ञानदीप लावू जगी ॥
www.mkcl.org

# अंतरंग


## महापरिनिर्वाण दिन विशेष ९–२०



डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे लोकशाहीचे कट्टर समर्थक होते. भारतात लोकशाही दृढमूल व्हावी म्हणून डॉ. आंबेडकरांनी विशेष प्रयत्न केले. त्यांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुभाव आणि न्याय प्रस्थापित करून त्याद्वारे भारतीय लोकशाही मजबूत करण्याचे कार्य केले.

## भूमिका आणि जबाबदारी ६

उत्तराखंडमधील मसुरी येथे असलेल्या लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमी परिसराला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच भेट दिली. प्रशासकीय अधिकारी यांच्या भूमिका आणि जबाबदारी, आपले प्रेरणास्रोत, कृत्रिम बुद्धिमत्तेचा पुढील काळात मोठ्या प्रमाणावर होणारा वापर, प्रशासनापुढील नवीन आव्हाने आदी विषयांवर त्यांनी येथे प्रशिक्षण घेत असलेल्या अधिकाऱ्यांशी संवाद साधला.



शासनाने गेल्या चार वर्षांत जलयुक्त शिवार, मागेल त्याला शेततळे, प्रधानमंत्री आवास योजना, रोजगार व उद्योग निर्मितीसाठी अनेक योजना राबवल्या आहेत. त्यांच्या प्रेरणादायी यशकथा...
**२१–४५**



## पूर्वीपेक्षा अधिक, पूर्वीपेक्षा उत्तम





| | | | |
|---|---|---|---|
| भूमिका आणि जबाबदारी | ६ | रोजगार मिळाला, नैराश्य गेले... | ४० |
| आपले संविधान, आपले सामर्थ्य... | १० | फेटरी : उत्कृष्ट आरोग्यसेवा | ४६ |
| सामाजिक लोकशाही | १२ | सौर ऊर्जेवर 'सिंचन' | ४७ |
| नि:स्वार्थ सेवा... | १५ | करिअरचा 'प्रकाशमार्ग' | ४८ |
| बाबासाहेबांचे पोशाखप्रेम | १८ | आश्रमशाळांचा कायापालट | ५० |
| महापरिनिर्वाण दिन कसा पाळावा... | २० | उपाय आणि दिलासा | ५२ |
| शेत बहरले, समृद्धी आली... | २२ | नोंदी | ५६–५७ |
| शिवारात पाणी, विकासाची ग्वाही.... | ३१ | सांगली सर्वोत्कृष्ट | ५८ |

वर्ष ७० वे | अंक ६ | डिसेंबर २०१८

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- संपादक मंडळ — अजय अंबेकर, शिवाजी मानकर
- संपादक — सुरेश वांदिले
- उपसंपादक — गजानन पाटील, राजाराम देवकर
- प्रशासन — मीनल जोगळेकर
- वितरण — मनीषा पिंगळे, मंगेश वरकड, अश्विनी पुजारी
- साहाय्य — स्वप्नाली जाधव, भारती वाघ
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — उमा नाबर
- मुद्रण — डिलिजंट मीडिया कॉर्पोरेशन लि., महापे, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya.dgipr@maharashtra.gov.in

वर्गणीदार व तक्रार निवारण: ०२२ - २२८१८३१२
Email : lokvitaran.dgipr@maharashtra.gov.in

**ई - लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमतच असेल असे नाही.

# ऊर्जा शक्ती

ऊर्जा विभागामार्फत राबवण्यात येणाऱ्या 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत' उभारण्यात आलेले सौर ऊर्जा प्रकल्प, विद्युत वाहन चार्जिंग स्टेशन्स व शेतकऱ्यांच्या कृषिपंपाला नवीन वीज जोडणी देण्याकरिता उच्चदाब वितरण प्रणाली (एचव्हीडीएस) या तीन अभिनव योजनांचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नुकताच करण्यात आला.

ऊर्जा विभागाचे गेल्या चार वर्षात चांगले कार्य सुरू आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी, सर्वसामान्यांना उपयुक्त असे निर्णय विभागामार्फत घेतले जात आहेत. उद्घाटन झालेल्या तीनही योजना या महत्त्वपूर्ण असून पर्यावरणपूरक अशा आहेत. या सर्व योजनांमुळे येत्या काही दिवसात शेतकरी बांधवांना दिवसा वीज देणे शक्य होईल. मंत्रिमंडळाच्या बैठकीत १ लाख सौर पंपांना मान्यता दिली आहे. शेतकरी केंद्रित अशा या योजना असल्याने त्याचा लाभ शेतकऱ्यांना नक्की होईल, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री या वेळी काढले.

विद्युत वाहन चार्जिंग स्टेशनमुळे पर्यावरणाचा ऱ्हास निश्चितच वाचेल, तसेच इंधनाचा भार कमी होईल. मोटर वाहन निर्मिती करणाऱ्या कंपन्या इलेक्ट्रिकल वाहन तयार करीत आहेत. त्यामुळे विद्युत वाहन चार्जिंग स्टेशनला चांगली मागणी आहे. विद्युत अभियंता, पदविकाधारक तसेच आयटीआयच्या युवकांना ही विद्युत स्टेशन देण्याबाबतचा निर्णय महत्त्वाचा ठरेल. रोजगाराची मोठी संधी यातून मिळेल.




**ऊर्जा विभागाच्या योजनांचा शुभारंभ करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री चंद्रकांत दादा पाटील, ऊर्जा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, अन्न व नागरी पुरवठा मंत्री गिरीश बापट, गृहनिर्माण मंत्री प्रकाश महेता, जलसंपदा मंत्री गिरीष महाजन, उद्योग राज्यमंत्री प्रवीण पोटे-पाटील, सहकार मंत्री सुभाष देशमुख.**

## मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन झाले पाहिजे हा ध्यास घेऊन ऊर्जा विभाग आपल्या योजना राबवत आहे. निती आयोगाने कौतुक केलेली 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना' असून अशा प्रकारची ही देशातील पहिली योजना आहे. जो शेतकरी ही योजना मागेल त्याला दिली जाईल. या योजनेच्या माध्यमातून विद्युत खर्च, विद्युत पुरवणे खर्च यात मोठी बचत होत आहे. विभागाने ५ लाख १८ हजार वीज जोडणी दिली असून उर्वरित दोन अडीच लाख लोकांनादेखील जून २०१९ अखेर जोडण्या दिल्या जातील. आयटीआय, विद्युत पदविकाधारक २३ हजार मुलांना मार्च २०१९ पर्यंत विविध गावांमध्ये ग्राम मॅनेजर म्हणून काम मिळेल. प्रतिविद्युत जोडणी ९ रुपये प्रमाणे त्यांना देखभाल दुरुस्ती खर्च दिला जाईल.

# आर्थिक आणि सामाजिक परिवर्तन



**चंद्रशेखर बावनकुळे**
मंत्री, ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क

शासनाच्या अनेक योजनांचा लाभ घेऊन आर्थिक आणि सामाजिक परिवर्तन घडवून आणलेल्या नागरिकांच्या यशकथा या अंकात आम्ही प्रकाशित केल्या आहेत. या यशकथा इतरांसाठी प्रेरणादायी आहेत. शासनाच्या योजनांचा लाभ घेणे अतिशय सुलभ असते. कागदपत्रांची पूर्तता वेळेवर व योग्यरीत्या केल्यास कर्ज, अनुदान किंवा अर्थसाहाय्य मंजूर होण्यासाठी किंवा मिळण्यासाठी फार कालावधी लागत नाही, ही बाब या सर्व यशकथांमधून दिसून येते. थोडा आत्मविश्वास आणि चांगले काही करण्याची इच्छाशक्ती असल्यास शासकीय योजनांचा लाभ मिळणे अशक्य नाही, ही बाब या यशकथांमधून प्रकर्षाने स्पष्ट होते. योजनांचा लाभ घेतलेल्या व्यक्ती या ग्रामीण भागातील असल्या तरी त्यांनी योजनांची माहिती मिळवून त्यांचा लाभ घेतला आहे. आपल्यापैकी प्रत्येकास या योजनांचा लाभ घेता येणे शक्य असल्याचे या यशकथांनी सिद्ध केले आहे. त्यामुळे अधिकाधिक नागरिक या योजनांचा लाभ घेण्यासाठी उद्युक्त होतील.



गेल्या चार वर्षात राज्य शासनाने अनेक क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती केली आहे. ही प्रगती 'पूर्वीपेक्षा अधिक पूर्वीपेक्षा उत्तम' अशी आहे. या कालावधीत महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलणारे अनेक निर्णय घेण्यात आले. या निर्णयांची अतिशय प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात आली. यामुळे जनसामान्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नवभारताच्या उभारणीचा संकल्प केला आहे. हा संकल्प पूर्णत्वाला नेण्यास महाराष्ट्राचा मोठा हातभार लागणार आहे. त्या अनुषंगानेच महाराष्ट्राची कामगिरी उज्ज्वल अशी झाली आहे.

गेल्या चार वर्षात राज्याच्या ऊर्जा विभागाने अतिशय उत्तम काम केले आहे. राज्यातील अंधार दूर करण्यासाठी अनेक महत्त्वाची पावले उचलण्यात आली. त्यामुळे महाराष्ट्र प्रकाशमय आणि भारनियमनमुक्त झाला आहे. गेल्या चार वर्षात वीज निर्मितीमध्ये ३,२८० मेगावॅटची वाढ झाली आहे. कृषी ग्राहकांना चक्राकार पद्धतीने दररोज ८ ते १० तास वीजपुरवठा करण्यात येत आहे. जवळच्या कोळसा खाणीतून वीजनिर्मिती केंद्रांना कोळसा पुरवठा करण्यात आल्याने, ९४५ कोटींची बचत झाली आहे. वीजनिर्मिती केंद्रातील राखेचे उपयुक्त बाबींसाठी वापर धोरण तयार करण्यात आले. त्यामुळे प्रदूषण कमी होण्यास साहाय्य होणार आहे. महावितरणाच्या बहुतेक सर्व सेवा ऑनलाइन झाल्यामुळे ग्राहकसेवेत चांगला बदल घडला. मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनींतर्गत कृषिपंपांना सौर ऊर्जेद्वारे दिवसा वीज पुरवठा करणे शक्य झाले. केंद्र शासनाच्या उदय योजनेच्या पूर्ततेत महाराष्ट्राने प्रथम क्रमांक पटकावला. 'प्रधानमंत्री सहज बिजली हर घर योजना– सौभाग्य' या योजनेमध्ये महावितरणाच्या मदतीने ३१ डिसेंबरपर्यंत, आतापावेतो वीज न मिळालेल्या कुटुंबांना, वीज पुरवठा करून १०० टक्के विद्युतीकरण केले जाईल. या योजनेद्वारे ८० टक्क्यांपेक्षा अधिक दलित वस्ती आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल व दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची संख्या अधिक आहे, अशा १९२ गावांतील ८,८२० लाभार्थ्यांना वीज जोडणी देण्यात आली.

६ डिसेंबर रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन आहे. बाबासाहेबांनी भारताला संविधान दिले. भारताची लोकशाही सुदृढ आणि सक्षम केली. समाजातील दुर्बल घटक, महिला, अल्पसंख्याक यांना न्याय दिला. त्यांना प्रगती व विकासाच्या समान संधी उपलब्ध करून दिल्या. आमचे सरकार डॉ. बाबासाहेब यांच्या विचारांना प्रमाणभूत मानून समाजातील सर्व घटकांच्या विकासासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करत आहे. या महामानवाचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे भव्य स्मारक इंदू मिल येथे उभारले जात असून, त्या कामाला प्रारंभ झाला आहे. निर्धारित कालावधीत आम्ही हे स्मारक निश्चितपणे पूर्ण करणार आहोत. या महामानवास लोकराज्यतर्फे विनम्र अभिवादन.

हा अंक आपणास आवडेल अशी आशा आहे.

**चंद्रशेखर बावनकुळे**
(अतिथी संपादक)

**देवेंद्र फडणवीस**, मुख्यमंत्री

मित्र हो, मला कायमच इथे यायची इच्छा राहिली आहे. तुम्हाला माहिती आहे की, प्रत्येक महाविद्यालयीन विद्यार्थी एक ना एक दिवस इथे येण्याचे स्वप्न बघत असतो. पण फक्त काहीच विद्यार्थी इथे प्रवेश घेण्यासाठी पात्र ठरतात. पण श्रीमती उपमा चौधरी यांचे मी आभार मानू इच्छितो की त्यांनी अशा वेगळ्या मार्गाने मला इथे थेट प्रवेश दिला. मला इथे बराच काळ व्यतीत करायला आवडला असता. इथल्या प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांच्या निवासस्थानी राहायलाही आवडले असते. त्याने मी शारीरिकदृष्ट्याही अधिक तंदुरुस्त झालो असतो. ही वास्तू खरोखरच अतिशय भव्य आहे. अतिशय प्रेरणादायी आहे.

### सकारात्मक दृष्टिकोन ठेवा

आज इथे आल्यावर मला माझा आजवरचा प्रवासही आठवतोय, कारण माझ्यासमोर बसलेले तुम्ही सगळे देशाचे उद्याचे प्रशासक आहात. मी सव्विसाव्या वर्षी पहिल्यांदा महापौर झालो तो काळ आठवतोय. ती माझी प्रशासक म्हणून पहिली कारकिर्द होती, जिथे तुम्हाला निर्णय घेणे भाग पडते. महापौर म्हणून माझे अधिकार मर्यादित होते. पण ती जबाबदारी पेलताना मी एक गोष्ट शिकलो. तुमचा दृष्टिकोन जर सकारात्मक असेल तर तुम्ही सगळी परिस्थिती, तुमचा अवकाश बदलू शकता. तुम्हाला जे बदल घडवून आणायचे आहेत ते घडवून आणू शकता. मग मी मुख्यमंत्री झालो. त्या आधी दोन वेळेस मी आमदार होतो. पण कधीही मंत्रिमंडळात नव्हतो. मी थेट मुख्यमंत्रीच झालो. अचानक एक दिवस सगळ्या राज्याची जबाबदारी माझ्या खांद्यावर येऊन पडली. त्या दिवशीच मला बाहेरून एखाद्या गोष्टीकडे बघणे आणि त्याची जबाबदारी पेलणे यातला फरक लक्षात आला. इथे प्रत्येक बारीकसारीक गोष्टीची जबाबदारी तुमच्यावर

**उत्तराखंडमधील मसुरी येथे असलेल्या लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमी परिसराला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच भेट दिली. प्रशासकीय अधिकारी यांच्या भूमिका आणि जबाबदारी, आपले प्रेरणास्रोत, कृत्रिम बुद्धिमत्तेचा पुढील काळात मोठ्या प्रमाणावर होणारा वापर, प्रशासनापुढील नवीन आव्हाने आदी विषयांवर त्यांनी येथे प्रशिक्षण घेत असलेल्या अधिकाऱ्यांशी संवाद साधला.**

# भूमिका आणि जबाबदारी



लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमी मसूरी येथे प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांशी संवाद साधताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.



असते. अगदी एखाद्या छोट्याशा पंचायतीतील एखाद्या अत्यंत सामान्य सेवकाकडून घडलेली एखादी कृती असो किंवा एखाद्या अधिकाऱ्याची वा तुमच्याच एखाद्या सहकाऱ्याची एखादी कृती असो.... प्रत्येक गोष्टीसाठी तुम्हालाच जबाबदार धरले जाते. पण याच जबाबदारीने मला बऱ्याच गोष्टी शिकवल्या आहेत.

## आपल्या भूमिका

आता मुख्यमंत्रिपदाची ४ वर्षं पूर्ण केल्यानंतर मी निश्चितपणे हे सांगू शकतो की, मी कोणत्याही आव्हानांचा सामना करण्यासाठी तयार आहे. खुले मन व सकारात्मक दृष्टिकोनाने मी कोणत्याही वादळाचा सामना करू शकतो आणि अनुभवान्ती माझ्या हेही लक्षात आले आहे की बदल ही अतिशय धिम्या गतीने चालणारी प्रक्रिया असली तरी ती सुरू झाली की, अतिशय वेगाने होते. सगळा प्रश्न तुमच्या मनोभूमिकेचा असतो. एकदा ती मनोभूमिका बदलायला लागली की इतर बदल आपोआप घडून येतात. आपल्या लोकशाही व्यवस्थेत आपल्याकडे इतकी सुंदर राज्यघटना आहे की, ज्यात लोकशाहीच्या चारही स्तंभांच्या भूमिका व जबाबदाऱ्या स्पष्टपणे नमूद करण्यात आल्या आहेत. त्यांचे उल्लंघन होऊ नये, यासाठी त्याला संरक्षक बांधही घालून ठेवण्यात आले आहेत. म्हणजेच प्रत्येकाला त्याच्या चौकटीत काम करण्यासाठी अमर्याद अधिकार आहेत. पण त्याने त्या सीमा ओलांडायच्या म्हटल्या तर मात्र ते अधिकार अत्यंत मर्यादित आहेत. तुम्ही आजवरच्या आपल्या वाटचालीकडे जर पाहिलेत तर असे लक्षात येईल की, जेव्हा जेव्हा आम्ही राजकारणी व नोकरशहा म्हणजेच सरकारी अधिकारी यांनी एकत्र येऊन, एकदिलाने काम केलेय, तेव्हा तेव्हा बदल घडून आले आहेत. या संदर्भात जे म्हटले गेलेय ते खरे आहे की, तुम्हाला जर पारदर्शी, उत्तरदायी, कर्तबगार, संवेदनशील आणि अत्युच्च निष्ठेचे सरकारी अधिकारी हवे असतील तर राजकारण्यांनी आधी या गुणांचे दर्शन घडवत एक आदर्श प्रस्थापित करायला हवा. जे आपल्याबरोबर, आपल्यासाठी काम करतात त्यांना जर आपण प्रेरित करू शकलो नाही तर आपण त्यांच्याकडून सर्वोत्कृष्ट कामगिरीची अपेक्षा करू शकत नाही.

## प्रेरणास्रोत

आपली कृती, आपले निर्णय, आपले नेतृत्वगुण यांच्या माध्यमातूनच आपण आपले सहकारी, आपले कनिष्ठ यांना प्रेरित करू शकतो आणि हे जर आपल्याकडे नसतील, जर तुम्ही त्यांना प्रेरित करू



शकत नसाल तर ते फक्त करायचे म्हणून काम करतील. एक टीम म्हणून ते काम करणार नाहीत. या संदर्भात जे म्हटले गेलेय ते खरे आहे की, हे दोन विश्वासार्ह लोक जर एकत्र, एकदिलाने काम करायला उभे ठाकले तर ते विरोधक व खोटेपणा यांच्याविरुद्धची अभेद्य भिंत बनू शकतात, आणि मला वाटते, आपल्या लोकशाहीमध्ये ही गोष्ट खोलवर रुजायला हवी. राजकारण्यांनी हे समजून घेतले पाहिजे की, नोकरशहा म्हणजे त्यांचेच विस्तारित रूप आहे. जे लोकांमध्ये जाऊन राजकारण्यांनी घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करणार आहेत आणि नोकरशहांनी हे समजून घेतले पाहिजे की, राजकारणी म्हणजे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी लोकांनी निवडून दिलेले लोकप्रतिनिधी आहेत. आज दुर्दैवाने या भूमिकांची गल्लत झालेली दिसते आहे. नोकरशहांमधल्या अनेकांना असे वाटायला लागले आहे की, धोरणात्मक निर्णय घेणारे ते आहेत आणि राजकारण्यांमधल्या अनेकांचा असा गैरसमज झालेला दिसतोय की, प्रत्येक शब्दाची अंमलबजावणी करणे ही त्यांची जबाबदारी आहे. मला वाटते की, आपण आपल्या भूमिका, जबाबदाऱ्या समजून घेऊन, एकत्र येऊन काम करून बदल घडेल याची खात्री केली पाहिजे.

## विश्वासार्हता जपण्याचे आव्हान

आजची सगळ्यात मोठी समस्या किंवा सगळ्यात मोठे आव्हान कोणते? आजचे आपल्या पुढचे सगळ्यात मोठे आव्हान आहे ते विश्वासार्हतेचे! आज संपूर्ण व्यवस्थेपुढे प्रश्नचिन्ह उभे ठाकले आहे आणि मी जेव्हा संपूर्ण व्यवस्था असे म्हणतो तेव्हा अर्थातच, प्रेस व मीडियासकट लोकशाहीच्या चारही स्तंभापुढे हा विश्वासार्हतेचा प्रश्न उभा ठाकला आहे हे उघड आहे. त्याचा मुकाबला केवळ आपल्या कृतीनेच केला जाऊ शकतो. मी एकदा एका स्टार्टअपच्या उद्घाटनाला गेलो होतो. तिथे मी एक यंत्र बघितले. ते अवघ्या काही सेकंदांत 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'च्या साहाय्याने तुमच्या दृष्टिपटलाचे म्हणजेच रेटिनाचे ५०,००० फोटो घेऊ शकत होते आणि त्या ५० हजार फोटोंचे विश्लेषण करून ते अचूक सांगत होते की, तुमच्या डोळ्याची, दृष्टिपटलाची अचूक स्थिती काय आहे, तुम्हाला चष्मा घालायची, शस्त्रक्रियेची गरज आहे का वगैरे...

## आर्टिफिशियल इंटेलिजन्स

काळ बदलतो आहे! आर्टिफिशियल इंटेलिजन्स येतोय. आलाय. त्याला तुम्ही थोपवू शकत नाही आणि त्याच्यामुळे जे काही घडेल याचे जे अंदाज आहेत ते असे आहेत की, त्या पायी २३ कोटी नोकऱ्या जातील, पण हाच आर्टिफिशियल इंटेलिजन्स २५ कोटी नव्या नोकऱ्या

निर्माण करेल आणि त्यापैकी ७५ टक्के नोकऱ्या या अशा असतील, ज्या या आधी कधी अस्तित्वातच नव्हत्या. शिकणे, विसरून जाणे आणि मग पुन्हा शिकणे....हे आपल्याला करावे लागणार आहे. आपल्याला हे लक्षात घेण्याची गरज आहे की, उद्याच्या प्रशासनात तंत्रज्ञान खूप मोठी भूमिका बजावेल. पण तरीही मला असे वाटते की, कोणतेही तंत्रज्ञान माणसाला पर्याय ठरू शकणार नाही. कारण आर्टिफिशियल इंटेलिजन्स ही अशी चीज आहे जिला तुम्ही प्रेम करायला लावता. हा 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' प्रेम करतो



**मसूरी येथील लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमी येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्वागत करताना अकादमीच्या संचालक श्रीमती उपमा चौधरी.**

तेही डेटाच्या माध्यमातून.

त्यामुळे त्याच्यात संवेदना, सहवेदना असणे शक्यच नाही. तो फार तर आपल्याला एवढे सांगू शकतो की, अमुक एका परिस्थितीत आपण कसे वागावे. पण मानवी संवेदना ही या 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'च्या पुढे जाऊन आपल्याला हे सांगते की, आपण संवेदनापूर्वक कशी प्रतिक्रिया द्यावी.

## आव्हानांचा मुकाबला

त्यामुळे मला असे वाटते की, प्रदीर्घ अनुभव असलेले व आज प्रगत प्रशिक्षण घेत असलेले आणि दुसरीकडे नव्याने सेवेत दाखल होऊ घातलेले अशांसाठीची आव्हाने वेगवेगळी आहेत. आणि आपण त्यांचा मुकाबला करायला हवा. विशेषतः आपण जेव्हा संपूर्ण भारताबद्दल बोलतो तेव्हा हेही लक्षात घेतले पाहिजे की, लोकसंख्येच्या बाबतीत तरुणांचे प्रमाण खूप जास्त असणे ही जशी जमेची बाजू आहे, तसेच ते एक प्रचंड मोठे असे आव्हानही आहे. कारण पूर्वी आकांक्षांना गवसणी घालणे सोपे होते. आता तरुणांची संख्या एवढी प्रचंड असल्याने त्यांच्या महत्त्वाकांक्षा स्वाभाविकपणेच गगनाला भिडल्या आहेत. ही पिढी अशी आहे की, त्यांना सगळे आता आणि इथेच हवे आहे. आपल्याला त्यांच्याशी जुळवून घ्यायचे आहे, त्यांच्याबरोबर काम करायचे आहे. काही दिवसांपूर्वी, नंदुरबारच्या एका आदिवासी पाड्यावर एका सरकारी अधिकाऱ्यावर जमावाने हल्ला केला. झाले असे होते की, एका आश्रमशाळेत एक मुलगा विजेच्या धक्क्याने गेला. त्यामुळे संतापलेल्या जमावाने सरकारी अधिकाऱ्यावर हल्ला केला. हा हल्ला अर्थातच निषेधार्हच होता. त्यामुळे चिडलेले, अस्वस्थ झालेले सगळे अधिकारी मला भेटायला आले. मी त्यांना आम्ही कशी काळजी घेऊ व काय उपाययोजना करू हे सांगत असताना एक महिला अधिकारी उभ्या राहिल्या व त्यांनी अशी मागणी केली की, आम्हा सगळ्यांना सरकारने सुरक्षा पुरवली पाहिजे. मी त्यांना म्हटलं की, हे बघा, अत्यंत आणिबाणीच्या प्रसंगी सुरक्षा दिली पाहिजे हे बरोबर आहे. पण जर आमचे अधिकारी, नियमित परिस्थितीतही सुरक्षेशिवाय जनतेशी संवाद, संपर्क साधू शकणार नसतील तर त्याने प्रशासन व लोकांमध्ये जी प्रचंड दरी निर्माण होईल ती आपण कधीच भरू शकणार नाही.

## उत्कंठावर्धक काळ

थोडक्यात, आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, हा बदलता काळ, अतिशय आव्हानात्मक काळ आणि त्याचबरोबर हा अतिशय उत्कंठावर्धक असाही काळ आहे. त्यामुळे आज जे प्रशिक्षण घेत आहात त्या तुम्हा सगळ्यांसाठी, येणारा काळ हा अतिशय आव्हानात्मक व तितकाच उत्कंठावर्धक असणार आहे आणि मला खात्री आहे की, इथे मिळालेल्या प्रशिक्षणामुळे तुमच्यातील 'शिका-विसरा व परत शिका' ही क्षमता विकसित होईल आणि त्याच्या जोरावर तुम्ही कोणत्याही आव्हानाचा मुकाबला करण्यासाठी तसेच लोकांच्या आकांक्षांची पूर्ती करण्यासाठी सज्ज व्हाल.

**(स्वैर अनुवाद - जयश्री देसाई)**



# महापरिनिर्वाण दिन विशेष




## भारतरत्न
## डॉ. बाबासाहेब आंबेडकर

### बहुआयामी व्यक्तिमत्त्व

ज्ञानमार्गी

अर्थतज्ज्ञ

समाजसुधारक

अर्थप्रशासक

शिक्षणतज्ज्ञ

समाजशास्त्रज्ञ

मानववंशशास्त्रज्ञ

राजकीय मुत्सद्दी

कायदामंत्री

संविधानाचे प्रमुख शिल्पकार

भाषावार प्रांतरचनेचे विश्लेषक

बौद्धधम्मचक्र प्रवर्तक



महापरिनिर्वाण दिन

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या घटनेवरच हा देश पुढे जाईल, हे प्रत्येक नागरिकाच्या मनात बिंबवणे गरजेचे आहे. संविधानाच्या माध्यमानेच धर्मभेद, वंशभेद, लिंगभेद, जातिभेद, भाषाभेद या भेदाभेदाच्या चक्रव्यूहातून आपण सारे बाहेर पडू शकतो. त्यामुळेच समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय यावर आधारित सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य घडवणे शक्य होईल.**



# आपले संविधान, आपले सामर्थ्य...

**राजकुमार बडोले**
मंत्री, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य

*वो आदमी नही है मुक्कमल बयान है,*
*माथे पे उसके चोट का गहरा निशान है ।।*
*उस सरफिरे को यों नही बहला सकेंगे आप,*
*वो आदमी नया है मगर सावधान है ।।*
*कुछ नही है फटेहाल मगर,*
*झोले में उसके पास संविधान है ।।*

दुष्यंतकुमारच्या या ओळी येथील सामान्य माणसाच्या जीवनात संविधानामुळे किती शक्तिसंचार होतो ते दर्शवतात.

भारतीय राज्यघटनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी पाहिली तर असे लक्षात येते की, ब्रिटिश या देशात व्यापारी म्हणून आले आणि राज्यकर्ते झाले. १८५७ साली ब्रिटिशांविरुद्ध जे बंड झाले, ते मोडल्यानंतर ईस्ट इंडिया कंपनीकडून भारताची राजकीय सत्ता ब्रिटिश पार्लमेंटकडे गेली. त्यानंतर १९१९ पर्यंत ब्रिटिश सत्तेचा अनियंत्रित कारभार या देशात सुरू होता. त्यानंतर २३ डिसेंबर, १९१९ रोजी ब्रिटिश पार्लमेंटने गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट संमत केला. १९३५ साली ब्रिटिश संसदेने कायदा केला आणि भारताच्या सांसदीय लोकशाही कल्पनेस संघराज्याची जोड मिळाली.

पुढे ब्रिटिश सरकारने १९४५ मध्ये सत्तेचे हस्तांतरण करण्याच्या दृष्टीने करावयाच्या उपाययोजनांच्या संदर्भात एक त्रिसदस्य शिष्टमंडळ भारतात पाठवले. कॅबिनेट मिशन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या शिष्टमंडळांने १६ मार्च, १९४६ रोजी घोषित केलेल्या प्रस्तावामध्ये भारताच्या भावी प्रशासनासाठी राज्यघटना तयार करण्यासाठी घटना समिती निर्माण करण्याचा मुख्य प्रस्ताव होता.

घटना समितीने स्वतंत्र भारताची राज्यघटना बनवण्याचे काम ९ डिसेंबर, १९४६ रोजी सुरू केले. एकूण अपेक्षित २९६ सदस्यांपैकी २०७ सदस्य त्या वेळी उपस्थित राहिले. कॅबिनेट मिशनने केलेल्या शिफारशीनुसार मूलभूत हक्क, अल्पसंख्याक या विषयासाठी एक स्वतंत्र ५० सदस्यीय सल्लागार समिती सरदार पटेल यांच्या अध्यक्षतेखाली २४ जानेवारी, १९४७ रोजी नियुक्त करण्यात आली. या समितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा समावेश करण्यात आला. या सल्लागार समितीने नेमलेल्या मूलभूत हक्क व अल्पसंख्याक या विषयीच्या उपसमितीतही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा समावेश करण्यात आला.

या समित्यावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सहभाग आणि पं.जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय घटना समितीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे काम पाहिल्यानंतर राज्यघटना निर्मितीच्या कामात डॉ. आंबेडकर यांची अधिक आवश्यकता व गरज असल्याचे त्या वेळी काँग्रेस नेत्यांच्या लक्षात आले.

दरम्यानच्या काळात देशाचे व बंगाल प्रांताचे विभाजन झाल्यामुळे बंगालचे प्रतिनिधित्व करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सदस्यता संपुष्टात आली. घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी ३० जून, १९४७ रोजी मुंबई राज्याचे तत्कालीन प्रधानमंत्री श्री.बी.जी.खेर यांना पत्र लिहून डॉ. आंबेडकर यांना मुंबई विधानसभेतून तातडीने घटना समितीवर निवडून पाठवावे असे सुचविताना, डॉ. आंबेडकर यांचे विविध समित्यांवर केलेले काम लक्षात घेता त्यांच्या सेवांपासून आपण वंचित राहू नये, यासाठी घटना समितीचे १४ जुलै, १९४७ चे सत्र सुरू होण्यापूर्वी त्यांना निवडून द्यावे, असे स्पष्ट केले.

अशा प्रकारे डॉ. आंबेडकर जुलै, १९४७ मध्ये मुंबईचे प्रतिनिधी म्हणून घटना

समितीवर निवडून गेले. डॉ. आंबेडकर स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री झाले. २९ ऑगस्ट, १९४७ रोजी घटना समितीने एकमताने त्यांची मसुदा समिती अध्यक्षपदी निवड केली. घटना निर्मितीची संपूर्ण जबाबदारी अशा रीतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वीकारली.

२५ नोव्हेंबर, १९४९ रोजी घटना समितीपुढे शेवटचे भाष्य करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, 'राजकीय लोकशाहीचा पाया जर सामाजिक लोकशाहीने परिपूर्ण नसेल तर ती टिकू शकणार नाही. आर्थिक व सामाजिक जीवनात आपण किती काळ समतेला थोपवून धरणार आहोत? आपण अधिक काळ जर समतेला विरोध करीत राहिलो तर आपली राजकीय लोकशाही संकटात आल्यावाचून राहणार नाही. ही आर्थिक व सामाजिक विषमता शक्य तितक्या लवकर नाहीशी केली पाहिजे, नाहीतर विषमतेने गांजलेले लोक या घटना परिषदेने मोठ्या परिश्रमाने उभे केलेले हे राजकीय लोकशाहीचे मंदिर उद्ध्वस्त केल्यावाचून राहणार नाहीत.' या भाषणातील इशारा वेळीच ओळखून त्या दृष्टीने कार्यवाही करणे गरजेचे आहे.

भारतीय राज्यघटनेची प्रस्तावना (प्रास्ताविक) हा संपूर्ण राज्यघटनेचा सारांश आहे. तसेच घटनादुरुस्ती करताना किंवा कोणताही नवीन कायदा करताना राज्यघटनेच्या मूलभूत स्वरूपाला धक्का लागणार नाही, हे पाहिले पाहिजे, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. राज्यघटनेतील सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायाचा विचार करताना या प्रास्तविकेतील विचार गृहीत धरूनच पुढे जावे लागते. या प्रास्ताविकातील संकल्प पाळला तर ही एका अर्थाने भारतातील राजकीय, सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रातील महत्त्वपूर्ण क्रांतीच आहे. ज्या देशात चातुर्वर्ण्य व्यवस्था हजारो वर्षे अस्तित्वात होती आणि ज्याची मुळेच विषमतेवर आधारित होती, अशा देशात स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय यांवर आधारित घटना अंगीकारणे म्हणजे एक फार मोठी क्रांतिकारक बाब आहे. लोकशाही मूल्यांवर विश्वास ठेऊन आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक सुधारणा करण्यास आता झालेली सुरुवात निश्चितच चांगली आहे.

## उपक्रम



**भारतीय राज्यघटनेच्या प्रतिकृतीला अभिवादन करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.**

- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीवर्षानिमित्त देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी संपूर्ण देशात २६ नोव्हेंबर हा 'संविधान दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. २६ नोव्हेंबर २०१५ रोजी नागपूर येथील यशवंत स्टेडियमवर १,२५,००० विद्यार्थ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थित एकत्रितपणे संविधानाच्या प्रास्ताविकाचे वाचन केले. तेव्हापासून राज्य शासनातर्फे २६ नोव्हेंबर हा 'संविधान दिवस' म्हणून मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात येत आहे.
- मागील वर्षी संविधान दिनाच्या निमित्ताने वरळी सी-फेस ते चैत्यभूमी अशी 'संविधान दौड' आयोजित करण्यात आली. त्यात मुंबई येथील विविध संस्थांचे प्रतिनिधी व मान्यवर सहभागी झाले होते. या वर्षी २६ नोव्हेंबर ते २ डिसेंबर, २०१८ हा 'संविधान सप्ताह' म्हणून संपूर्ण राज्यात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विविध उपक्रम राबवण्यात आले. त्याचप्रमाणे संविधान दिनी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात संविधान प्रास्ताविकाचे वाचन करण्यात आले.
- संविधान दिनानिमित्त शासनाच्या विविध विभागामार्फत शाळा व महाविद्यालयात संविधान जागर प्रभातफेरी काढण्यात आल्या. पोलीस स्टेशन, पंचायत समिती, तहसीलदार कार्यालय व अन्य शासकीय कार्यालयात संविधानाच्या पुस्तकांच्या प्रती वितरित करण्यात आल्या.
- संविधानावर वर्क्तृत्वस्पर्धा, एकपात्री प्रयोग, निबंधस्पर्धा, गायनस्पर्धा, दिव्यांग कला सादरीकरण, पथनाट्य व संविधानावर आधारित प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करून भारतीय संविधानाचा जागर करण्यात आला.
- संपूर्ण राज्यात ग्रामपंचायतीपासून तर जिल्हा कार्यालयांमध्ये संविधानाचे वाचन करण्यात आले. शासनाच्या विविध योजनांच्या लाभासंदर्भात माहिती पत्रकाचे वाटप यानिमित्ताने करण्यात आले.




# सामाजिक लोकशाही

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे लोकशाहीचे कट्टर समर्थक होते. भारतात लोकशाही दृढमूल व्हावी म्हणून डॉ. आंबेडकरांनी विशेष प्रयत्न केले. त्यांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुभाव आणि न्याय प्रस्थापित करून त्याद्वारे भारतीय लोकशाही मजबूत करण्याचे कार्य केले.**

**डॉ. प्रदीप आगलावे**



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची लोकशाहीची संकल्पना समजून घेण्यासाठी त्यांनी दिलेली लोकशाहीची व्याख्या वस्तुनिष्ठपणे समजून घेतली पाहिजे. पुणे जिल्हा कायदा ग्रंथालयतर्फे डॉ. आंबेडकरांच्या भाषणाचा कार्यक्रम २२ डिसेंबर १९५२ ला झाला होता. या कार्यक्रमात डॉ. आंबेडकरांनी 'लोकशाही यशस्वी होण्याकरिता पूर्वावश्यक अटी' याविषयी सविस्तर भाषण दिले. या भाषणात त्यांनी लोकशाहीची स्वत:ची व्याख्या दिली.

'लोकशाही हा शासनाचा असा एक प्रकार आणि पद्धती आहे की, ज्याद्वारे लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात रक्ताचा एक थेंबही न सांडता क्रांतिकारक बदल घडवून आणला जातो.'

वाल्टर बॅग्होट यांनी लोकशाहीची व्याख्या 'चर्चेद्वारे सरकार' अशी दिली आहे. तर अब्राहम लिंकन यांनी 'लोकांचे, लोकांकडून आणि लोकांकरिता असलेले शासन' अशी लोकशाहीची व्याख्या दिली आहे. वॉल्टर बॅग्होट आणि अब्राहम लिंकन यांनी दिलेल्या लोकशाहीच्या व्याख्यांचा अभ्यास केला तर असे आढळून येते की, या दोन्ही व्याख्या केवळ शासनाच्या विभिन्न प्रकाराचे विश्लेषण करतात. परंतु या प्रकारातील शासन लोकांकरिता अनुकूल राहीलच असे म्हणता येत नाही. अशा शासनाद्वारे लोकांचे कल्याण होईल अशी अपेक्षा आहे. परंतु त्या संदर्भात शासनाचे धोरण कोणते राहील हे स्पष्ट होत नाही. लोकांचे, लोकांकडून आणि लोकांकरिता असलेले शासन हे सर्वसामान्य लोकांच्या हिताविरुद्ध देखील असू शकते. लोकशाहीच्या नावाखाली अनेकदा भांडवलदारांच्या हिताचा विचार केला जातो. परंतु लोकांच्या कल्याणाचा विचार तेवढा प्रभावी राहत नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतातील लोकशाहीच्या भविष्याबाबत पूर्ण कल्पना होती. भारतात लोकशाहीची तत्त्वे रुजली नाहीत. 'लोकांना घटनात्मक नीतिमत्तेबद्दल जाणीव नाही. त्यामुळे या देशात लोकशाहीच्या नावावर केवळ उच्च जातीच्या लोकांचे आणि भांडवलदारांचे संरक्षण केले जाईल. देशातील मागासवर्गीय लोकांच्या हितांचे संरक्षण करण्यास सरकार असमर्थ ठरेल,' याची जाणीव डॉ. आंबेडकरांना होती. म्हणून त्यांनी

लोकशाहीची स्वत:ची वेगळी व्याख्या दिली. या व्याख्येनुसार, 'लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात क्रांतिकारी बदल घडवून आणण्याचे काम लोकशाहीचे आहे. लोकशाही केवळ एक शासनाचा प्रकार किंवा पद्धती नाही तर त्याद्वारे देशात आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात क्रांतिकारी बदल घडवून आणता येते. ही जबाबदारी लोकशाही शासनाची आहे.' ही बाब डॉ. आंबेडकरांनी स्पष्टपणे आपल्या व्याख्येतून मांडली आहे.

## क्रांतिकारी बदल

ही लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात क्रांतिकारी बदल घडवून आणण्याची व्यवस्था निर्माण करणारी लोकशाही ही प्रणाली आहे. देशात आर्थिक आणि सामाजिक समता प्रस्थापित झाल्याशिवाय लोकशाही व्यवस्था खऱ्या अर्थाने यशस्वी होऊ शकत नाही, याची जाणीव डॉ. आंबेडकरांना होती. आर्थिक आणि सामाजिक समता निर्माण करण्याच्या दृष्टीने शासनाने घटनात्मक तरतुदी केल्या नाहीत, तर देशात लोकशाहीच्या नावावर भांडवलशाही निर्माण होईल हा धोका डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ओळखला होता.


लोकशाही ही देशातील उच्च जातीच्या आणि श्रीमंत लोकांच्या हातातील एक बाहुले बनू शकेल याची जाणीव डॉ. आंबेडकरांना होती म्हणून त्यांनी लोकशाहीचा चेहरामोहरा बदलवून टाकणारी लोकशाहीची स्वतंत्र अशी व्याख्या दिली आहे.

लोकांचे, लोकांकडून आणि लोकांसाठी चालवलेले शासन हे लोकांचे कल्याण करणारे राहीलच असे म्हणता येणार नाही. ही लोकशाहीची खरी व्याख्या नाही. जे शासन लोकांच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात क्रांतिकारी परिवर्तन घडवून आणण्याची व्यवस्था निर्माण करते, तेच शासन हे खऱ्या अर्थाने लोकांचे लोकांच्या कल्याणासाठी कार्य करू शकते. कारण लोकशाहीच्या नावावर सत्ताधारी लोक हुकूमशहा आणि भांडवलदारांचे समर्थक बनवण्याची शक्यता अधिक असते. कार्ल मार्क्सने साम्यवादी व्यवस्थेचा पुरस्कार केला.

साम्यवादी व्यवस्थेमार्फत समाजात समाजवाद प्रस्थापित केला जातो म्हणून साम्यवादी व्यवस्था चांगली आहे. हे खरे असले तरी साम्यवादी व्यवस्थेत साम्यवादी सरकारला हुकूमशहा बनण्याची संधी देण्यात आली आहे. ही बाब डॉ. आंबेडकरांसारख्या लोकशाहीच्या कट्टर समर्थकास पटू शकली नाही म्हणून त्यांनी साम्यवादी शासन पद्धतीला विरोध केला.

## राज्य समाजवाद

लोकशाहीच्या माध्यमातूनच देशात समाजवाद प्रस्थापित व्हावा अशी त्यांची अपेक्षा होती. निवडणुकीच्या प्रक्रियेतून




सत्तेवर आलेल्या शासनाने सर्वसामान्य लोकांच्या कल्याणाच्या दृष्टीने कार्य करावे. त्यासाठी देशाचे आर्थिक आणि सामाजिक धोरण हे देशाच्या संविधानामध्येच अंतर्भूत असावे, असा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आग्रह होता. त्या धोरणानुसारच शासनाने कार्य केले पाहिजे. सरकार बदलले म्हणजे त्या सरकारचा अग्रक्रम आणि धोरण बदलता कामा नये. याचा अर्थ देशाच्या संविधानातच समाजवादी आर्थिक आणि सामाजिक कार्यक्रम अंतर्भूत असला पाहिजे. समाजवादी कार्यक्रम प्रत्येक सरकारास बंधनकारक राहील. म्हणजे संविधानातील समाजवाद निर्माण करणारा कार्यक्रम हा त्या देशाचा राष्ट्रीय कार्यक्रम राहील. म्हणून त्यास 'राज्य समाजवाद' असे म्हटले आहे.

कल्याणकारी राज्याची संकल्पना कालबाह्य ठरली नाही. शासनाचे देशाच्या आर्थिक धोरणावर नियंत्रण असणे आणि सर्वसामान्य लोकांच्या कल्याणाची राज्याची जबाबदारी या दोन्ही बाबी जागतिकीकरणाच्या काळातसुद्धा तेवढ्याच महत्त्वाच्या आहेत. या पार्श्वभूमीवर डॉ. आंबेडकरांची लोकशाहीची व्याख्या लक्षात घेतल्यास ही व्याख्या किती महत्त्वाची आहे हे स्पष्ट होते. इतकेच नव्हे तर जागतिकीकरणाचे फटके इतर देशांना बसल्यानंतर खासगीकरणाची 'री' ओढणारे हेच देश नियंत्रित आर्थिक धोरणाचा स्वीकार करतील आणि राज्याच्या कल्याणकारी भूमिकेचा पुनरुच्चार करतील, तेव्हा डॉ. आंबेडकरांनी दिलेली लोकशाहीची व्याख्या ही किती महत्त्वाची आहे याची लोकांना खात्री पटेल.

## सामाजिक लोकशाही

डॉ. आंबेडकर स्पष्टपणे म्हणतात की, 'लोकशाही हा केवळ एक शासनाचा प्रकार नाही.' लोकशाही ही शासनाच्या एका प्रकारापेक्षा अधिक आहे. हा समाजाच्या संघटनेचा प्रकार आहे. लोकशाही हे समतेचे दुसरे नाव आहे.

शासनाच्या लोकशाही स्वरूपासाठी समाजाची लोकशाही स्वरूपाची पूर्वधारणा हवी. जर सामाजिक लोकशाही नसेल तर लोकशाहीच्या औपचारिक संरचनेचे कोणतेही मूल्य नाही आणि ती खरोखरच अयोग्य ठरेल. लोकशाही हे शासनाचे स्वरूपच नाही तर ते समाजाचे आवश्यक स्वरूप आहे.



महापरिनिर्वाण दिन

डॉ. आंबेडकरांनी सामाजिक लोकशाहीवर विशेष भर दिला आहे. सामाजिक लोकशाही निर्माण झाल्याशिवाय राजकीय लोकशाही टिकू शकत नाही. समाजाच्या संरचनेतच लोकशाही मूल्ये असली पाहिजेत असे त्यांचे स्पष्ट मत होते. म्हणून ते म्हणतात की, जोपर्यंत समाजाच्या संरचना आणि स्वरूपामध्ये लोकशाहीप्रधान प्रकार्य असत नाही, तोपर्यंत शासन लोकशाहीप्रधान असू शकत नाही. जे असा विचार करतात की लोकशाहीला केवळ निवडणुकीशिवाय इतर कशाचीही गरज नाही. ते तीन प्रकारच्या चुका करतात. ■ पहिली चूक ही की समाजापासून शासन हे वेगळे आहे. ■ दुसरी चूक म्हणजे ते हे जाणून घेत नाही की, समाजाचे ध्येय, उद्देश आणि इच्छा यांचे प्रतिबिंब म्हणजे शासन होय. जर समाज लोकशाहीप्रधान नसेल तर शासनदेखील कधीही लोकशाहीप्रधान राहणार नाही. ■ सामाजिक वातावरण जर लोकशाहीप्रधान नसेल तर शासनदेखील तसे राहणार नाही. ही तिसरी चूक होय.

अशा प्रकारे डॉ. आंबेडकर यांनी लोकशाहीचे, सामाजिक दृष्टिकोनातून असलेले महत्त्व स्पष्ट केले. त्यांचा लोकशाहीविषयीचा दृष्टिकोन अतिशय स्पष्ट असल्याचे आढळून येते. त्यांनी लोकशाहीस राजकीय मशीन मानले आहे. त्यांच्या मते, 'लोकशाही राजकीय मशिनीपेक्षा अधिक काही आहे. सामाजिक व्यवस्थेपेक्षाही ती अधिक काही आहे. ती मनाची प्रवृत्ती किंवा जीवनाचे तत्त्वज्ञान आहे.'

यावरून हे स्पष्ट होते की, डॉ. आंबेडकरांना लोकशाही हा केवळ शासनाचा एक प्रकार म्हणून अभिप्रेत नव्हता तर स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ही मूल्ये समाजात रुजवणे आणि त्यानुसार समाजाची उभारणी करणे हे लोकशाहीचे खरे कार्य आहे, असे डॉ. आंबेडकरांचे स्पष्ट मत होते. या पार्श्वभूमीवर त्यांच्या लोकशाहीच्या व्याख्येचे विश्लेषण केल्यास त्यांची लोकशाहीची व्यापक संकल्पना स्पष्ट होते.



**राज्य घटना समितीमध्ये चर्चा करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

## लोकशाहीचे यश

लोकशाही ही प्रस्थापितांची बटीक होऊ नये म्हणून लोकांच्या कल्याणाच्या दृष्टीने सामाजिक, आर्थिक धोरणाचा अंतर्भाव संविधानात करण्याचा आग्रह डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला होता. देशाच्या संविधानात कितीही चांगल्या गोष्टी असल्या तरी त्या चांगल्या गोष्टींची अंमलबजावणी करण्याची इच्छा राज्यकर्त्यांची नसेल तर चांगले संविधानदेखील अपयशी ठरू शकते, याची जाणीव त्यांना होती. म्हणून त्यांनी लोकशाहीच्या यशस्वितेच्या आवश्यक अटी स्पष्टपणे प्रतिपादन केल्या. त्या आवश्यक अटी पुढीलप्रमाणे आहेत.

■ समाजात असमानता नसावी. शोषित आणि शोषक वर्ग नसावे. ■ प्रबळ विरोधी पक्षाचे अस्तित्व असावे ■ कायदा आणि प्रशासनात समता असावी. ■ घटनात्मक नीतिमत्तेचे पालन असावे ■ बहुसंख्याकांचा अल्पसंख्याकांवर अत्याचार नसावा. ■ समाजात नैतिक व्यवस्था असावी. ■ सार्वजनिक जाणीव असावी.

लोकशाही यशस्वी होण्यासाठी वरील पूर्वावश्यकता आहे. या अटींची पूर्तता होण्यावरच लोकशाहीचे यश अवलंबून आहे.

संपर्क: ०९८८१२६२६६०, प्रमुख, डॉ. आंबेडकर विचारधारा विभाग, प्रोफेसर, डॉ. आंबेडकर अध्यासन, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,नागपूर विद्यापीठ, नागपूर

**'डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समिती' ही गेल्या २० वर्षापासून नि:स्वार्थ भावनेने हा अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करते. समितीचे सदस्य, हे आयोजन शांतपणे, गांभीर्यपूर्वक व सुरळीत व्हावे म्हणून दिवसरात्र कार्यरत असतात.**

# नि:स्वार्थ सेवा...

**नागसेन कांबळे**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण ६ डिसेंबर, १९५६ रोजी त्यांच्या दिल्ली निवासस्थानी झाले. दिल्लीहून त्यांचे पार्थिव रात्री सव्वा तीन वाजता सांताक्रूझ विमानतळावर आणण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पुष्पाच्छादित पार्थिव बाहेर येताच विमानतळावर आलेल्या १ लाखाहून अधिक अनुयायांना रडू कोसळले. महानगरपालिकेच्या शववाहिकेत पार्थिव ठेवण्यात आले. मूक अंत्ययात्रेस प्रारंभ झाला. बाबासाहेबांचा चेहरा सर्वांना दिसावा म्हणून शववाहिनीमध्ये खास प्रकाश योजनेची व्यवस्था करण्यात आली होती.

सांताक्रूझ ते दादर पाच मैलांचे अंतर पार करण्यास तीन तास लागले. पहाटे पाच वाजून पाच मिनिटांनी रुग्णवाहिका राजगृहापाशी आली. तेथे रात्रभर साडेतीन लक्ष अनुयायी शववाहिनीची वाट पाहत बसून होते. 'बुद्धं सरणं गच्छामिची वंदना' तेथे सतत होत होती. शववाहिनी राजगृहापाशी येताच अनुयायांची गर्दी आवरणे पोलिसांना व समता सैनिकांना अशक्य होत होते. मेणबत्यांच्या मंगल प्रकाशात डॉ. बाबासाहेबांचे पार्थिव रुग्णवाहिकेमधून उतरवण्यात आले.

## महानिर्वाण अंत्ययात्रा

डॉ. बाबासाहेबांची महानिर्वाण अंत्ययात्रा ७ डिसेंबर, १९५६ रोजी राजगृहापासून दुपारी दोन वाजता निघाली. सुमारे दहा ते बारा लाख स्त्री-पुरुष अनुयायी या अंत्ययात्रेमध्ये सामील होते. सायंकाळी सात वाजता दादर चौपाटीच्या विस्तीर्ण समुद्र किनाऱ्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पार्थिवावर बौद्ध पद्धतीने अग्निसंस्कार करण्यात आले. त्यानंतर भदन्त आनंद कौसल्यायन यांच्या हस्ते बौद्धधम्म दीक्षाविधी झाला.



**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अंतयात्रेला जमलेला जनसमुदाय.**

बौद्ध संस्कृतीनुसार या स्थळावर एक चैत्य उभारण्यात आला आहे. म्हणून या जागेला चैत्यभूमी असे म्हणतात. दरवर्षी या ठिकाणी महापरिनिर्वाण दिन आयोजनामध्ये समन्वयाची मोठी भूमिका समन्वय समिती बजावत असते.

## चैत्यभूमी स्मारक

संबंधित ठिकाणी कालवश भैय्यासाहेब तथा यशवंतराव आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली आंबेडकरी जनतेने स्वेच्छेने दिलेल्या दानातून चैत्यभूमी स्मारक उभारण्यात आले. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पवित्र स्मारक दादर (पश्चिम) येथे चौपाटी लगत समुद्रकिनारी स्थित आहे. या ठिकाणी बाबासाहेबांचा अस्थिकलश जतन करण्यात आला आहे. हे स्मारक म्हणजेच जगभरातील अनुयायी, विचारवंत, विद्वान आणि संशोधकांचे प्रेरणास्थान आहे.

नंतरच्या काळात चैत्यभूमी स्मारकातील बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेबांच्या पवित्र अस्थींचे दर्शन घेण्यास येणाऱ्या अनुयायांची सतत वाढणारी संख्या लक्षात घेता, सुविधा वाढवण्यात आल्या. तत्पूर्वी चैत्यभूमी आणि शिवाजी पार्क परिसरातील चित्र विदारक होते. त्यामध्ये बदल करण्यासाठी आणि अनुयायांची गैरसोय होऊ नये म्हणून आंबेडकरी चळवळीतील सक्रिय असणाऱ्या विविध संघटना व पक्षांतील कार्यकर्ते यांनी एकत्र येऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाणदिन समन्वय समितीची स्थापना केली. १९९८ पासून बृहन्मुंबई महानगरपालिका, बेस्ट, रेल्वे तसेच पोलीस प्रशासनाकडे विशेष प्रयत्न आणि पाठपुरावा करून चैत्यभूमीवर अभिवादन करण्यास येणाऱ्या अनुयांयासाठी विपुल प्रमाणात सेवा-सुविधा प्राप्त करून देण्यात महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचा सिंहाचा वाटा राहिलेला आहे. यासंदर्भात



महापरिनिर्वाण दिन

प्रशासकीय व्यवस्थेची व्यापकता वाढवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वेळोवेळी संबंधित विभागांना आदेश देऊन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

## समन्वय

डॉ. बाबासाहेबांना अभिप्रेत समजारचना निर्माण करण्यासाठी समाज आणि शासन प्रशासनासोबत समन्वयाची भूमिका पार पाडण्याचा प्रयत्न ही समिती करत आहे. डॉ. बाबासाहेबांनी निर्माण केलेली सांविधानिक व्यवस्था जनमानसांपर्यंत पोहोचावी आणि शेवटच्या माणसाची सेवा घडावी या हेतूने प्रेरित होऊन, महापरिनिर्वाण दिनानिमित्त भारतातील विविध भागांतून येणाऱ्या लाखो अनुयायांची चैत्यभूमीवर आल्यावर गैरसोय होऊ नये याकरिता महाराष्ट्र शासन, बृहन्मुंबई महानगरपालिका, बेस्ट, रेल्वे व पोलीस यंत्रणेतर्फे या सेवा-सुविधा योग्यरीत्या प्राप्त करून घेण्याचे जनहिताचे कार्य समितीमार्फत घडत आहे. डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात २० ते २५ लाख अनुयायी चैत्यभूमी येथे येऊन अभिवादन करतात. जगाच्या इतिहासात एखाद्या महापुरुषाला स्वयंस्फूर्तीने वंदन करण्यासाठी इतके लोक एकत्र येणारी अशी ही एकमेव घटना आहे.

## समन्वय समितीचे यश

■ महापरिनिर्वाण दिनानिमित्त येणाऱ्या अनुयायांना सेवा-सुविधा देण्यास प्रथम १९९८ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने प्रारंभ झाला. महापालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये ६ डिसेंबर महापरिनिर्वाण दिन विशेष निधी म्हणून तरतूद करण्यात आली. ■ १९९८ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेने संरक्षण भिंतीचे बांधकाम केले. ■ १९९८-९९ पासून चैत्यभूमी येथे शासनातर्फे व समन्वय समितीच्या सहकार्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीची परंपरा सुरू करण्यात आली. ■ २००२ मध्ये चैत्यभूमी स्मारकाची दुरुस्ती, तोरणा गेट, अशोकस्तंभ, पोलीस चौकी, आतील व बाहेरील विद्युत दिवे, सुलभ शौचालय, लादीकरण, उद्यानाचे सुशोभीकरण, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, चैत्यभूमी परिसरात सी.सी.टी.व्ही कॅमेरा, सिमेंट काँक्रिटचे ट्रेटापॉड इत्यादी कामे करण्यात आली.

■ २०११ मध्ये 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर चैत्यभूमी स्मारक' असे चौकाचे नामकरण करण्यात आले.

■ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १२२ व्या जयंतीनिमित्त 'चैत्यभूमी स्मारक टपाल' तिकिटाचे प्रकाशन करण्यात आले.

■ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ५८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त ६ डिसेंबर २०१४ पासून महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीच्या मागणीनुसार राज्यपाल सी. विद्यासागर राव आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत शासकीय मानवंदनेची प्रथा सुरू झाली. शासनाच्या वतीने चैत्यभूमी स्मारकावर प्रतिवर्षी हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करण्यात येते. ■ डॉ. बाबासाहेब आंबेडकर चैत्यभूमी स्मारकास पर्यटन स्थळ व तीर्थस्थळाचा 'अ' दर्जा प्राप्त झाला.

■ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंतीनिमित्त २०१६ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने इंग्रजी व मराठी भाषेमधून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील 'कॉफी टेबल बुकचे' प्रकाशन करण्यात आले. तसेच 'भीमपहाट' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ■ कुपरेज येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पूर्णाकृती पुतळ्यावर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने पुतळ्यावर संरक्षण छत्री बसवण्यात आली. तसेच तेथे संविधान प्रास्ताविका व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवनपट प्रदर्शित करण्यात आले. ■ 'बार्टी' या संस्थेच्या माध्यमातून ६ डिसेंबर, २०१६ पासून येणाऱ्या अनुयायांसाठी भोजनाची व्यवस्था सुरू करण्यात आली. याआधी अनुयायांना चादर, फळे, पिशवी व पाण्याची बाटली यांचे वाटप करण्यात येते. ■ शीव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची अनमोल देशसेवा'



**महापरिनिर्वाण दिनानिमित्त आलेल्या अनुयायांचे संग्रहित चित्र.**

या विषयीचे 'शिल्प' उभारण्यात आले. ■ समन्वय समितीच्या मागणीनुसार मुंबई विकास आराखड्यामध्ये प्रामुख्याने 'चैत्यभूमी' असे चिन्हांकित मंजूर करण्यात आले.

■ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ६० व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त २०१६ मध्ये प्रथमच समन्वय समितीच्या पदाधिकाऱ्यांनी अवयव दान संकल्प करून त्यांना विशेष श्रद्धांजली अर्पण केली. तसेच भिक्खू संघास चिवरदान आणि दादर येथील कमला मेहता अंधशाळेच्या विद्यार्थ्यांना वस्तुदान केले. ■ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यासाठी येणाऱ्या लाखो अनुयायांना योग्य आणि पुरेशा सुविधा पुरविण्याबाबत शासकीय स्तरावर दरवर्षी आढावा बैठक घेण्याची प्रथा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि समन्वय समितीच्या माध्यमातून सुरू करण्यात आली. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली बृहन्मुंबई महानगरपालिका व विविध शासकीय विभागांमार्फत ६ डिसेंबर म्हणजेच महापरिनिर्वाण दिनाची चोख व्यवस्था केली जाते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त येणाऱ्या लाखो आंबेडकरी व इतर सर्व थरातील लोकांच्या खाण्या-पिण्याच्या, आरोग्याच्या व इतर आवश्यक सोयीसुविधा तसेच त्यानिमित्ताने लागलेले पुस्तकांचे व इतर उपयोगी स्टॉल यांच्या शिस्तीचे नियोजन डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समिती, बृहन्मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र शासनाचे विविध विभाग तसेच अनेक सामाजिक संस्था करत असतात.

सरचिटणीस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर
महापरिनिर्वाण दिन समन्वय समिती, मुंबई.

# २०20 पर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक पूर्ण करणार

इंदू मिल येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक २०२० पर्यंत पूर्ण करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचा २० वा वर्धापन दिन परळ येथे संपन्न झाला त्या वेळी श्री.फडणवीस बोलत होते. '६ डिसेंबरला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमीवर येणाऱ्या आंबेडकर अनुयायांना सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. तसेच २०२० नंतर आंबेडकर अनुयायांना रांगेत उभे राहावे लागू नये, यासाठी इंदू मिल येथील आंबेडकर स्मारकाजवळ सर्व सोयीसुविधा कायमस्वरूपी निर्माण करण्यात येतील. इंदू मिल येथील आंतरराष्ट्रीय स्मारकामुळे मुंबईची नवीन ओळख तयार होणार आहे,' असे मुख्यमंत्री या वेळी म्हणाले.



**डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीच्या २० व्या वर्धापन दिन कार्यक्रमात समितीच्या कार्यअहवालाचे प्रकाशन करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, खासदार राहुल शेवाळे, आमदार राज पुरोहित, कालिदास कोळंबकर, भाई गिरकर, अजय चौधरी, समन्वय समितीचे नागसेन कांबळे व इतर पदाधिकारी.**

'डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जागतिक व्यक्तिमत्त्व आहे. बाबासाहेबांना सर्व विषयांचे ज्ञान होते. त्यांनी मानवता, बंधुता, समतेचा पुरस्कार करणारा धम्म दिला. या विचारांवर आधारित सर्वसमावेशक अशी राज्यघटना देशाला दिली.'

**- देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री

## दीक्षाभूमीसाठी १०० कोटी रुपये

नागपूर येथील दीक्षाभूमीसाठी १०० कोटी रुपये मंजूर केले असून यापैकी ४० कोटींचा निधी देण्यात आला आहे. नागपूर येथील दीक्षाभूमी येथे अनुयायांसाठी सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. मुंबईतील चैत्यभूमी व कूपरेज येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ कायमस्वरूपी भीमज्योतीची व्यवस्था करण्यात येत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समिती अतिशय चांगल्या प्रकारे काम करत असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्र्यांनी काढले.



महापरिनिर्वाण दिन

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना चांगला पोशाख वापरण्याची आवड होती. लक्ष्मणराव शिंत्रे यांनी शिवलेले कपडे बाबासाहेब वापरीत. बाबासाहेबांच्या सहचारिणी रमाबाईंच्या चोळ्या लक्ष्मणरावांची पत्नी येलुबाई शिवायच्या. राजगृहातील एक खोली रंगीबेरंगी पोशाखांनी सजवली होती. बाबासाहेबांनी एका प्रसंगी आपला उंची कोट नानासाहेब टिपणीस यांच्या अंगावर चढवला होता. नानासाहेब नेहमी म्हणायचे, 'बाबासाहेबांनी आपला कोट म इया अंगावर घालून आपल्या मायेची व विश्वासाची शाल मला पांघरली आणि माझ्या जीवनाचे सोने केले.'**

# बाबासाहेबांचे पोशाखप्रेम

**मिलिंद मानकर**

भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही विसाव्या शतकातील राजकीय व सामाजिक क्षेत्रातील अत्यंत प्रभावी अशी महान व्यक्ती होती. धिप्पाड शरीरयष्टी, करारी चेहरा, भेदक दृष्टी, भरदार आवाज, नीटनेटका पोशाख आणि त्यांची आत्मविश्वासी धाटणी पाहिली की, प्रत्येक भारतीयाला त्यांच्या अनोख्या व्यक्तिमत्त्वाची जाणीव व्हायची. बाबासाहेब अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे धनी होते. त्यांचे ग्रंथप्रेम जगप्रसिद्ध आहे. याशिवाय संगीत, चित्रकला, स्वयंपाक, बागकाम आणि कपड्यांची त्यांना आवड होती.

सुरुवातीला बाबासाहेबांच्या घरी कमालीचे दारिद्र्य होते. जातिव्यवस्थेचे, अस्पृश्यतेचे चटके त्यांनाही सहन करावे लागले. हायस्कूलमध्ये पहिल्याच दिवशी हा युगपुरुष आपल्या चाळीस वर्षे वयाच्या भावाचा पायापर्यंत लोंबणारा शर्ट घालून गेला होता. कालांतराने बाबासाहेबांनी वकिली व्यवसायातून कमावलेल्या संपत्तीतून कपड्यांची आवड पूर्ण केली.

**''अलीकडील आपल्या समाजातील तरुण-तरुणींचा पोशाख मला आवडतो. नेहमी आपणाजवळ कमीत कमी दोन पोशाख पाहिजेत. पोशाखात चांगला बदल झाला आहे याबद्दल मला समाधान वाटते. स्त्रियांनी चोळी, लुगडी असाच पोशाख वापरावयाचा असला तरी तो व्यवस्थित असावा. पोशाख भारी किमतीचाच पाहिजे असे माझे म्हणणे नाही. पोशाख साधा का असेना पण तो स्वच्छ, नीट असावा.''**

**– डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मुंबई २९ मे १९५३**

बाबासाहेब म्हणतात, 'मी उत्तम पोशाखाचा शौकीन आहे. मी नेहमी उच्च कपडे खरेदी करतो. पोशाखामुळे माणसाच्या नैतिक व्यक्तिमत्त्वावर प्रभाव पडतो. कपडे स्वच्छ आणि शिस्तबद्ध असावे. स्वच्छ पोशाख आदरसत्काराची वस्तू आहे, प्रगतीचे लक्षण आहे.' ग्रंथासाठी व कपड्यासाठी त्यांचे सर्वात अधिक पैसे खर्च व्हायचे. पोटाला मिळाले नाही तरी चालेल पण अंगावर चांगले कपडे हवे हा त्यांचा आग्रह



असे. मी भारतातील नीटनेटका पोशाख करणाऱ्या बॅरिस्टर्सपैकी एक आहे याचा मला अभिमान वाटतो असे ते म्हणायचे. सिडनेहॅम कॉलेजात असताना बाबासाहेबांना पहिला पगार मिळाला. त्यांनी पत्नी रमाईला सांगितले की, घरातल्या सर्वांसाठी कपड्यांची मनसोक्त खरेदी करून घे. एकदा बाबासाहेब निवडणुकीच्या प्रचारासाठी मुंबईला आले होते. प्रचारसभा झेविअर महाविद्यालयाच्या मैदानावर होती. बाबासाहेब तयारीला लागले. त्यांनी ग्रे कलरचा छान सूट घातला. रमाईंनी समोर टायने भरलेली बॅग ठेवली. पण त्यांना त्यातला एकही टाय पसंद पडेना. शेवटी सभेला जाताना चर्चगेटला इरॉस सिनेमागृहाच्या मागे उच्च प्रतीच्या सूट्सचे शोरूम होते. तिथे परदेशस्थ आणि उच्चभ्रू लोक खरेदीसाठी जात. बाबासाहेबांनी उच्च प्रतीचे पाच-सात टाय घेतले. एक टाय तिथेच सुटावर बांधून सभास्थळी निघाले.

बाबासाहेबांच्या राजगृह या निवासस्थानाच्या अगदी जवळ लक्ष्मणराव शिंत्रे नावाचे गृहस्थ राहायचे. लक्ष्मणराव बाबासाहेबांचे समवयस्क होते. त्यांनी सत्यशोधक मंडळात प्रवेश केला त्या वेळी त्यांचा बाबासाहेबांशी परिचय झाला आणि पुढे परिचयाचे रूपांतर प्रगाढ मैत्रीत झाले. लक्ष्मणराव उत्तम दर्जाचे शिंपी होते. त्यांचे दुकान मुंबईत पानवाला चाळ येथे होते. लक्ष्मणरावांनी शिवलेले कपडे बाबासाहेब वापरीत. सहचारिणी रमाबाईंच्या चोळ्या लक्ष्मणरावांची पत्नी येलुबाई शिवायच्या. 'या बाबी माझ्या कुटुंबासाठी आणि समस्त भावसार समाजासाठी अभिमानाच्या असून या ऐतिहासिक, संस्मरणीय प्रसंगाचा मी

साक्षीदार आहे' अशी हृदयंगम आठवण लक्ष्मणरावांचे चिरंजीव शांताराम शिंत्रे यांनी एका मुलाखतीत सांगितली.

## दोन सूट... सहा शर्ट

लंडन येथे भरलेल्या पहिल्या गोलमेज परिषदेला जाण्यापूर्वी १९३० साली बाबासाहेबांनी लक्ष्मणरावांकडून दोन सूट आणि सहा शर्ट शिवून घेतले होते. लंडनहून परत येताना बाबासाहेबांनी दोन सूट खरेदी केले. पण ते मापाचे नव्हते. लक्ष्मणरावांनी सूट दुरुस्त केल्यानंतरच बाबासाहेबांनी ते वापरले. बाबासाहेब म्हणतात, 'माझ्या आयुष्यात मी दगाबाजी, फसवणूक किंवा आत्मसिद्धीसाठी पाप केले नाही, त्याबद्दल मला मोठा अभिमान वाटतो. मी विलायतेला अनेक वेळा गेलो पण अजून दारू प्यालो नाही, विडी-सिगारेट ओढली नाही. मला कसले व्यसन नाही. फक्त पुस्तक व कपडा काय तो मला अधिक प्रिय आहे.'

## स्वच्छतेने राहा...

बाबासाहेबांनी समाजबांधवांना, विद्यार्थ्यांना वेळोवेळी 'स्वच्छतेने राहायला शिका, दुर्गुण दूर ठेवा' असा मोलाचा संदेश दिला आहे. २९ मे १९५३ रोजी बाबासाहेबांनी मुंबईतील चेंबूर विभागाला भेट दिली. याप्रसंगी बाबासाहेबांना १००१ रुपयाची थैली इमारत फंडाकरिता अर्पण करण्यात आली तेव्हा बाबासाहेब म्हणाले, 'अलीकडील आपल्या समाजातील तरुण-तरुणींचा पोशाख मला आवडतो. नेहमी आपणाजवळ कमीत कमी दोन पोशाख पाहिजेत. पोशाखात चांगला बदल झाला आहे याबद्दल मला समाधान वाटते. स्त्रियांनी चोळी, लुगडी असाच पोशाख वापरावयाचा असला तरी तो व्यवस्थित असावा. पोशाख भारी किमतीचाच असला पाहिजे असे माझे म्हणणे नाही. पोशाख साधा कां असेना पण तो स्वच्छ आणि नीटनेटका असावा.'

बाबासाहेबांकडे महागडे सूट होते. सुटाच्या खिशाला एकाच वेळी सहा पेने असायची. मंत्रिमंडळात असताना लोकसभेतील खासदार आणि मित्र त्यांचा पोशाख पाहून आश्चर्यचकित व्हायचे. प्रत्येक ऋतूत घालता येतील अशा पद्धतीने बाबासाहेबांनी कापडाची निवड सुटांसाठी केली होती. त्यांना जोधपुरी सूटची आवड होती. नागपूरच्या धम्मदीक्षा सोहळ्यासाठी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी वापरलेला पांढरा कोट आणि पांढऱ्या सदऱ्यातील बाबासाहेब कोटी कोटी धम्मबांधवांच्या अंतःकरणात आजही स्मृतिरूपाने साम्राज्य करीत आहेत. बाबासाहेबांनी कोट आणि सदरा दिल्लीहून शिवून आणला होता आणि पांढरेशुभ्र रेशमी धोतर कोईम्बतूरहून मागवले होते. बाबासाहेब घरी लुंगी, धोतर, पायजमा, अंगात बंगाली कुडता व गळ्याला मफलर वापरायचे. अशा अवस्थेत ते एकदा लिहायला बसले असता त्यांच्या डोकीचा स्कार्फ सैल होऊन त्याची दोन टोके कानाच्या दोन्ही बाजूवरून खाली ओघळू लागली. हे पाहून



**नागपूरजवळ चिचोली शांतिवन विहारातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पोशाख.**

जवळच असलेल्या नानकचंदाला गंमत वाटली आणि त्याने एक आरसा बाबासाहेबांच्या समोर धरला. 'हे काय करतोस?' असे ते रागाने म्हणेस्तोवर स्वतःच्या प्रतिबिंबाकडे त्यांचे लक्ष गेले तेव्हा ते मोठ्याने हसले आणि म्हणाले, 'मी कसा राजघराण्यातील अरब राजपुत्रासारखा दिसतो की नाही!' दोघेही मनसोक्त हसले. निरनिराळ्या पोशाखात आपण कसे राहिलो, पोशाख आपणास कसे खुलून दिसायचे, याबद्दलच्या अनेक आठवणी ते नानकचंद रत्तू यांना सांगायचे.

६ डिसेंबर १९५६ रोजी बाबासाहेबांच्या महाप्रयाणानंतर त्यांचे कपडे, कोट त्यांच्या पत्नी माईसाहेब आंबेडकर, निकटचे सहकारी नानकचंद रत्तू तसेच नाशिकच्या शांताबाई दाणी यांनी आयुष्यभर जिवापाड जतन केले. माईसाहेबांनी जतन केलेल्या बाबासाहेबांच्या मौल्यवान वस्तू पुणे शहरातील सिंबायोसिस सोसायटीच्या 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्युझियम व स्मारका'त सुरक्षित आहेत. नानकचंद रत्तू यांनी बाबासाहेबांचे कपडे आणि इतर जीवनोपयोगी वस्तू नागपूरजवळील चिचोली येथील शांतिवन विहाराला दान दिल्या. या ठिकाणी दरवर्षी ६ डिसेंबरला बाबासाहेबांच्या वस्तूंचे दर्शन घेण्यासाठी भीमसैनिकांची अलोट गर्दी उसळते. शांताबाई दाणी यांनी बाबासाहेबांच्या पांढऱ्या रंगाच्या हाफ पॅन्ट, शर्टचे दोन सूट, चॉकलेटी रंगाचा फूल सूट आपल्या रमाबाई आंबेडकर शाळेत सांभाळून ठेवले आहेत.

## मौल्यवान अलंकार

महाडचे थोर समाजसेवक सुरबानाना टिपणीस यांनी बाबासाहेबांचा कोट एखाद्या मौल्यवान अलंकाराप्रमाणे आयुष्यभर सांभाळून ठेवला. नानासाहेबांची आर्थिक परिस्थिती हलाखीची असताना बाबासाहेबांनी नानासाहेबांची ऑल इंडिया रेडियोवर अनाउन्सर म्हणून नेणूक करण्याची शिफारस केली. या नोकरीसाठी मुलाखतीला जाताना नानासाहेबांजवळ चांगले कपडे नव्हते. बाबासाहेबांनी आपला उंची कोट ताबडतोब काढून स्वतः नानासाहेबांच्या अंगावर चढवला आणि त्यांना मुलाखतीस पाठवले. या आठवणीने नानासाहेब नेहमी गहिवरून येत व म्हणत, 'बाबासाहेबांनी आपला कोट माझ्या अंगावर घालून आपल्या मायेची व विश्वासाची शालच मला पांघरली आणि माझ्या जीवनाचे सोने केले.' पुढे तो कोट नानासाहेबांनी बरेच वर्षे वापरला अशी हृदयंगम आठवण नानासाहेबांचे चिरंजीव सतीशचंद्र टिपणीस सांगतात. बाबासाहेब हे स्वतःच्या कपड्यांचे डिझाईन स्वतःच तयार करीत.

संपर्क: ०८१७७८६६३९७ (लेखक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आठवणीचे संग्राहक व बौद्ध साहित्याचे अभ्यासक)



महापरिनिर्वाण दिन

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन कसा पाळावा...

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६२ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त ५ आणि ६ डिसेंबर, २०१८ रोजी येणाऱ्या अनुयायींनी खालील सूचनांचे पालन करण्याचे आवाहन महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीने केले आहे.**

- महापरिनिर्वाण दिन हा दुःखद दिन असल्याने हा दिवस सर्वांनी गांभीर्यपूर्वक पाळावा.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या विचारांचे चिंतन तसेच आत्मपरीक्षण करावे.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करताना शुभ्र वस्त्र परिधान करून सदाचारी जीवन जगण्याचा संकल्प करावा व त्याकरिता २२ प्रतिज्ञांचे स्मरण करावे.
- चैत्यभूमी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादनासाठी येताना महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या आगमन-निर्गमन मार्गाचा वापर करावा. रांगेतून शिस्तीने व शांततेने अभिवादन करावे. दंडावरील, मानेवरील, हातातील काळे धागे-दोरे काढावे.
- सर्वांना सहकार्य करून बाहेरगावाहून अथवा दूरवरून आलेल्या अनुयायांना अभिवादनाच्या रांगेमध्ये प्राधान्य द्यावे.
- स्वयंसेवक, कार्यकर्ते तसेच महापालिका आणि पोलीस दल यांच्या सूचनांचे पालन करावे.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादनासाठी आलेल्या अनुयायांच्या गर्दीत बालक, वृद्ध, महिला हरवण्याची दाट शक्यता आहे, हे लक्षात घेता संपर्काकरिता बालक, वृद्ध, महिला यांच्याजवळ पूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांक द्यावा.
- अनुयायांनी भगवान बुद्धांच्या शांतेचा मार्ग अवलंबून सामुदायिक वंदना म्हणण्याची प्रथा सुरू करावी. कोणत्याही प्रकारची धक्काबुक्की करू नये, कारण छोट्याशा धक्काबुक्कीचे रूपांतर चेंगराचेंगरीत होऊ शकते.
- आलेल्या महिला अनुयायांनी केसांमध्ये गजरे माळू नयेत.
- शिवाजी पार्क (मैदानात) परिसरात मनोरंजनाची साधने खरेदी करू नयेत.
- बुद्ध-आंबेडकर यांच्याशी संबंधित साहित्य, पुस्तके, सीडी, धम्मध्वज, बिल्ले तसेच विज्ञानवादी विचारावर आधारित धम्म दिनदर्शिका विकत घ्याव्यात.
- पिपाण्या / कोणत्याही प्रकारचे वाद्यवृंद वाजवू नये. घोषणा देऊ नयेत. तसेच शिवाजी पार्क (मैदानात) परिसरात अनधिकृतपणे विक्री करणाऱ्या फेरीवाल्यांकडून जुने कपडे विकत घेऊ नयेत.
- बेवारस वस्तूला हात लावू नये व या बाबतीत त्वरित पोलिसांना कळवावे.
- अंधश्रद्धा तसेच अफवा पसरवणाऱ्यांपासून सावध राहावे.
- धूम्रपान करू नये, रहदारीच्या मार्गामध्ये घोळक्याने उभे राहून नागरिकांना अडथळा करू नये.
- स्टॉलमध्ये कुठल्याही प्रकारचे खाद्यपदार्थ शिजवू नये. ज्वलनशील वस्तू / पदार्थ यांचा वापर पूर्णपणे टाळावा. अग्निशमन यंत्रणेकरिता १०१ क्रमांकावर संपर्क साधवा.
- रात्रीच्या वेळी चूल, शेकोटी पेटवू नये, आजूबाजूच्या परिसरात ठिणग्या पसरणार नाहीत, यांची काळजी घ्यावी.
- घातपाती कृत्ये / दुर्घटना टाळण्यासाठी प्रत्येक अनुयायाने दक्षता बाळगावी. संशयित व्यक्ती, वस्तू आढळल्यास त्यांच्यावर पाळत ठेऊन तत्काळ पोलिसांना १०० क्रमांकावर संपर्क साधावा.
- कोणत्याही प्रकारच्या मदतीकरिता पोलीस नियंत्रण कक्ष, महापालिका कक्ष, तसेच महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे स्वयंसेवक यांच्याशी संपर्क साधावा.
- चैत्यभूमी आणि शिवाजी पार्क व अनुयायांच्या वावराकरिता आरक्षित असलेला सर्व परिसर स्वच्छ ठेवावा, कचरा इकडे-तिकडे फेकू नये. (नागसेन कांबळे, सरचिटणीस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समिती, मुंबई.)



















शासनाने गेल्या चार वर्षात जलयुक्त शिवार, मागेल त्याला शेततळे, प्रधानमंत्री आवास योजना, रोजगार व उद्योग निर्मितीसाठी अनेक योजना राबवल्या आहेत. त्यांच्या प्रेरणादायी यशकथा...

# पूर्वीपेक्षा अधिक, पूर्वीपेक्षा उत्तम

होय, प्रगती करतोय महाराष्ट्र माझा

**कृषी क्षेत्राच्या विकासासाठी शासनामार्फत विविध योजना राबवण्यात येत आहेत. या योजनांमुळे शेतकऱ्यांना प्रगती आणि विकासाच्या नव्या वाटा गवसल्या आहेत. काही शेतकरी रेशीम शेती करत आहेत. माळरानावर फुलांच्या बागा फुलल्या आहेत. कृषी सिंचनामुळे उत्पन्न दुपटीने वाढले आहे. कृषी तंत्रज्ञानाचा वापर वाढला आहे.**

# शेत बहरले, समृद्धी आली...

## सह्याद्रीच्या पठारावर सुगंध

समुद्रसपाटी पासून १२०० मीटरवर ... जिथे चाळकेवाडीच्या पठारावर पवनचक्क्यांचा पार्क उभा आहे. त्याहीवर हवेचा आवेग पावसाळ्यात माणूस उडून जाईल असा असतो ... अशा डोंगररांगात चार एकर शेतात रेवंडे (ता. सातारा) गावचा युवक प्रमोद भोसले यांनी कृषी विभागाच्या सहकार्याने सहा जणांना सोबतीला घेऊन सामूहिक शेततळे बांधले आहे.




मुंबई विद्यापीठातून एम. एस्सी (परफ्युमऍंड कॉस्म्याटिक) विषयातील पदव्युत्तर शिक्षण घेतलेला चार वर्षे अत्तर बनवणाऱ्या कंपनीत काम करून आता श्री. भोसले शेती करत आहेत. त्यांनी बांधलेले एक कोटी लीटर क्षमतेचे शेततळे यंदा जवळपास ६० टक्के भरले आहे.

सध्या या क्षेत्रात एकदा झेंडू फुलांचे उत्पन्न प्रयोग म्हणून घेतले आहे. आता सिट्रोडोरा, सिट्रोनेलाया या सुगंधित वनस्पती त्यांनी दूरच्या पर्वतरानातून आणल्या आहेत. लेमन ग्रासची लागवड केली आहे. इथे विजेची व्यवस्था नाही, पण पाण्याची व्यवस्था गुरुत्वाकर्षण बलाच्या प्रयोगातून केली आहे. त्यांच्या शेतकरी गटाला कृषी विभागाने मान्यता दिली आहे. आता येथील शेतकऱ्यांना घेऊन सुगंधी वनस्पतींची लागवड आणि येथेच प्रक्रिया उद्योग सुरू करण्याचे श्री. भोसले यांनी ठरवले आहे.

श्री. भोसले यांनी ६० केसर आंब्यांची झाडे पाणी नसताना डोंगरावर डोक्यावरून पाण्याचे हंडे नेऊन जगवली आहेत. श्री. भोसले यांना रासायनिक सुगंधाच्या इंडस्ट्रीवर मात करून देशात नैसर्गिक सुगंध निर्माण करायचा आहे.



**प्रमोद भोसले**

### कायापालट

कृषी विभागाने सातारा तालुक्यातील रेवंडे हे अतिदुर्गम डोंगरावर वसलेल्या गावात जलसंधारणाची अनेक कामे केली आहेत. भरपूर पाऊस असूनही तीव्र उतारामुळे पाणी जमिनीत न मुरता वाहून जात होते. या भौगोलिक रचनेमुळे नवीन क्षेत्र ओलिताखाली आणणे खर्चीक काम होते. येथील शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने स्वखर्चाने काम करणे शक्य नसल्याने या गावात कृषी विभागाच्या माध्यमातून जलयुक्त शिवार अभियानांतर्गत कामे करण्यास सुरुवात करण्यात आली. गावातील पाण्याचा ताळेबंद तसेच संपूर्ण गावाचा शेती व जलविकासाचा आराखडा तयार करण्यात आला.

मोठ्या प्रमाणावर पडीक असणारे क्षेत्र ओलिताखाली आणण्याच्या दृष्टीने कृषी विभाग व लोक सहभागाच्या माध्यमातून जलसंधारणाची कामे हाती घेण्यात आली. यामध्ये सीसीटी ३० हेक्टर, गावातील २ तळ्यांतील गाळ काढणे, ८ शेततळ्यांची निर्मिती, तसेच १० हेक्टरवर डीप सीसीटी अशी कामे करण्यात आली. या कामांमुळे १०२ टीसीएम पाणीसाठा निर्माण झाला. यासाठी २२ लाख १२ हजार रुपये खर्च करण्यात आले. लोक सहभागातून २ मातीनाला बांधातील व ग्रामतलावातील गाळ मोठ्या प्रमाणात काढण्यात आला.



**रेवंडे (ता. सातारा) येथील डोंगरात लावण्यात आलेली फुलशेती.**

या अभियानामुळे चालू वर्षी पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी साठले. सीसीटीमुळे तलावामध्ये गाळमिश्रित पाणी न येता स्वच्छ पाणी जमा झाले. ओलिताखाली आलेल्या नवीन क्षेत्रांवर शेतकऱ्यांनी ज्वारी, भात, वरी, नाचणी यासारखी पिके घेतल्यामुळे वार्षिक उत्पन्नात भर पडली. जलयुक्त शिवार

अभियानांतर्गत झालेल्या कामांमुळे रेवंडे या गावातील शेतकरी कुक्कुटपालन, पशुपालन, दुग्धोत्पादन असे शेतीपूरक जोड व्यवसायही करत आहेत. गावामध्ये १ कोटी लीटर पाणीक्षमतेचे एक सामूहिक शेततळे घेतले आहे. यात सध्या ६० ते ७० लाख लीटर पाणी आहे. कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली जांभूळ, आंबा, आवळा, सुगंधी वनस्पती आदी फळपिके शेतकरी घेत आहेत. ■■



**जाधववाडी (ता. कोरेगाव) येथील रानमाळावर रामचंद्र जाधव यांनी बांधलेले शेततळे.**

## डोंगरात बागायत

कोरेगाव तालुक्याचा उत्तरेचा भाग म्हणजे सह्याद्रीच्या सावलीचा प्रदेश त्यामुळे पर्जन्यमान अतिशय कमी. या भागात जाधववाडी गाव आहे. या गावचा शिवार खडकांचा, डोंगरमाथ्याचा आहे. शेकडो एकर रानमाळावर कुसळ गवत आहे. वाटार स्टेशनपासून पुढे तीन साडेतीन किलोमीटर अंतरावर रामचंद्र जाधव यांची शेती आहे. त्यांचा एक मुलगा सैन्यात आहे. तर दुसरा मुलगा त्यांच्यासोबत शेती करतो. दीड वर्षात एकूण सोळा एकर जमिनीपैकी बारा एकर जमीन त्यांनी ओलिताखाली आणली. शेतातील मोठमोठे दगड काढून गाळाची माती ट्रॅक्टरने आणून टाकली. खडकाळ जमीन शेतीयोग्य केली. त्यांच्या शेताच्या बाजूला ओढा आहे तिथे विहीर खोदली. कूपनलिका घेतली. कृषी विभागाच्या मदतीने शेततळे खोदले. विहीर आणि कूपनलिकेमध्ये जे पाणी असेल ते यात घेतले. शेती करायला घेतली. रोजगार हमी योजनेच्या मदतीने शेतात डाळींब लावले. डाळींब मोठे होईपर्यंत आंतरपीक म्हणून आल्याचे पीक घेतले. टोमॅटो लावले. या आंतरपिकातून ९ लाखांचे उत्पन्न झाले. यावर्षी फक्त २५० मिलीमीटर पाऊस होऊनही पिकाला पुरेल एवढे पाणी आहे. ते ठिबकने वापरले जाते.

**– युवराज पाटील**

जिल्हा माहिती अधिकारी, सातारा

■■

## रेशीम शेती फायद्याची

हिंगोली जिल्ह्यात प्रामुख्याने सोयाबीन, कापूस, तूर, ज्वारी इत्यादी कोरडवाहू तर ऊस, हळद, केळी ही पिके घेतली जातात. अलीकडील काही काळात जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा कल सोयाबीन व हळद पिकाकडे अधिक वाढलेला दिसून येते. पाहता हिंगोली जिल्ह्याचे सिंचित क्षेत्र सुमारे १४ ते १५ टक्क्यांच्या आसपास आहे. केंद्र व राज्य शासनाच्या पुढाकारातून या जिल्ह्यात शेतीपूरक व्यवसाय म्हणून रेशीम कोष उत्पादनाला प्रोत्साहन दिले जात आहे.




### विक्रमी उत्पन्न

२०१७-२०१८ मध्ये शासनाने जिल्ह्याला सुमारे २०० एकर क्षेत्रावर तुतीच्या लागवडीचे उद्दिष्ट दिले होते. परंतु दिलेल्या उद्दिष्टापेक्षा ३२२ एकर क्षेत्रावर तुतीची लागवड करण्यात आली. या लागवडीवर १ लाख १८ हजार ३०० अंडीपुंजांचे संगोपन होऊन त्यापासून ७०.६० टन एवढे कोष उत्पादन झाले. या कोष विक्रीतून शेतकऱ्यांना ३१०.२६ लक्ष रुपयांचे उत्पन्न मिळाले.

रेशीम कोषाच्या उत्पादनातून शेतकऱ्यांच्या हातात प्रतिमहा नगदी पैसा येत आहे. रेशीम उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांची आर्थिक स्वावलंबनाकडे वाटचाल सुरू झाली आहे. या रेशीम उत्पादक शेतकऱ्यांनी आपल्या शेतात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राबवल्याने ४५ हजार ७२६ मनुष्य दिवस एवढा रोजगार निर्माण झाला. रेशीम कोष उत्पादनाबरोबर मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती झाली.

२०१८-२०१९ या वर्षाकरिता जिल्ह्याला २०० एकर क्षेत्रावर तुतीच्या लागवडीचे उद्दिष्ट देण्यात आले. त्यानुसार सुमारे ४५० शेतकऱ्यांनी शेतीपूरक व्यवसाय म्हणून आतापर्यंत ८०२ एकर क्षेत्रावर तुतीची लागवड केली. याकरिता ५२ हजार अंडीपुंजांचे संगोपन करून यापासून ९.५१३ टन कोष उत्पादन झाले. यामुळे ३२ लाख रुपयांचे उत्पन्न शेतकऱ्यांना मिळाले.

> शेतीमध्ये सिंचनाची व्यवस्था असेल आणि १ लाख ते ५० हजार रुपये महिना उत्पन्न हवे असल्यास रेशीम शेती हा उत्तम पर्याय ठरू शकतो. एकदा लागवड केली की १० ते १५ वर्ष दरमहा उत्पन्न देणारे हे पीक आहे.

हिंगोली व वसमत शहरापासून ३५ किलोमीटर अंतरावर असणारे पांगरा शिंदे गाव आता रेशीमचे गाव म्हणून ओळखले जाते. इतर गावांसाठी आदर्श ठरले आहे. या वर्षीचा संत गाडगेबाबा जिल्हास्तरीय पुरस्कार या गावास प्राप्त झाला आहे. या गावातील पिण्याच्या पाण्याचे व्यवस्थापन उत्तमरीत्या केलेले असून, प्रत्येक घराला मीटरने १ पैसा लीटर या

दराने पाणीपुरवठा केला जातो. पाण्याचे व्यवस्थापन करणाऱ्या गावातील शेतकरीसुद्धा कापूस, सोयाबीन, तूर, हरभरा मोठ्या प्रमाणात हळद हीच पारंपरिक पिके घेत. नैसर्गिक आपत्ती आली की, मग नैराश्यग्रस्त होत. परंतु गावातील सुमारे ४० शेतकऱ्यांनी शेतीला पूरक व्यवसाय म्हणून रेशीम शेतीचा पर्याय निवडला आणि गावाचा कायापालट झाला. या गावातील रेशीम उद्योग पाहण्यासाठी अनेक शेतकरी भेट देतात. जम्मू काश्मीर येथील शेतकऱ्यांनीदेखील येथे येऊन रेशीम शेतीची माहिती व मार्गदर्शन घेतले आहे. या गावातील सोपानराव शिंदे यांनी गावात पहिल्यांदा ५ वर्षांपूर्वी एक एकरमध्ये रेशीम शेतीचा प्रयोग केला. याकरिता त्यांनी हिंगोली रेशीम कार्यालय व पश्चिम महाराष्ट्रातून रेशीम शेतीविषयक माहिती घेतली. रेशीम कार्यालयाने कीटक संगोपन केंद्र बांधण्याकरिता श्री. शिंदे यांना ८७ हजार ५०० रुपयांचे अनुदान उपलब्ध करून दिले. रेशीम शेतीची सुरुवात करताना गावातील ग्रामस्थांनी श्री. शिंदे यांना त्या वेळी वेड्यात काढले. परंतु शिंदे यांनी लोकांच्या बोलण्याकडे लक्ष न देता आपले काम चालू ठेवले. सहा महिन्यातच त्यांना दरमहा उत्पन्नाचा कायमस्वरूपी स्रोत निर्माण झाला. एक एकरमध्ये उत्पादित झालेले रेशीम कोष त्यांनी कर्नाटक, आंध्रप्रदेश राज्यात जाऊन विकले. यातून त्यांना चांगले उत्पन्न मिळाले.

### एकराला ३ लक्ष रुपयांचे उत्पन्न !

श्री. शिंदे यांनी एक एकर तुती शेतीचे योग्य नियोजन केले. कोल्हापुरी शिरपूर पॅटर्न बंधाऱ्यातून त्यांनी तुतीला पाणी दिले. एका वर्षात ते चार उत्पादन घेतात. सुमारे १५० अंडीपुंजांपासून त्यांना सरासरी १.५ क्विंटल रेशीम कोषाचे उत्पादन एका महिन्यात होते. एक क्विंटलला साधारणपणे ५० हजार रुपये यानुसार एका महिन्याला सुमारे ७५ हजार आणि वर्षाला ३ लक्ष रुपयाचे उत्पन्न एका एकरात श्री. शिंदे यांना मिळत आहे. या उत्पन्नातून श्री. शिंदे यांनी आपले स्वत:चे घर बांधले, दोन चाकी गाडी घेतली. विशेष म्हणजे त्यांची मुले नांदेड येथे उच्च शिक्षण घेत आहेत. हा सर्व खर्च त्यांना रेशीम शेतीतून होणाऱ्या उत्पादनातून करणे शक्य झाले. या रेशीम शेतीसाठी त्यांना 'रेशीमरत्न', 'प्रगतशील शेतकरी' पुरस्कार प्राप्त झाला असून, या वर्षीच्या जिल्हा कृषी रत्न पुरस्कारानेदेखील त्यांना गौरवण्यात आले आहे.

### रेशीम शेती वाढली

श्री. शिंदे यांची दिवसेंदिवस होत असलेली प्रगती पाहून पांगरा शिंदे गावातील इतर शेतकरीदेखील हळूहळू तुती लागवडीकडे आता वळले आहेत. गावातील सुमारे ४० शेतकरी रेशीम शेती करत आहेत. गावात उत्पादित होणाऱ्या रेशीम कोषाचे उत्पादन कर्नाटकमधील रामनगर येथे एकत्रितपणे पाठवले जाते. कधी व्यापारीदेखील गावात येऊन कोष खरेदी करतात. यामुळे गावात ७५ लाख ते १ कोटी रुपयांची उलाढाल या शेतीतून होत असून, शेकडो मजुरांना रोजगारदेखील प्राप्त झाला आहे. श्री. शिंदे निःस्वार्थ भावनेने मास्टर ट्रेनर म्हणून काम करतात. इतर जिल्ह्यात जाऊन तेथील शेतकऱ्यांना तुतीच्या लागवडीपासून कोष निर्मितीपर्यंतचे ते प्रशिक्षण देतात. या वर्षी तर त्यांनी महाराष्ट्रातील सुमारे ५० ते ६० शेतकऱ्यांना रेशीम उद्योगाचे प्रशिक्षण दिले.



**पांगरा शिंदे (जि. हिंगोली) येथील सोपानराव शिंदे यांची रेशीम शेती.**

### फायदाच फायदा

तुती लागवड करण्यासाठी सिंचन व्यवस्था असणे आवश्यक आहे. एकदा तुती लागवड केली की १२ ते १५ वर्षे यापासून उत्पन्न मिळू शकते. महात्मा गांधी रोजगार हमी योजनेतून यासाठी अनुदान मिळते. तीन वर्षात २ लाख ९० हजार रुपये प्रतिएकर अनुदान दिले जाते. यामध्ये शेड बांधकाम व इतर साहित्य खरेदी आणि नागरटीपासून लागवडीचे पैसे मिळतात. जिल्हा रेशीम अधिकारी यांच्याकडे अंडीपुंज मागणी करावी लागते. तुतीच्या वाढीसाठी सेंद्रिय खताशिवाय कोणतेही रासायनिक खत, फवारे देण्याची गरज नाही. लागवड खर्च, खते, फवारणी या खर्चातून सुटका मिळते. मजुरांचा खर्च कमी असून, महिन्यातून आठ दिवसाकरिता एक मजूर पुरेसा आहे. तुतीला कोणतेही जनावर खात नाही. हिंगोली जिल्ह्यात उन्हाळ्याच्या कालावधीत तापमान जास्त असल्यामुळे एप्रिल, मे महिन्यात कोष उत्पादन करणे शक्य नाही. पण उर्वरित १० महिने कोषाचे उत्पादन घेता येते. अळ्यांची विष्ठा खत म्हणून शेतात वापरता येते. तुतीच्या काड्या जनावरे खातात. त्यामुळे दूध उत्पादनात वाढ होते. या काड्यांचा कंपोस्ट खतासाठी चांगला उपयोग होतो.

राज्यात राबवण्यात येणाऱ्या १३ कोटी वृक्षलागवड उपक्रमांतर्गत जिल्ह्यात २४ लाख ५५ हजार ७५० तुती वृक्षांची लागवड करण्यात आली. शेतकऱ्यांनी किमान पाण्याची व्यवस्था असल्यास इतर पिके घेण्यापेक्षा हमखास दरमहा हातात पैसे मिळवून देणाऱ्या व कमी पाण्यावर येणाऱ्या रेशीम कोषाचे उत्पन्न घ्यावे. या माध्यमातून टंचाईच्या परिस्थितीमध्येही अगदी कमी पाण्यातूनही उत्पन्नात सातत्य ठेवता येते.

**अरुण सूर्यवंशी**
जिल्हा माहिती अधिकारी, हिंगोली

## रेशीम हमी

यवतमाळ जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा शेती आहे. १६ तालुके असलेल्या या जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्र १३ लक्ष ५१ हजार ९६६ हेक्टर आहे. यात ९ लक्ष ६० हजार ५०० हेक्टरवर पीक लागवड केली जाते. कापूस आणि सोयाबीन या पिकांवर शेतकऱ्यांचा जास्त भर असतो. त्यामुळेच 'पांढरे सोने' अशी जिल्ह्याची ओळख बनली आहे. आता मात्र या पिकांबरोबरच जिल्ह्यातील शेतकरी तुती लागवडीकडे वळत असल्यामुळे रेशीम उद्योगाला हातभार लागत आहे.



तुती लागवड

कृषीवर आधारित रोजगाराची प्रचंड क्षमता असलेला आणि ग्रामीण भागाचा कायापालट करणारा व्यवसाय म्हणून रेशीम शेतीकडे बघितले जाते. यवतमाळ जिल्ह्याची भौगोलिक परिस्थिती व हवामान या उद्योगास अनुकूल आहे. उत्पादनाची शाश्वती देणारा हा उद्योग असल्यामुळे जिल्ह्यात गतवर्षीच्या तुलनेत तुती लागवडीचे उद्दिष्ट चारपट ठेवण्यात आले. गतवर्षी केवळ ५०० एकरवर तुतीची लागवड करण्यात आली. या वर्षी मात्र दोन हजार एकरांवर तुती लागवड करण्यासाठी शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे.

शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणे, शेती उद्योगावर आधारित रोजगार निर्मिती करणे व शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारणा करणे हा शासनाचा मुख्य हेतू आहे. यवतमाळ जिल्ह्याचे हवामान रेशीम शेतीला अनुकूल असल्यामुळे जिल्ह्यात एकूण १२ तालुक्यात तुती लागवडीचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. रेशीम कोष निर्मिती कामामध्ये मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध करून दिला जात आहे.

गत तीन वर्षात जिल्ह्यातील एकूण ७४४ शेतकऱ्यांनी १ हजार २४ एकरांवर तुतीची लागवड केली. यात एकूण १ लक्ष ४९ हजार ६१६ किलोग्रॅम कोष उत्पादन झाले. यात २०१५-१६ मध्ये १४६ शेतकऱ्यांनी २५१ एकरांवर केलेल्या लागवडीतून ४२ हजार ५४६ किलोग्रॅम कोष उत्पादन, २०१६-१७ मध्ये २१३ शेतकऱ्यांनी ३०२ एकरांवर ४७ हजार ५२ किलोग्रॅम. कोष उत्पादन तर २०१७-१८ मध्ये ३८५ शेतकऱ्यांनी ४७१ एकरांवर ६० हजार १८ किलोग्रॅम कोष उत्पादन घेतले.




गतवर्षी २०१७-१८ मध्ये यवतमाळ तालुक्यातील २८ शेतकऱ्यांनी ४६ एकरांवर २ हजार ७५९ किलोग्रॅम कोष उत्पादन, उमरखेड तालुक्यातील ९६ शेतकऱ्यांनी ११८ एकरांवर २५ हजार ५०३ किलोग्रॅम कोष उत्पादन, महागाव तालुक्यातील ३२ शेतकऱ्यांनी ४० एकरांवर ८ हजार ८७ किलोग्रॅम कोष उत्पादन, पुसद तालुक्यातील ५९ शेतकऱ्यांनी ७६ एकरांवर ७ हजार ६४ किलोग्रॅम कोष उत्पादन, नेर तालुक्यातील ४९ शेतकऱ्यांनी ५३ एकरांवर ५ हजार ५२० किलोग्रॅम कोष उत्पादन, बाभुळगाव तालुक्यातील ४९ शेतकऱ्यांनी ५१ एकरांवर ६ हजार ६६७ किलोग्रॅम कोष उत्पादन, राळेगाव तालुक्यातील ३० शेतकऱ्यांनी ३९ एकरांवर ४ हजार १२३ किलोग्रॅम कोष उत्पादन आणि कळंब तालुक्यातील २१ शेतकऱ्यांनी २३ एकरांवर २९५ किलोग्रॅम कोष उत्पादन असे एकूण ४७१ एकरांवर ६० हजार १८ किलोग्रॅम कोष उत्पादन घेतले.

२०१८-१९ मध्ये १६०९ शेतकऱ्यांनी तुती लागवडीकरिता नोंदणी केली. सद्य:स्थितीत जिल्ह्यात ५३० एकरांवर तुतीची लागवड झाली आहे. सप्टेंबर अखेरपर्यंत संपूर्ण दोन हजार एकरांवर लागवड

### सिल्क आणि मिल्क

हवामानाचा असमतोल बघता शेतकऱ्यांनी शेतीपूरक उद्योगाकडे वळणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी रेशीम उद्योग हा एक चांगला पर्याय आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना रेशीम लागवडीचा फायदा होऊ शकतो, या उद्देशाने जिल्हा प्रशासनाने नियोजन केले. इतर पिकांच्या तुलनेत तुतीला कमी पाणी लागते. कमी खर्चात जास्त उत्पनाची हमी आहे. उरलेल्या तुतीपाल्याचा दुधाळ जनावरांसाठी खाद्य म्हणून उपयोग करता येतो. त्यामुळे दुग्धउत्पादन वाढण्यास मदत होईल व 'सिल्क आणि मिल्क' ही संकल्पना शेतकऱ्यांच्या मनात रुजवण्यास वेळ लागणार नाही.

**- जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख**

करण्याचे नियोजन आहे. यासाठी ६८ लक्ष रोपे उपलब्ध आहेत. या वर्षी यवतमाळ तालुक्यातील ८६ शेतकरी १०१ एकरांवर, उमरखेड तालुक्यातील ६०३ शेतकरी ६२४ एकरांवर, महागाव तालुक्यातील २०२ शेतकरी २१० एकरांवर, पुसद तालुक्यातील १५३ शेतकरी १७० एकरांवर, दिग्रस तालुक्यातील ८४ शेतकरी ८४ एकरांवर, नेर तालुक्यातील १४१ शेतकरी १४४ एकरांवर, घाटंजी तालुक्यातील २४ शेतकरी २४ एकरवर, बाभुळगाव तालुक्यातील ११५ शेतकरी ११५ एकरांवर, आर्णी तालुक्यातील ४३ शेतकरी ४३ एकरांवर, राळेगाव तालुक्यातील ७५ शेतकरी ८३ एकरांवर, कळंब तालुक्यातील २६ शेतकरी २६ एकरांवर अशा एकूण १५५२ शेतकऱ्यांनी १ हजार ६२५ एकरांवर तुती लागवडीचे नियोजन केले आहे.

### रोल मॉडेल

महागाव तालुक्यातील अंबोडा येथील सुरेश प्रकाशराव पतंगराव हे रेशीम उत्पादक शेतकरी म्हणून नावारूपास आले आहेत. जिल्ह्यातील इतर शेतकऱ्यांचे 'रोल मॉडेल' बनले आहेत. गतवर्षी शेतातील उत्पादित कोष त्यांनी बेंगळुरु येथील रामनगर येथे विक्री केल्यानंतर मिळालेल्या पैशातून ते विमानाने परत आले.

सुरेश पतंगराव यांच्याकडे सात एकर शेती आहे. सुरवातीला ते कापूस, सोयाबीन, गहू, ऊस अशी पारंपरिक पिके घेत. हिंगोली जिल्ह्यातील घरोला येथे एका नातेवाईकाकडे त्यांनी तुती लागवडीबाबत ऐकले. शेतीतून कमी वेळात जास्त पैसे मिळवायचे असेल तर तुती लागवड हा चांगला पर्याय आहे, असे त्यांना नातेवाईकाने सांगितले. सुरुवातीला २०१४-१५ मध्ये एक एकरमध्ये त्यांनी हा प्रयोग करून पाहिला. यातून कमी वेळात चांगले उत्पन्न मिळाल्यामुळे श्री. पतंगराव आता पूर्णपणे रेशीम शेतीकडे वळले आहेत. २०१६-१७ मध्ये रेशीम उत्पादनातून १ लक्ष ९८ हजार रुपयांचे तर २०१७-१८ मध्ये ३ लक्ष ४ हजार रुपयांचे उत्पन्न त्यांना मिळाले.

**राजेश येसनकर**
जिल्हा माहिती अधिकारी, यवतमाळ

## कृषिपंपाने द्राक्षबाग फुलली



**सोनांबे (ता. सिन्नर) येथील शेतकरी संजय बोडके यांच्या शेतीतील सौर कृषिपंप.**

सिन्नर तालुक्यातील सोनांबे येथील शेतकरी संजय बोडके यांनी सौर कृषिपंपाचा वापर करून आपली बागायती शेती फुलवली आहे. शेततळ्यातील पाणी कृषिपंपाच्या साहाय्याने शेताला देता येत असल्याने उन्हाळी कांद्यालाही त्याचा लाभ होणार आहे.

सिन्नर तालुका कमी पर्जन्यमानासाठी ओळखला जातो. त्यामुळे पावसानंतर रब्बी किंवा उन्हाळी पिकांचा विचार फार कमी शेतकरी करतात. विहीर किंवा शेततळ्याचा उपयोग करून बऱ्याच ठिकाणी आता दुसरे किंवा तिसरे पीक घेतले जाते. मात्र सिंचनासाठी समस्या असते विजेची. लोडशेडिंगमुळे वेळेवर शेताला पाणी देता येत नाही. ही समस्या दूर करण्यासाठी शासनाने सौर कृषिपंप योजना सुरू केली.




प्रारंभी शेतकरी त्यावर विश्वास ठेवायला तयार नव्हते. श्री. बोडके यांच्याकडे दोन विहिरी आणि शेततळे होते. मात्र विजेच्या अनियमिततेमुळे पिकांना वेळेवर औषधे व पाणी देणे शक्य होत नसे. त्यामुळे श्री. बोडके यांनी २०१६ मध्ये सौर कृषिपंपासाठी अर्ज केला. ३ हॉर्सपॉवरच्या कृषिपंपाची किंमत साधारण चार लाख रुपये होती. शेतकऱ्याला केवळ पाच टक्के रक्कम भरावयाची असल्याने श्री. बोडके यांनी २० हजार २५० रुपये महावितरणच्या कार्यालयात भरले.

जैन सोलर पंपच्या प्रतिनिधींनी कृषी पंप शेतात बसवून दिला. दिवसा सिंचनाची सुविधा झाल्याने शेत फुलायला लागले. द्राक्षाचे क्षेत्र साडेतीन एकराने वाढले. सोयाबीनसोबत टोमॅटे आणि कांदे शेतात पिकू लागले.

तीन वर्षात देखभालीसाठी एकही पैसा खर्च झाला नसल्याचे श्री. बोडके सांगतात. विजेची वाट पाहावी लागत नसल्याने कृषी कामांनी वेग घेतला आहे. भविष्यात बागायती क्षेत्र वाढवता येईल, असा विश्वास त्यांच्या मनात कृषिपंपामुळे निर्माण झाला आहे. शासनची योजना लाभदायक ठरल्याचे सांगताना आपण अर्ज करताना पुढाकार घेतल्याने त्याचा फायदा झाल्याचा आनंदही त्यांच्या चेहऱ्यावर दिसतो.

होय, प्रगती करतोय महाराष्ट्र माझा

## धवलक्रांतीची प्रेरणा



आडवाडी (ता. सिन्नर) येथील शेतकरी भाऊराव रामचंद्र बिन्नर गायींसोबत.

सिन्नरपासून २० किलोमीटर अंतरावर असलेले आडवाडीगाव डोंगरावर वसलेले आहे. संपूर्ण डोंगर परिसरात वाळलेल्या गवताशिवाय काहीच दिसत नाही. मधूनच एखादे शेततळे आणि त्याभोवती हिरवी पिके दिसतात. गेल्या तीन वर्षांपासून पाऊस अत्यंत कमी झाल्याने शेतकऱ्यांना पिके जगवणे कठीण झाले. पारंपरिक भात पीकही धोक्यात आले. अशा परिस्थितीत भाऊरावने दुग्धोत्पादनातून आपल्या कुटुंबाला सावरले.

भाऊरावचे वय २२ वर्षे, घरची पारंपरिक शेती करताना ते भात पीक घेतात. म्हैस आणि जर्सी गायींचे पालन करून दूध विक्री करतात. या वर्षी कोरडवाहू शेती विकास योजनेतून त्यांना गीरगायीसाठी २० हजारांचे अनुदान मिळाले. गीरगायीचे दूध जर्सी गायीपेक्षा अधिक मिळाल्याने त्यांनी आणखी एक गाय खरेदी केली.

पूर्वी जर्सी गायीच्या दूध विक्रीतून दिवसाला केवळ अडीचशे रुपये मिळत असत. जर्सीला खुराकही चांगला लागे. त्यामुळे उत्पन्न जास्त येत नव्हते. गीरगायीमुळे एका दिवसात साडेसातशे पर्यंत उत्पन्न मिळत असल्याने त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत झाली. पुढील काळात या गायींची संख्या वाढवण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला.

गावात कृषी विभागाने या योजनेंतर्गत आतापर्यंत ४० गायी दिल्या. गावात २०० लीटरने दुग्धोत्पादन वाढले. शेतकऱ्यांनी एकत्र येऊन 'नंदन वैभव शेतकरी गट' स्थापन केला. त्याद्वारे दुग्धजन्य पदार्थांची विक्री केली जाते. प्रत्येक शेतकऱ्याला त्यामुळे महिन्याला दोन ते चार हजार रुपये अतिरिक्त लाभ होतो. कृषी विभागातर्फे योजनेंतर्गत मुरघास युनिट, पॅकहाऊस, आणि कंपोस्ट युनिटलाही अनुदान देण्यात येणार आहे.

निसर्ग कोपला असताना गावात आलेल्या गीरगायींमुळे शेतकऱ्यांना धवलक्रांतीकडे वळण्याची नवी प्रेरणा मिळाली. सिन्नरच्या बाजारात या गटाने प्रवेश केला आहे. ब्रँडिंग आणि पॅकेजिंगचे तंत्र आत्मसात करून उत्पन्न वाढवण्याकडे या शेतकऱ्यांची वाटचाल सुरू आहे.

## वाद मिटले, प्रगती झाली...

निफाड तालुक्यातील अंतरवेली गावात महाराजस्व अभियानांतर्गत दोन किलोमीटर लांबीचा शिवार रस्ता मोकळा झाल्याने संजय महाले यांच्या शेतातील पीक पद्धत बदलली. पारंपरिक पिकांची जागा आता द्राक्षबागा आणि भाजीपाला पिकाने घेतली आहे.

अंतरवेली आणि जऊळके गावाला जोडणाऱ्या या भागातून सरस्वती नदीचे पात्र जाते. काही शेतकरी नदीलगत शेती करत असल्याने हा रस्ता अदृश्य झाला होता. रस्त्याअभावी महालेंचा भर पारंपरिक पिकांवर होता. त्यांचे वडील भोपळ्याचे पीक घेऊन नदीपात्रातून भोपळा मुख्य रस्त्यापर्यंत प्रवाहासोबत आणायचे व गाडीत भरायचे.

बैलगाडीने वाहतूक करण्याला मर्यादा होती. दोन वर्षापूर्वी चार चाकी वाहन खरेदी केले. मात्र मुख्य रस्त्यापर्यंत शेतमाल आणण्याची समस्या कायम होती. शेतकऱ्यांची घरे शिवारातच असल्याने पावसाळ्यात मुलांना शाळेत जायला आणि रुग्णांना उपचारासाठी नेण्यातही अडचण येत असे. रात्रीच्या वेळी गावात येणेदेखील कठीण होते. श्री. महाले यांच्यासोबत इतर ६० ते ७० शेतकऱ्यांची समस्यादेखील सारखीच होती. स्थानिक मंडळ अधिकारी यांनी पुढाकार घेतला. शिवार रस्ता मोकळा करण्यासाठी सामोपचाराने मार्ग काढण्यात त्यांना यश आले.

दोन किलोमीटर लांबीचा रस्ता आता मोकळा झाला आहे. रस्त्यावरून ट्रॅक्टर, पिकअपची ये-जा सुरू झाली आहे. खते बांधापर्यंत येतात आणि शेतमाल थेट बांधावरून बाजारात जातो. मुलांना शाळेत जाण्यासाठी चांगली सोय झाली आहे.

शिवारात आता द्राक्ष बागा आणि भाजीपाला पिके उभी राहिलेली दिसतात. टोमॅटोने भरलेली वाहने रस्त्यावरून जाताना दिसतात. परिसरातील शेतकऱ्यांनी स्वत: वर्गणी एकत्रित करून रस्त्याचे काम केले. रस्ता आणखी मजबूत करण्यासाठी देखील प्रत्येक जण आपला वाटा उचलायला तयार आहे. रस्त्याच्या निमित्ताने शेतकरी एकत्र आले. गावात जलयुक्त शिवार अभियानही यशस्वीपणे राबवण्यात आले

निफाड तालुक्यात महाराजस्व अभियान यशस्वीपणे राबवण्यात येत आहे. या अंतर्गत साधारण १५ किलोमीटर लांबीचे पाणंद आणि शिवार रस्ते मोकळे करण्यात आले आहेत. त्याचा दोन हजारांपेक्षा अधिक शेतकऱ्यांना लाभ झाला.



अंतरवेली (ता. निफाड) येथे करण्यात आलेला शिवार रस्ता.

आहे.

निफाड तालुक्यातील १२ गावांत २०-२५ वर्षे जुने वाद असलेले रस्ते महाराजस्व अभियानांतर्गत सामोपचाराने मोकळे करण्यात प्रशासनाला यश आले आहे. तयार झालेले शिवार रस्ते, पाणंद रस्ते गावाच्या प्रगतीचे मार्ग ठरत आहेत.

**-डॉ. किरण मोघे**

जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक

## मृद् परीक्षणाचा फायदा

सांगली जिल्ह्यात आढळणाऱ्या जमिनीचे तालुकानिहाय, गावनिहाय जमिनीचे भौतिक, रासायनिक व जैविक गुणधर्म भिन्न आहेत. तसेच जिल्ह्याचा सर्वसाधारण सुपीकता निर्देशांक पाहता पोटॅश (पालाश)चे प्रमाण भरपूर असले तरी नत्र व स्फुरदचे प्रमाण अत्यंत कमी ते मध्यम प्रमाणात आहे. त्यामुळे माती परीक्षण करूनच पिकांस खताच्या मात्रा देणे गरजेचे आहे.

जिल्ह्यात २०१८-१९ या वर्षी एकूण ५६ हजार मृद नमुने तपासणीचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. सद्य:स्थितीत २१ हजार नमुने प्रयोगशाळेमध्ये विश्लेषण करून ३३ हजार ५३४ मृद् आरोग्यपत्रिकांचे वितरण करण्यात आले. मिरज तालुक्यातील महादेव गणपती जाधव आणि वाळवा तालुक्यातील विजय जगन्नाथ पाटील यांनी माती परीक्षणाचा लाभ घेतला आहे.मिरज तालुक्यातील हरिपूर येथील महादेव गणपती जाधव हे माजी सैनिक. घरी पत्नी आणि दोन मुले. पण, निवृत्तीनंतर अन्य दुसऱ्या नोकरीचा पर्याय स्वीकारला नाही. पूर्ण वेळ शेती करण्याचा त्यांनी निश्चय केला. त्यांची पाच एकर शेती आहे. त्यांचा पूर्ण उदरनिर्वाह शेतीवर अवलंबून आहे. त्याचबरोबर त्यांचा भाऊही पूर्ण वेळ शेती करतो. माती परीक्षणाचे महत्त्व, गरज आणि फायदे यांची माहिती मिळाल्यानंतर श्री. जाधव यांनीही माती परीक्षण करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर मातीमध्ये असलेल्या घटकांची माहिती त्यांना मिळाली. त्यानुसार त्यांनी केळी पीक घेण्यास सुरुवात केली. त्यात त्यांना चांगला फायदा झाला.




सांगली जिल्ह्यामध्ये एकूण ३ लाख ९४ हजार ६० हेक्टर जिरायत क्षेत्र आहे. या क्षेत्रामधून एकूण ३९ हजार ४०६ मृद् नमुने घेतले आहेत. १ लाख ७० हजार ८०० हेक्टर बागायती क्षेत्र आहे. या क्षेत्रामधून ६८ हजार ३०० मृद् नमुने घेतले आहेत. एकूण १ लाख ७ हजार ७२५ मृद् नमुने तपासणीचे प्रत्येक दोन वर्षाच्या फेरीमध्ये उद्दिष्ट आहे. त्यानुसार २०१५-१६ ते २०१६-१७ या कालावधीत १ लाख ७ हजार ७६० मृद् नमुन्यांचे प्रयोगशाळेमध्ये विश्लेषण करून ६ लाख २४ हजार ३०० जमीन आरोग्यपत्रिकेचे वाटप करण्यात आले.

२०१७-१८ या पहिल्या वर्षी ५२ हजार ७५० मृद् नमुन्यांचे विश्लेषण करून २ लाख २८ हजार ३०० जमीन आरोग्यपत्रिका वितरित करण्यात आल्या. २०१८-१९ या दुसऱ्या वर्षी एकूण ५६ हजार मृद नमुने तपासणीचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. आतापावेतो २१ हजार मृद् नमुने प्रयोगशाळेमध्ये विश्लेषण करून ३३ हजार ५०० मृद् आरोग्य पत्रिकांचे वितरण करण्यात आले. उर्वरित सर्व नमुन्यांची तपासणी १५ फेब्रुवारी अखेर पूर्ण करून जमीन आरोग्य पत्रिका वितरण करण्यात येणार आहेत.

**संप्रदा बीडकर**

माहिती अधिकारी, सांगली

### उत्पादनात वाढ



'मला माती परीक्षणाचा लाभ झाला. माझी १० एकर शेती आहे. पूर्वीपासून ऊस आणि सोयाबीनची शेती करतो. एकरी ५० ते ५५ टन उसाचे उत्पादन निघत होते. त्या वेळी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी माती परीक्षणाची माहिती दिली. हे परीक्षण करून घेतल्यानंतर अधिकाऱ्यांनी सुचवल्यानुसार खतांची मात्रा दिली. त्यामुळे खतांचा खर्च कमी झाला. चालू वर्षी एकरी ८० ते ८५ टन उत्पादन निघेल, असा मला विश्वास वाटतो.'

**- विजय जगन्नाथ पाटील, शेतकरी, कामेरी (ता. वाळवा)**




## मृदा आरोग्य पत्रिका

राहाता तालुक्यातील लोणी गावापासून चार किलोमीटर अंतरावर दुर्गापूर नावाचे गाव आहे. गावात बहुतांश कुटुंबे शेती करतात. याच गावात लक्ष्मणराव पुलाटे यांची वडिलोपार्जित शेती आहे. शेतजमिनीच्या आरोग्याची माहिती नसल्यामुळे खतांची मात्रा किती द्यावी, केव्हा द्यावी याची त्यांना कल्पना नव्हती. अशा परिस्थितीत शेतीत खर्च आणि उत्पन्न हे समीकरण जुळत नव्हते.

शेतजमिनीच्या पोतावर शेतकऱ्यांना पेरणी करता यावी यासाठी शासनाने सुरू केलेल्या मृदा (माती) आरोग्य अभियानाची माहिती श्री. पुलाटे यांनी घेतली. या अभियानांतर्गत जमिनीची प्रतवारी तपासल्यामुळे शेती फायद्याची झाली.




शेत जमिनीमधील घटकांचे प्रमाण समजले. काय कमी आहे, किंवा काय जास्त आहे, याची माहिती मिळाली. परिणामी शेतात खते, सूक्ष्म अन्नद्रव्ये, जैविक खते टाकून ती कमी भरून काढण्यात आली. जास्त असल्यास वापर कमी करून ती पूर्ववत करण्यात आली.



**दुर्गापूर (ता. राहाता) येथील लक्ष्मणराव पुलाटे यांची फळशेती.**

त्यामुळे उत्पादनात वाढ झाली.

शेतजमिनीचे आरोग्य टिकवण्यासाठी जास्तीत जास्त सेंद्रिय पदार्थांचा वापर करायला हवा, ही बाब श्री. पुलाटे यांच्या लक्षात आली. विविध पिके कमीत कमी रासायनिक खते व जास्तीत जास्त सेंद्रिय पदार्थ वापरून उत्पादन चांगले घेता आले. शेतीत गांडूळखताच्या वापराने पीकउत्पादनात वाढ झाली. त्याचबरोबर उत्पादन खर्चही कमी झाला.

### फुलशेती

श्री. पुलाटे फुलीशेतीही करतात. यामध्ये झेंडू, बिजली, ॲस्टर तर फळशेतीत डाळींब, द्राक्षाचे उत्पादन घेतात. याशिवाय भाजीपाला उत्पादनातून त्यांनी स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली. सर्वच पिकासाठी लागणारी खताची आवश्यक तेवढीच मात्रा दिली जात असल्याने खतावर होणारा खर्च वाचला. शिवाय उत्पादनात वाढ झाली. शेती उत्पादन वाढीसोबतच वाढता खर्च कमी करण्यासाठी श्री. पुलाटे यांना मृदा आरोग्य पत्रिका अभियान फायद्याचे ठरले आहे.

**– गणेश फुंदे**

माहिती सहायक, उप माहिती कार्यालय, शिर्डी

## कृषी सिंचन : दुप्पट उत्पादन

धानवडे (जि. जळगाव) येथील कैलास पाटील यांची २ हेक्टर शेतजमीन आहे. यापैकी पूर्वी फक्त १ हेक्टर जमीन सिंचनाखाली होती. या क्षेत्रात श्री. पाटील पूर्वी कपाशी व इतर पिके घेत. त्यांना सिंचनासाठी २२०० रुपये मजुरी लागायची. प्रतिएकर उत्पन्न मिळत होते अवघे ६ हजार रुपये. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेचा लाभ घेतल्यानंतर मात्र परिस्थितीत लक्षणीय बदल दिसून आला.

कृषी अधिकाऱ्यांकडून माहिती मिळताच श्री. पाटील यांनी २०१६–१७ मध्ये आपल्या शेतात ठिबक संच बसवून घेण्याचा निर्णय



**धानवडे (जि. जळगाव) येथील कैलास पाटील यांच्या शेतातील ठिबक सिंचन.**

घेतला. श्री. पाटील यांनी १ लाख ४६ हजार ३०४ रुपये खर्चाचा संच शेतीत बसवल्यामुळे त्यांना ७० हजार ४२३ रुपये अनुदान मिळाले.

सूक्ष्म सिंचनामुळे सिंचनासाठी द्यावी लागणारी २२०० रुपये मजुरीची रक्कम वाचली. निंदणीचा खर्चही वाचला. उत्पन्न सहा हजारावरून १३,५०० रुपयांपर्यंत पोहोचले आहे. त्यामुळे त्यांच्या उत्पादनाबरोबरच उत्पन्नातही दुप्पटीने वाढ झाली.




प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेमुळे श्री. पाटील यांचा उत्पादन खर्च कमी झाला शिवाय त्यांचे उत्पन्नही वाढल्याने त्यांना अधिक किमतीचा सिंचन संच घेण्यास मदत झाली. त्यांचे पूर्वी फक्त १ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली होते ते आता १.८५ हेक्टर झाले आहे.

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेचा लाभ २०१७–१८ मध्ये जळगाव तालुक्यातील ६४८ शेतकऱ्यांनी घेतला. या योजनेतून ५७२ शेतकऱ्यांना २ कोटी २३ लाख रुपयांचे अनुदान लाभार्थ्यांच्या बँक खात्या जमा करण्यात आले. या योजनेच्या माध्यमातून तालुक्यातील शेतकऱ्यांनी ६९८ हेक्टर क्षेत्रावर कापूस, केळी, मका, भुईमुग फळपिकासाठी सूक्ष्म सिंचन संच बसवले. यामुळे पाण्याच्या वापरात ५० टक्के बचत झाली. शेतकऱ्यांच्या उत्पादनातही वाढ झाली.

**विलास बोडके**

जिल्हा माहिती अधिकारी, जळगाव

## आर्थिक स्थैर्य

सोलापूर जिल्ह्यात ११ तालुक्यात ३ हजार ५११ पीकनिहाय गट स्थापन करण्यात आले. या सर्व गटांची कृषी विभागाकडे नोंद करून शासन मान्यता घेण्यात आली. या गटांना कृषी विभागाच्या सर्व योजनांची माहिती दिली जाते. गटातील शेतकऱ्यांना बचतीची सवय लागावी, यासाठी कुवतीनुसार मासिक बचत केली जाते.

आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ गटांना मिळवून दिला जातो. केंद्र सरकार व राज्य शासनाचे कृषिविषयक उपक्रम गटांमार्फत प्रकल्प म्हणून राबवण्यात येतात. पीक प्रात्यक्षिकसाठी निविष्ठा खरेदी, पीक संयोजन, नवे तंत्रज्ञान वापरून शेतकऱ्यांना योजनांचा लाभ दिला जातो. शेतकरी मेळावे, विज्ञान केंद्र भेट, कृषिसहल, अभ्यास दौरे आयोजित करून प्रगतशील शेतकऱ्यांकडील तंत्रज्ञान शेतकरी समूहगटास दिले जाते.

होय, प्रगती करतोय महाराष्ट्र माझा



**महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्पांतर्गत देण्यात आलेली डाळमिल मशीन.**

गटांच्या माध्यमातून पीक पद्धतीत वेगवेगळे प्रयोग केले जातात. बाजारातील मागणीनुसार उत्पादन घेतले जाते. वडजी येथील गटाने गुलाब उत्पादन घेऊन त्यापासून गुलाबजल निर्मिती केली. माढा येथील भूमाता सेंद्रिय गटाद्वारे सेंद्रिय शेती केली जाते. ज्वारी, मका जात्यावर दळून दिले जाते. याद्वारे गटातील महिलांनी सुमारे दोन लाख रुपयांची विक्री केली आहे. माळशिरस येथील शेतकरी गटामार्फत थेट विपणन (मार्केटिंग) सेवा उपलब्ध करून दिली जाते. जिल्ह्यातील काही शेतकरी गटांना कृषी विभागामार्फत देशी गायी देण्यात आल्या. या गटांना बी-बियाणे, खते, कीटकनाशके, शेती उपयोगी अवजारे, सिंचन सुविधा, मजुरी, विक्री व्यवस्था यांच्या मार्गदर्शनामुळे उत्पादनात वाढ झाली. उत्पादित मालाला हक्काची बाजारपेठ मिळण्याबरोबरच मालाचा दर्जा चांगला राहावा, यासाठी शेतकऱ्यांनी स्थापित फार्मा कंपन्या या संकल्पनेतून महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्पांतर्गत शेतकरी उत्पादक कंपन्या निर्माण झाल्या.

सोलापूर जिल्ह्यात ११ तालुक्यात १३ फार्मा कंपन्या स्थापन करण्यात आल्या. या कंपन्यांमध्ये सहा हजार शेतकरी भागधारक आहेत. शेतकरी गटांनी उत्पादित केलेल्या मालास बाजारपेठ उपलब्ध करून दिली जाते. मालाची प्रतवारी, ग्रेडिंग, चाळणी, पॅकिंग करण्याचे काम होत आहे. गटांनी पीकनिहाय उत्पादित मालावर कंपन्यामार्फत प्रक्रिया केली जाते. ज्वारी, बाजरी, तूर, मूग यांची चाळणी करून प्रतवारी ठरवली जाते. शेतकरी उत्पादक कंपन्यांना शासनाची हमीभाव केंद्रे दिली असल्याने शेतकऱ्यांची बाजारपेठेत फसवणूक होत नाही. माळकवठे येथील सोलापूर ग्रो प्रोड्यूसर कंपनीचे सचिव अशोक मिरेखोर म्हणाले, कंपनीचे ६६० सभासद आहेत. कंपनीमार्फत शेतकऱ्यांना धान्याची प्रतवारी करून दिली जाते. मका, तूर, हरभरा यांचे ग्रेडिंग करून दिले जाते. धान्य ग्रेडिंगमध्ये कंपनीने चालू वर्षी सुमारे २० लाख रुपये नफा मिळवला.




शेतकरी हणमंत कुलकर्णी यांनी सांगितले, 'कंपनीने शेतकरी गटातील शेतकऱ्यांना पेरणी ते विक्री, अशी साखळी निर्माण करून दिली. त्यामुळे शेतकऱ्यांची बाजारात होणारी लूट थांबली. यामुळेच फार्मा कंपन्या ग्रामीण विकासाच्या केंद्र बनल्या. यशस्विनी अग्रो कंपनी बोरामणीच्या अध्यक्षा अनिता माळगे म्हणाल्या, महिलांना एकत्र करून त्यांना आधुनिक पद्धतीने शेती व तंत्रज्ञान याची माहिती दिली. नवनवीन प्रयोग करून ते यशस्वी होण्यासाठी महिलांना मार्गदर्शन केले. कंपनीचे सध्या ५८५ सभासद आहेत. कंपनीमार्फत धान्याची प्रतवारी केली जाते. पेरणी ते विक्री, उत्पादनात वाढ होण्यासाठी कंपनी काम करते. शेतकऱ्यांची आर्थिक गरज दूर करण्यासाठी प्रत्येक गटासाठी ५० हजार रुपये कर्ज उपलब्ध करून दिले जाते. शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याबरोबरच त्याला आर्थिक स्थैर्य देण्याची महत्त्वाची भूमिका शेतकरी गट व शेतकरी उत्पादक कंपन्या पार पाडतील. शेती आणि शेतकऱ्याबरोबरच ग्रामीण विकासात शेतकरी उत्पादक कंपन्यांचे कार्य महत्त्वाचे आहे.

**एकनाथ पोवार**

माहिती सहायक, सोलापूर

## ट्रॅक्टरचा लाभ

उस्मानाबाद जिल्ह्यातील रवींद्र आदटराव हे करंजखेडा गावातील शेतकरी. शिक्षण बी.ए.पर्यंत झालेले. शेतीत अजून काही चांगले करता येईल का? या विचारात असताना त्यांना कृषी साहाय्यकांकडून उन्नत शेती योजनेसंबंधी मार्गदर्शन मिळाले.

त्यानुसार त्यांनी २०१७-१८ या वर्षात ट्रॅक्टर खरेदीकरिता अनुदान मिळण्यासाठी अर्ज केला. अनुदानाची रक्कम होती एक लाख. लॉटरी पद्धतीने निवड होणार होती. या निवड प्रक्रियेत श्री. आदटराव यांना ट्रॅक्टरसाठी अनुदान मंजूर झाले.

या अनुदानातून त्यांनी ट्रॅक्टर खरेदी केला. यामुळे शेतातील कामे वेळेत पूर्ण होऊ लागली. उत्पन्नात चांगली वाढ झाली. श्री. आदटराव यांनी सोयाबीन, हरभरा, ऊस या



**रवींद्र आदटराव**




पिकांसह तुती या पिकांचीही लागवड करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. श्री. आदटराव सांगतात, 'आधी मी भाड्याच्या ट्रॅक्टरने शेती करीत होतो परंतु उन्नत शेती योजनेंतर्गत मिळालेल्या ट्रॅक्टरमुळे अधिक जोमाने काम करू शकतो. शेतीच्या उत्पादनात वाढ होऊन माझे उत्पन्न वाढले आहे.'

**मनोज शिवाजी सानप**

जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद

गेल्या चार वर्षात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत राज्यात अनेक ठिकाणी कामे चालू आहेत. काही ठिकाणी ती पूर्ण झाली आहेत. या कामांमध्ये दुष्काळसदृश विभागातील शेतकऱ्यांचा फायदा झाला. या ठिकाणची भूजल पातळी वाढली. शेतकऱ्यांचे उत्पन्न आणि उत्पादन वाढले.

# शिवारात पाणी, विकासाची ग्वाही...



सिंदखेडराजा येथील भोगाजी तायडे यांच्या शेतातील विहिरीत वाढलेले पाणी.

## भूजल पातळीत वाढ...

सिंदखेडराजा तालुका हा अवर्षणग्रस्त.. कमी पाऊस व पावसातील वाढता खंड यामुळे भूजल पातळीही कमी झालेली. मात्र या प्रतिकूल स्थितीवर मात करण्यासाठी जलयुक्त शिवार योजना महत्त्वाची ठरली. त्यानुसार सिंदखेड राजा शहराजवळून वाहणाऱ्या पाताळगंगा नदीचे खोलीकरण करण्यात आले. नदीवर सिमेंट नाला बांध बांधण्यात आला.

२०१६-१७ मध्ये भागोजी पुंजाजी तायडे यांच्या शेताजवळील नदीवर बंधारा बांधण्यात आला. नदीवर दोन बांधाच्या पाच ते सहा मीटर अंतरावर ७ ते १० फूट खोल खड्डे खोदण्यात आले. परिणामी, पावसाळ्यात नदीला आलेल्या एखाद-दुसऱ्या पुरामुळे बंधारा भरला. खोदलेल्या खड्ड्यांतून पाणी जमिनीत खोलवर जिरविले गेले. यामुळे परिसरातील भूजल पातळी वाढली. पाऊस कमी झाल्यास नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यातच विहिरी आटायच्या. मात्र या अवर्षणाच्या वर्षात ४० ते ४५ फूट खोली असलेल्या विहिरींमध्ये २५ ते ३० फुटांपर्यंत पाणी आहे.




### माळरान फुलले

सिंदखेडराजा येथील शेतकरी श्री. तायडे यांच्या शेतात तीन विहिरी आहेत. या तीनही विहिरींमध्ये भरपूर जलसाठा आहे.

श्री. तायडे यांच्याकडे पाताळगंगा नदीकाठावर जवळपास ७५ एकर शेती आहे. या शेतीमध्ये खरीप पीक काढल्यानंतर त्यांनी रब्बी पिकांची लागवड केली. बंधाऱ्यामुळे भूजल पातळीत वाढ झाल्यामुळे त्यांची यापैकी जवळपास १५ एकर शेती ओलिताखाली आहे. बंधाऱ्याजवळील ५० फूट खोल

विहीर ३५ ते ४० फुटांपर्यंत पाण्याने तुडुंब भरली आहे. या विहिरीच्या पाण्यावर त्यांनी कांदा बियाणे, लसूण, शाळू ज्वारीला ठिबक केले आहे. असे जवळपास साडेतीन ते चार एकर शेत ओलिताखाली आहे. या शेतीत ठिबकच्या नळ्यांचे जाळे दिसते. पाणी असल्यामुळे वारेमाप वापर न करता जपून वापर करण्याकडे त्यांचा कल आहे. त्यांच्या शेताच्या पश्चिमेकडील भागात माळरान आहे. या माळरानावर १० एकर क्षेत्रावर पेरूची बाग फुलवली आहे. या बागेलासुद्धा विहिरीच्या पाण्यावर ठिबक सुरू आहे. पेरूच्या अलाहाबाद सफेद जातीच्या कलमांची त्यांनी दोन वर्षापूर्वी लागवड केली. जवळपास ४ हजार झाडे या माळरानावर लागली आहेत.

रब्बी हंगामातील उत्पादनामागे नदीवरील सिमेंट नाला बांध महत्त्वाचा ठरला. सगळीकडे दुष्काळाची गडद छाया दाटली असताना श्री. तायडे मात्र जलयुक्तच्या रूपाने प्रगती करत आहेत. सागाची झाडेही त्यांनी लावलेली आहेत. उरलेल्या पाण्यातून ही झाडे जगतात. त्यांच्या शेतात चंदनाची झाडेही आहेत. 'जलयुक्त शिवारच्या कामांमुळे शेतातील भूजल पातळीत वाढ झाली. हा बांध होण्यापूर्वी डिसेंबर – जानेवारीमध्ये विहीर आटायची. आता मात्र अशा दुष्काळी परिस्थितीतही विहिरी तुडुंब भरल्या आहेत. ऑक्टोबरच्या सुरुवातीला, पाणी विहिरीच्या वरपर्यंत होते,' अशी प्रतिक्रिया भागोजी तायडे यांनी दिली.

**एस. के. बावस्कर**

जिल्हा माहिती अधिकारी, बुलडाणा

## शिवारातील सोने...

मेहकर तालुक्यातील मोहखेड गावाची २०१६–१७ मध्ये जलयुक्त शिवार अभियानात निवड करण्यात आली. या गावच्या शिवारातही जलयुक्त शिवारची शिवार फेरी काढून सिमेंट नाला बांधचे काम प्रस्तावित करण्यात आले. त्याप्रमाणे नाल्यावरील पाणी अडवले जाऊन गावामध्ये विकेंद्रित स्वरूपाचे पाणीसाठे निर्माण करण्यात आले.

मात्र या वर्षीच्या तीव्र अवर्षणाच्या काळात मोहखेड शिवारात रब्बीला संरक्षित सिंचन मिळाले. मोहखेड शिवारात गाव नाल्यावर सिमेंट नाला बांध घेण्यात आला. या बांधाचा सांडवा ९ मीटर असून उंची दीड मीटर आहे. या सिमेंट नाला बांधचे खोलीकरण ११० मीटर लांब, ८ मीटर रूंद व २ मीटर खोलीचे आहे. बांधाच्या मागे आज जवळपास १०० मीटर पर्यंत पाणी साठवले. या पाण्यामुळे या परिसरातील विहिरींच्या भूजल पातळीत जवळपास ३ मीटरने वाढ झाली.

जिल्ह्यात पहिल्या टप्प्यात ३३० व दुसऱ्या टप्प्यात २४५ गावांची निवड जलयुक्त शिवार अभियानात करण्यात आली. पहिल्या टप्प्यात ८० टँकरग्रस्त गावे प्रामुख्याने निवडली. या अभियानांतर्गत जिल्ह्यात जलसंधारण व मृद्संधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर करण्यात आली.



**जलयुक्त शिवार अभियानांतर्गत मोहखेड शिवारात बांधलेला सिमेंट नाला बांध**

त्याची फलश्रुती आता दिसू लागली. अवर्षणाच्या काळात मेहकर तालुक्यातील मोहखेड शिवारात विहिरींची पाणी पातळी वाढली. परिसरातील शेती ओलिताखाली आली. सध्या खरिपातील तूर व रब्बीमधील हरभरा पिकाला संरक्षित सिंचन देण्यात आले. या नाला बांधशेजारील शेतकरी शिवदास सवडतकर, (रा. मोहखेड ता. मेहकर) हे सांगतात, माझ्याकडे एकूण ३ हेक्टर जमीन असून २०१६–१७ मध्ये सिमेंट नाला बांध घेण्याअगोदर कोरडवाहू पद्धतीने शेती करीत होतो. मात्र गट क्रमांक ९२ मध्ये कृषी विभागाने जलयुक्त शिवार अंतर्गत सिमेंट नाला बांधचे काम हाती घेतले. या पावसाळ्यात नाल्याला आलेले पाणी बांधामध्ये साठवले गेले. या बांधातील पाण्यामुळे पावसाच्या खंडकाळात खरिपात संपूर्ण ३ हेक्टर शेताला ओलीत केले. पूर्वी रब्बी हंगामामध्ये कमी शेतीत हरभरा पिकाची लागवड करीत होतो. ती आता १ हेक्टरपर्यंत वाढवली आहे. त्याचप्रमाणे विहिरींची पाणी पातळी वाढली आहे.

**निलेश तायडे**

माहिती सहायक, बुलडाणा

## माळरानावर मत्स्यशेती

यवतमाळ जिल्ह्यात जलयुक्त शिवारमुळे जिल्ह्यात ९८ हजार हेक्टरवर सिंचनाची सोय निर्माण झाली. 'मागेल त्याला शेततळे' अंतर्गत ७६०१ शेततळ्यांची निर्मिती झाली. त्यामुळे पडलेला पाऊस शिवारात अडवण्यात आल्याने जिल्ह्याच्या पाणी पातळीत सरासरी अडीच मीटरने वाढ झाली आहे.




जिल्ह्यात निर्माण झालेल्या एकूण शेततळ्यांपैकी जवळपास एक हजार शेततळ्यांमध्ये मत्स्यशेती करण्याचे नियोजन करण्यात आले. याला कळंब तालुक्यातील गणेशवाडी हे गाव मात्र अपवाद ठरले. येथे शेततळ्यात नव्हे तर जलयुक्तच्या नाला खोलीकरणांतर्गत साठलेल्या जलाशयात मत्स्यबीज सोडण्यात आले.

गावात गतवर्षी पिण्याच्या पाण्याचे सर्वात जास्त दुर्भिक्ष होते. जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याचा पहिला टँकर गणेशवाडीमध्ये नोव्हेंबर २०१७ मध्ये लावण्यात आला. तेथे मत्स्यशेतीचा उपक्रम राबवण्यात येत आहे. पाण्याच्या समृद्धीसोबतच मत्स्यशेतीद्वारे शाश्वत उपजीविकेचे साधन राबवणाऱ्या गणेशवाडीचा जलयुक्तचा पॅटर्न इतरांसाठी प्रेरणादायी आहे.

### सामाजिक परिवर्तन

या गावाचा समावेश महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानामध्ये करण्यात आला. या गावात १०० टक्के आदिवासी कोलाम समाज राहतो. गावांतर्गत गणेशवाडी, गव्हाणखेडी, गोसावी व घारोड्या अशा चार पाड्यांचा समावेश होतो. ८०३ लोकसंख्या असलेले हे गाव पाणलोट क्षेत्राच्या माथ्यावर असून येथील भूभाग उंचसखल व खडकाळ आहे. महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानात गणेशवाडीचा समावेश करण्यात आला.

### पाणीप्रश्न निकाली

पाण्यासाठी लोकांनी श्रमदानातून काळा बेसॉल्ट खडक फोडला. परंतु खडकाच्या भेगात साठलेले पाणी दोन-तीन दिवसात संपले. याआधी गावात दोन कूपनलिका घेण्यात आल्या, परंतु पाण्याचा प्रश्न सुटला नाही. जलयुक्त शिवार अभियान नवसंजीवनी देणारे ठरले. कृषी विभाग, जलसंपदा विभाग, बेंबळा पाटबंधारे विभाग, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा आदी विभागांच्या समन्वयातून मातीनाला बांध, डीप सीसीटी, सिमेंट नाला बांध दुरुस्ती, नाला खोलीकरण, रिचार्ज शाफ्ट ही कामे करण्यात आली. यात जलसंधारणाचे तीन मॉडेल तयार करण्यात आले. गावांतर्गत पोडनिहाय येणाऱ्या पाणीपुरवठा विहीर व हातपंप यांच्या भूजल पातळीत कायम वाढ होण्याच्या दृष्टिकोनातून नियोजन करण्यात आले. वॉटर कप स्पर्धेदरम्यान गावकऱ्यांनी श्रमदानातून तयार केलेले एलबीएस, मातीनाला बांध आणि यंत्राद्वारे करण्यात आलेले खोलीकरण यांचा जलसंधारणात मोठा वाटा आहे.



**गणेशवाडी (जि. यवतमाळ) येथे जलयुक्त शिवार अभियानांतर्गत नाल्यामध्ये साठलेल्या जलाशयात मत्स्यशेती करण्यात येते.**

सुरुवातीला गावामागे असलेल्या मातीनाला बांधात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत ६ व पायथ्याला २ असे एकूण ८ रिचार्ज शाफ्ट करण्यात आले. या गावात १६ रिचार्ज शाफ्ट झाले. यानंतर गावकऱ्यांनी स्वतः शाफ्टची मागणी केली. त्यांच्या मागणीनुसार गावात अतिरिक्त २४ शाफ्ट तयार करण्यात आले. आजघडीला जिल्ह्यात सर्वाधिक ४० रिचार्ज शाफ्ट गणेशवाडीत आहेत. मान्सूनचा पहिला पाऊस ६ जून रोजी पडला आणि जलयुक्तच्या या कामांमुळे मातीनाला बांधात पाणी साठले.

रिचार्ज शाफ्टमुळे गतीने पाणी जमिनीत मुरले. त्यामुळे या विहिरीच्या भूजल पातळीत झपाट्याने वाढ झाली. ही पातळी आजही कायम आहे. गणेशवाडीच्या इतिहासात पहिल्या पावसाने पहिल्यांदाच विहीरीचे जमीन पातळीपर्यंत पुनर्भरण झाल्याचे दृश्य गावकऱ्यांनी अनुभवले. विहिरीसोबतच हातपंपालासुद्धा त्याचा फायदा झाला. विहिरीच्या बाजूला असलेल्या हौदामध्ये ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानाद्वारे ट्रेडल पंप बसवण्यात आला. मुंबई आयआयटीने हा पंप तयार केला असून याद्वारे २५ फूट खोलीपासून पाणी उपसले जाते. याकरिता विजेची गरज नसून मानवी श्रमाद्वारे हा पंप चालवता येतो. त्यामुळे जनावरांच्या पाण्याचा प्रश्न निकाली निघाला.

### मत्स्यशेती

गावातील नागरिकांना शेती व रोजमजुरी व्यतिरिक्त इतर उपजीविकेचे कोणतेही साधन उपलब्ध नव्हते. ही बाब लक्षात घेऊन गणेशवाडीच्या मुख्यमंत्री ग्राम

प्रवर्तकांनी मत्स्यशेतीकरिता गट स्थापन करण्याची संकल्पना मांडली. त्यानुसार सुधाकर टेकाम, माधव मेश्राम, चंद्रभान वाडेकर, चंडकू मडावी आणि शंकर शिवणकर यांच्या नेतृत्वात मत्स्यशेतीकरिता पाच गट येथे कार्यरत झाले. महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियान, कृषी समृद्धी प्रकल्प आणि टाटा ट्रस्ट यांच्याद्वारे गावातील ३२ नागरिकांना रोहू, कटला व मृगल अशा तीन प्रजातींच्या मस्त्यबीजाचे वाटप करण्यात आले. जलयुक्त शिवार अभियानात झालेल्या जलसाठ्यात मत्स्यबीज सोडून मत्स्यशेतीला प्रारंभ झाला. प्रत्येक लाभार्थ्याला ५०० याप्रमाणे एकूण ३२ लाभार्थ्यांना १६ हजार मत्स्यबोटुकली देण्यात आली. गणेशवाडीत पहिल्यांदाच एवढ्या व्यापक प्रमाणात मत्स्यशेतीला सुरुवात झाली. त्यामुळे शाश्वत उपजीविकेचे साधन गावकऱ्यांना उपलब्ध झाले.

मत्स्यशेती होणाऱ्या जलसाठ्यात नाला खोलीकरणाची माती ढासळू नये म्हणून खस गवत लावण्यात आले आहे. माती पकडून ठेवण्यासोबतच या गवताचा दुहेरी फायदा होतो. यात निर्माण होणारे जीवजंतू हे माशांचे अन्न म्हणून उपयोगात येते. भविष्यात खस गवतापासून ग्रामपंचायतीला उत्पन्न मिळेल.

जिल्हा माहिती कार्यालय, यवतमाळ

## टाकळघाटला पिण्याचे पाणी

जलयुक्त शिवार अभियानाला लोकसहभागाची जोड मिळाल्यामुळे नाल्याद्वारे वाहून जाणारे पाणी अडविण्यासोबतच नाल्याचे खोलीकरण केल्यामुळे हिंगणा तालुक्यातील कोहळा रिठी या शिवारातील १२५ एकर जमिनीला शाश्वत सिंचनाचा लाभ झाला. सिंचनासोबतच टाकळघाट येथील सहा हजार लोकसंख्येला पिण्याचे पाणी उपलब्ध झाले.

जलयुक्त शिवारमुळे केवळ शेतीलाच नव्हे तर गावाच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्यालाही मदत झाली.

### सहा हजार लोकांना पाणी

या अभियानाच्या माध्यमातून हिंगणा तालुक्यातील मौजा खापरी (मोरे) ग्रामपंचायत अंतर्गत कोहळा (रीठी) या गावात राबवलेल्या नाला खोलीकरण तसेच सिमेंट नालाबांध व जुन्या बंधाऱ्यांची दुरुस्ती यामुळे ३६३.८१ टीसीएम जलसाठा निर्माण झाला आहे. गावातील पाण्याची गरज पूर्ण केल्यानंतरही टाकळघाट या गावातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाईवर मात करण्यासाठी अडीच लाख लीटर पाणी सहा हजार लोकसंख्येला पुरवण्यात येत आहे.



टाकळघाट (जि. नागपूर) येथील सिमेंट नाला बांध.

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत कोहळा रीठी या शिवारातून जाणाऱ्या नाल्यावर तीन ठिकाणी सिमेंट नाला बंधारे बांधण्यात आले. जुन्या बंधाऱ्यांची दुरुस्ती करण्यात आली आहे. या नाल्यात सुमारे एक हजार ते अकराशे मीटर लांबीचे नालाखोलीकरणाचे काम पूर्ण केल्यामुळे हा संपूर्ण नाला जलसाठायुक्त झाला. पाण्याची खोली चार ते पाच फूटापर्यंत असल्यामुळे शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी सहज उपलब्ध झाले. या परिसरातील शेतकरी पिके वाचवण्यासोबतच रब्बी हंगामात विविध पिके घेण्यासाठी सज्ज झाले आहेत.

हिंगणा तालुक्यातील मौजा खापरीमध्ये या परिसरातील नाल्याद्वारे वाहून जाणारे पाणी अडवण्यासाठी २०१६-१७ करिता ग्रामसभेच्या ठरावानुसार कृषी विभागातर्फे ग्रामस्थांनी सुचवल्याप्रमाणे ढाळीचे बांध, सिमेंट नालाबांध व नाला खोलीकरणाची कामे घेण्यात आली. यासाठी या गावाचा पाण्याचा ताळेबंद तयार करण्यात आला. त्यानुसार तीन नवीन सिमेंट बंधारे व त्यासोबत नाल्याचे खोलीकरण करण्यात आले. जुन्या नाल्याची दुरुस्ती व खोलीकरण केल्यामुळे नाल्याद्वारे वाहून जाणारे संपूर्ण पाणी अडवण्यात आले. या आराखड्यानुसार ६२६.३४ टीसीएम पाणीसाठा अपेक्षित होता. त्यानुसार शेतकऱ्यांना आवश्यकतेनुसार पाणी उपलब्ध झाले. या नालाखोलीकरणामुळे उपलब्ध झालेल्या पाणीसाठ्याचा वापर पिण्याच्या पाण्यासाठी करण्यासाठी टाकळघाटच्या सरपंच अर्चना हरिश्चंद्र अवचट यांनी पिण्याच्या पाण्याची विहीर खोदण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली. त्यानंतर ग्रामपंचायतीतर्फे पाण्याची टाकी बांधून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याचा निर्णय घेतला. यामुळे आज सहा हजार लोकसंख्येला पिण्याचे पाणी उपलब्ध झाले आहे.



### सोयाबीन झाले दुप्पट

टाकळघाट येथील शेतकरी विजय राजबिंडे यांनी १.४१ हेक्टर आर क्षेत्रात खरीप हंगामात सोयाबीनची पेरणी केली. पावसाच्या खंडामुळे सोयाबीनचे पीक वाचवण्यासाठी नाला खोलीकरणामुळे निर्माण झालेल्या जलसाठ्यातील विद्युत पंपाद्वारे पाणी दिल्याने १९ क्विंटल सोयाबीनचे उत्पादन घेणे शक्य झाले. यापूर्वी केवळ १० क्विंटल सोयाबीनचे उत्पादन होत होते. रब्बी हंगामामध्ये हरभऱ्याचे पीक येत असून उन्हाळा संपेपर्यंत नाल्यात पाणी उपलब्ध असल्यामुळे दुप्पट उत्पादन होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या जलसाठ्यातून याच परिसरातील २० शेतकऱ्यांनी विद्युत पंपाद्वारे शेतापर्यंत पाणी पोहोचवले आहे. नाला खोलीकरणामुळे चार एकरातील सोयाबिन वाचवू शकलो आणि दुप्पट उत्पादन झाल्याचे गजानन सावरकर यांनी सांगितले.

कोहळा रीठी या गावाच्या शिवारातील बहुतांश शेती पडीक होती. खरीप हंगामामध्ये केवळ कापूस व तूर ही दोनच पिके घेतली जात होती. परंतु नाला खोलीकरण व सिमेंट बंधाऱ्यामुळे दोन पिके घेणे शक्य झाले.

विजय मारवडकर, श्री. नंदागवळी आदी शेतकऱ्यांनी पडीक जमीन ओलिताखाली आणण्यासाठी जलयुक्त शिवार योजना उपयुक्तता ठरल्याचे सांगितले.

कृषी विभागाने शिवारातील ८० हेक्टर शेतीमध्ये ढाळीचे बांध बांधून पाणी शेतातच अडवले आहे. या शिवारातून वाहणारा नाला संपूर्ण गाळाने भरला होता. त्यामुळे पाणी वाहून जात होते. परंतु नाला खोलीकरण व सिमेंट बंधाऱ्यामुळे दोन ते अडीच फूट भूगर्भातील पाण्याची पातळी वाढली.

जलयुक्तच्या कामामुळे साडेतीन एकर परिसरातील संत्राबाग वाचवणे सहज शक्य झाले असल्याचे हिंगणा पंचायत समितीचे उपसभापती हरिश्चंद्र अवचट यांनी सांगितले.

विहिरीतील पाण्याची पातळी तर वाढली. त्यासोबत मे, जूनपर्यंत पाणीसुद्धा उपलब्ध होईल. नाला खोलीकरणाच्या नवीन कामामुळे २६७.८० टीसीएम पाणी उपलब्ध झाले. तसेच नाल्यातून वाहून जाणारे पाणी अडवणेसुद्धा शक्य झाले. पिके वाचवण्यासाठी जलयुक्तमुळे निर्माण झालेल्या जलसाठ्याचा शेतकरी मोठ्या प्रमाणात वापर करीत आहेत. शेतीसोबतच पिण्याच्या पाण्यासाठी उपलब्ध झालेल्या जलसाठ्याचा लाभ प्रत्येक शेतकरी घेत आहे.

जिल्हा माहिती कार्यालय, नागपूर

## शंभर शेततळ्यांचे गाव



**शहापूर (ता. देगलूर, जि. नांदेड) येथील शेततळे.**

नांदेड जिल्ह्यातील देगलूर तालुक्यातील शहापूर हे एक मोठे गाव. देगलूरपासून १५ कि.मी. अंतरावरील या गावातील शेतकऱ्यांना पाण्याचे महत्त्व गेल्या काही वर्षात अधिकच जाणवले आहे. जलयुक्त शिवार अभियानातून मागेल त्याला शेततळे ही योजना राबवण्याच्या पहिल्यावर्षी या गावातील शेतकरी शेततळे घेण्यासाठी फारसे उत्सुक नव्हते. मात्र तालुका कृषी अधिकाऱ्यांच्या पाठपुराव्यामुळे १५ शेतकरी शेततळे घेण्यासाठी पुढे आले. गेल्या उन्हाळ्यामध्ये एप्रिल-मे २०१७ मध्ये या परिसरात शेतकऱ्यांनी १५ शेततळी निर्माण केली. इतर शेतकरी यासाठी फारसा प्रतिसाद देत नव्हते. मात्र या शेततळ्याकडे लक्ष ठेवून होते. या शेततळ्यामध्ये गेल्या वर्षी पडलेल्या पावसाने पाण्याचा चांगला साठा झाला. या साठ्यातून २०१७ च्या खरीप हंगामातील पावसाच्या खंडित काळात तुषार सिंचनाच्या माध्यमातून सोयाबीन, उडीद पिकास संरक्षित सिंचन देण्यात आले. रब्बी हंगामात हरभऱ्याच्या पिकास पाणी तुषार सिंचनाच्या माध्यमातून देण्यात आले. दोन्ही वेळेत पिकांना जीवदान मिळाल्याने इतर शेतकऱ्यांच्या तुलनेने शेततळे घेतलेल्या १५ शेतकऱ्यांना पीक उत्पादनात भरीव वाढ झाल्याचे दिसून आले. शेततळ्यांच्या फायद्याविषयी जागरूकता वाढीस लागली व कृषी विभागाने शहापूर परिसरातील शेतकऱ्यांना मार्गदर्शन मेळावा घेऊन शेततळ्याचे महत्त्व सांगितले. यामुळे मोठ्या संख्येने शेतकरी 'मागेल त्याला शेततळे' या योजनेचा लाभ घेण्यासाठी पुढे येऊ लागले. आणि बघता-बघता ८५ शेतकऱ्यांनी शेततळ्यांसाठी अर्ज केले.

कृषी विभागाने तांत्रिक मार्गदर्शन करून शहापूरच्या परिसरातील शेतांमध्ये तंत्रशुद्ध

होय, प्रगती करतोय महाराष्ट्र माझा

पद्धतीने ८५ शेततळी घेऊन शेततळ्यांची शंभरी गाठली.

## विहिरीच्या पाणी पातळीत वाढ

शहापूर परिसरातील शेतजमीन ही काळी असल्याने शेतकऱ्यांना शासनाने दिलेल्या अनुदानात शेततळे घेता आले. शेतकऱ्यांनी आपल्या शेतीतील पाण्याच्या सिंचनाची गरज लक्षात घेऊन लहान–मोठ्या आकाराची शेततळी बांधली. यावर्षी झालेले पर्जन्यमान जरी कमी असले तरी सिंचनाची व्यवस्था कोलमडते म्हणून विंधन विहिरीचे पाणी शेततळ्यात सोडून शेततळ्यातून पाणी पाईपद्वारे घेऊन शेतात तुषार सिंचनाच्या माध्यमातून जमीन ओलिताखाली आणली. तुषार सिंचनाचा संच शेतकऱ्यांनी स्वखर्चाने आणला असला तरी कमी पाण्यामध्ये उत्तम शेती करण्याचा आणि भरघोस पीक घेऊन आर्थिक उन्नती साधण्याचा या शेतकऱ्यांचा इरादा पक्का आहे.

शहापूरचे जयपाल भूमरेड्डी कनकंटे हे



**शेततळ्यातील पाणी तुषार सिंचनाच्या माध्यमातून पिकांना देण्यात येते.**

ही शेततळी दोन–तीन वेळा पूर्ण भरून पाणी जमिनीत मुरल्याचा अनुभव शेतकऱ्यांना आला. शेततळ्यामध्ये पाणी मुरल्याने शेजारच्या विंधन विहिरीच्या पाण्याची पातळी वाढल्याचे दिसून आले. उन्हाळ्यात पिकाला लागणाऱ्या पाण्यासाठी ही शंभर शेततळी एक महत्त्वाची भूमिका बजावतील.

जवळपास शंभर शेतकऱ्यांनी शेततळ्यात विंधन विहिरीचे पाणी सोडले आहे. हे पाणी पुरेशा दाबाने मिळत नसल्याने तुषार शेतकरी प्रयोगशील आहेत. त्यांची नरंगल शिवारात ७ एकर शेती आहे. शेततळ्याच्या माध्यमातून १८ तुषारसंच सुरू ठेवून पिके घेत आहेत. जवळपास त्यांची संपूर्ण शेती सध्या संरक्षित सिंचनाखाली आली आहे. त्यांनी २४०० फुटांवरील विंधन विहिरीचे पाणी पाईपद्वारे आणून शेततळ्यात सोडले आहे. या पाण्यातून सतत तुषार सिंचनाने पिकांची वाढ भरघोस होत असल्याने ते आनंदी आहेत.

तिरुपती रेड्डी कनकंटे यांचीही शेती लागूनच आहे. त्यांनी २० बाय २० आकाराचे छोटे शेततळे घेतले आहे. यावर त्यांनी प्रथमच हळदीचे पीक घेतले असून ते जोमदार आहे. तूर–सोयाबीनचे पीक उत्तम झाले. ८ एकर शेतातील त्यांचा तुषार सिंचनाचा प्रयोगही यशस्वी झाला आहे.

लिंगारेड्डी यलन्ना यलकटवार या शेतकऱ्याची शेती फक्त ५ एकर आहे. मात्र त्याने शेततळ्याचे महत्त्व ओळखून पुढाकार घेतला. जवळपास १० गुंठे शेती शेततळ्यासाठी गेली असली तरी त्याने उरलेल्या अल्प शेतीमध्ये चांगल्या पिकांची भर घातली. शेततळ्याच्या सभोवती बांधावर झेंडूची फुले, पालक, मेथी, टमाटे, वांगे यासारखी फुलवर्गीय व भाजीपाला पिके घेण्यास सुरुवात केली. उर्वरित शेतीमध्ये सोयाबीनचे पीक घेतले जात असले तरी जवळपास अडीच एकर शेती शेततळ्यामुळे सिंचनाखाली आली असल्याने लिंगारेड्डी आनंदात आहेत.





## शेततळ्याची किमया

शेतामध्ये असलेला मोठा खड्डा बालाजी सायन्ना या शेतकऱ्याने शेततळ्यामध्ये रूपांतरित केल्याने त्याच्या शेतीला नवी दिशा मिळाली. १६ एकरपैकी जवळपास १२ एकर शेती पाण्याने भिजत असून शेततळे व तुषार सिंचनाने हे साध्य झाले आहे. त्याने सेंद्रिय शेतीचा मार्ग निवडला असून २० बाय २५ च्या शेततळ्यामुळे भाजीपाल्याच्या उत्पादनातून

सुरुवातीला शहापूर परिसरात केवळ १५ शेततळी घेण्यात आली. त्यामुळे पावसाळ्यात ६७.२ टी.सी.एम. पाणीसाठा निर्माण झाला. यातून जवळपास ७० ते ७५ हेक्टर क्षेत्र तुषार सिंचनाच्या माध्यमातून संरक्षित सिंचनाखाली आले. सध्या या शंभर शेततळ्यांमुळे ४४८ टी.सी.एम. पाणीसाठा उपलब्ध झाला. यामुळे साधारण ४५० हेक्टर शेतजमीन सिंचनाखाली आली. या वर्षी पाऊस कमी असला तरी जमिनीतील पाण्याची पातळी भक्कम झाल्याचा अनुभव शेतकऱ्यांना येत आहे.

मोठी आर्थिक उन्नती साधता आली.

रामपूर शिवारातील कोरडवाहू शेतीला नवा आयाम देण्यासाठी विजय भूताजी कोकणे या शेतकऱ्याने शेततळ्याचा सहारा घेतला. आज शेततळ्याच्या तुषार सिंचनामुळे जवळपास १६ एकर क्षेत्र भिजले आहे. पाणीसाठा वाढला असून या उन्हाळ्यात पिकांना कोणतेही नुकसान होणार नाही याची अप्रत्यक्ष हमी शेततळ्याने दिली आहे. जवळपास १२ तुषार सिंचन संच सुरू असून तूर, हरभरा यासारखी पिके घेत आहेत. पीक जोमदार असल्याने त्यांच्या चेहऱ्यावर दुष्काळाच्या छटा दिसत नाहीत.

शंभर शेततळ्यांचे मालक असलेल्या शंभर शेतकऱ्यांचा गौरव समारंभ कृषी विभागाने नुकताच शहापूर येथे घेतला. हजारोच्या संख्येने पंचक्रोशीतील शेतकरी या समारंभाला उपस्थित होते. शहापूरच्या शेतकऱ्यांनी शेततळ्यामुळे साधलेली शेतीक्रांतीची सुवर्णसंधी लक्षात घेऊन या वर्षी आणखी शंभर शेतकरी शेततळी घेण्यास पुढे आले आहेत.



पान्हेरा (जि. परभणी) येथील रामचंद्र घुले यांच्या शेतातील शेततळे.

## दुष्काळातला आधार

पान्हेरा हे गाव परभणी शहरापासून २० कि.मी. अंतरावर आहे. या गावातील जमीन खडकाळ आणि मुरबाड आहे. मागील अनेक वर्षपासून पर्जन्यमान कमी प्रमाणात होत असल्याने येथील शेतकरी नेहमीच भीषण पाणी टंचाईचा सामना करीत आले आहेत. मात्र मागील तीन वर्षात जलयुक्त शिवार अभियानाची अनेक यशस्वी कामे झाल्याने चित्र पालटले आहे.

गावातील नाला खोलीकरणाची कामे करून त्यावर सहा बंधारे बांधल्याने वाहून जाणारे पाणी जमिनीत मुरण्यास सुरुवात झाली. सिमेंट नाला बांध (सीएनबी) आणि विहिर पुनर्भरणाची कामेही चांगली झाली. त्यामुळे गेली दोन वर्षात भूगर्भातील पाणी पातळी वाढली आहे. यंदा पुन्हा पावसाने हुलकावणी दिली. कमी पर्जन्यमान झाले तरी जलयुक्त शिवारमुळे यंदा दुष्काळाला तोंड देण्याची क्षमता निर्माण झाल्याचा आत्मविश्वास सरपंच, ग्रामस्थ, आणि शेतकऱ्यांनी बोलून दाखवला आहे. घुले कुटुंबीयांना या जलयुक्त शिवार अभियानाच्या कामामुळे प्रचंड फायदा होत आहे. पाण्याची पायपीट आणि शेतातील पिके जगवण्याचा त्यांचा आटापिटा आता संपला आहे. घुले कुटुंबीय शेतातच राहतात. यांच्या कुटुंबाची शेती ही या भागात औत्सुक्याची ठरली आहे. घुले कुटुंबीयांनी म्हणजे किशनराव, गोदावरी आणि त्यांचा मुलगा रामचंद्र यांनी २०१६-१७ मध्ये कृषी विभागाकडून राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत २४ बाय २४ व चार मीटर आकाराचे २० लाख लीटर पाणी साठवण क्षमतेचे शेततळे केले. यासाठी त्यांना १ लाख ७७ हजार रुपये अनुदान दिले. स्वत:चे १ लाख रुपये खर्चून त्यांनी त्यामध्ये प्लास्टिक टाकले.




गेल्या वर्षापासून या शेततळ्यामध्ये पावसाचे आणि विहिरीचे पाणी साठवले जात आहे. यंदा पान्हेरा परिसरात कमी पावसामुळे रब्बीची पेरणी करता आली नाही. परंतु श्री. घुले यांनी गेल्या महिन्यामध्ये विहिरीतील पाण्यावर शेततळे भरून घेतले. त्यामुळे येत्या काळात शेततळ्यातील पाणी संत्रा फळबाग, हळद, गहू, हरभरा तसेच भाजीपाला पिकाच्या सिंचनासाठी उपलब्ध झाले. घुले यांनी सामुदायिक शेततळ्यामधील संरक्षित पाणी साठ्यावर रब्बी हंगामातील हरभरा, गहू पिकांची पेरणी केली आहे. हळद, भाजीपाला, संत्रा, फळबागेच्या सिंचनासाठी देखील पाणी उपलब्ध झाले.

जलयुक्त शिवार अभियानातील कामांमुळे विहिरीला, विंधन विहिरीला पाणी वाढल्याने घुले कुटुंबीयांना आता खात्रीशीर उत्पन्नाची हमी मिळाली आहे. शेततळ्याच्या पाण्यामध्ये यावर्षी रोहू, कटला, सिप्रिनस कार्प, मृगळ या जातीचे मत्स्यबीज सोडले असून आता ते मत्स्यशेतीचाही जोडधंदा करू लागले आहेत. सामूहिक शेततळ्याचा दोन वर्षांपूर्वी लाभ मिळाल्याने हक्काचे पाणी उपलब्ध झाले. यात घेतलेल्या पिकातून दररोज नगदी पैसे मिळत असून संत्र्याच्या झाडांना भरपूर पाणी मिळत आहे. 'अगोदर आमची आर्थिक परिस्थिती बिकट होती. आता शेतात शेततळे झाल्याने ६ एकर जमीन ओलिताखाली आली. त्यात उत्पादनही चांगले होत आहे, असे गोदावरीबाई आणि रामचंद्र घुले यांनी सांगितले.

**अनिल आलूरकर**
जिल्हा माहिती अधिकारी, नांदेड/परभणी



करंबळे (ता. कळवण) येथील हिरामण व शेवंताबाई बागूल हे समाधानी दांपत्य.

## आनंद आणि विश्वास

कळवण तालुक्यातील दुर्गम अशा करंबळे गावातील शेवंताबाई सध्या आनंदात आहेत. पाऊस गेल्यानंतरही हिरवेगार दिसणारे शेत त्यांच्या चेहऱ्यावरच्या हास्याचे कारण आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत सिंचन विहीर बांधून मिळाल्याने त्यांच्या शेतात कोरडवाहू टोमॅटोचे पीक उभे राहिले आहे.




शेवंताबाई बागूल आणि त्यांचे पती हिरामण बागूल शेतमजुरी करून वर्षानुवर्षे कुटुंबाचा गाडा हाकत आहेत. दोन मुले कष्टाने मोठी केली. आपल्या दोन एकर शेतात पाणी असेल तेवढे मका–सोयाबीनचे उत्पन्न घ्यायचे आणि कुटुंबापुरता दाणा साठवायचा एवढेच त्यांना माहीत होते. इतर खर्चासाठी मजुरीवर अवलंबून राहावे लागे.

या वर्षी ग्रामपंचायतीतून सिंचन विहिरीची माहिती त्यांना मिळाली आणि विहिरीसाठी अनुदानही मिळाले. स्वत: अकुशल काम केल्याने ७१ हजार आणि कुशल कामासाठी ८५ हजार अनुदान त्यांना रोहयोअंतर्गत मिळाले. विहिरीवर इलेक्ट्रिक मोटार आणि पाईप बसवून मिळाला. त्याचे २६ हजार वेगळे अनुदान मिळाले. विहिरीला चांगले पाणी लागले. शेतासाठी पाणी उपलब्ध झाल्याने शेतात प्रथम टमाट्याचे पीक उभे राहिले. कांदा आणि गाजरदेखील काही प्रमाणात लावले आहे.

मजुरी करताना विहिरीसाठी पैसे उभारणे अशक्य होते. शासनाच्या योजनेमुळे आता मजुरीसाठी बाहेर जावे लागणार नाही, किमान प्रमाण तरी कमी होईल, याचे समाधान या दांपत्याला आहे.

'आता स्वत:चं शेत फुलवायचं' हे हिरामण बागूल यांचे शब्द त्यांच्या मनातील आनंद आणि विश्वासाची भावना प्रकट करणारे आहेत.

## 'लाख'मोलाचे शेततळे

'जमीन असूनही उत्पन्न नव्हते. शेततळे आले अन् लाखांची कमाई झाली. या भागात टोमॅटो पीक आमच्यासारखे कोणाच्याच शेतात दिसणार नाही'. कळवण तालुक्यात निवाने गावातील सकुबाई उत्तम अहिरे आणि उत्तम अहिरे या शेतकरी दांपत्याची ही उत्स्फूर्त प्रतिक्रिया. 'मागेल त्याला शेततळे' योजनेंतर्गत शेततळे बांधल्याने त्यांच्या शेताचे अर्थकारण बदलले आहे.

सकुबाई यांच्याकडे साडेतीन एकर आणि त्यांचे पती उत्तम अहिरे यांचेकडे चार एकर जमीन आहे. पारंपरिक कांदा, मका, काही प्रमाणात भाजीपाला असे उत्पादन शेतात घेतात. बऱ्याचदा दुसऱ्या पिकासाठी पाण्याची कमतरता भासत असे. एप्रिल–मे महिन्यात आलेले उन्हाळी पीक करपून जात असे.

'मागेल त्याला शेततळे' योजनेची



निवाने (ता. कळवण) येथील उत्तम आणि सकुबाई अहिरे यांच्या शेतातील शेततळे.

माहिती कृषी अधिकाऱ्यांकडून मिळताच सकुबाईंनी शेततळ्यासाठी अर्ज केला. त्यांना शेततळ्यासाठी ५० हजार आणि राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत प्लास्टिक कापडासाठी ७५ हजाराचे अनुदान ३० x ३० मीटर आकाराच्या शेततळ्यासाठी मिळाले.

शेततळे तयार केल्यानंतर अहिरे दांपत्याला पहिल्याच वर्षी टोमॅटो पिकातून १५ लाखांपेक्षा अधिक उत्पन्न घेतले. उन्हाळी कांदा पीक घेणेदेखील त्यांना शक्य झाले. पावसाळ्यात विहिरीच्या पाण्याने शेततळे भरल्यावर उन्हाळ्यात त्याचा फायदा होतो. नैसर्गिक उताराने पाणी शेताला जात असल्याने वीजेवर आणि मजुरांवर अवलंबून राहावे लागत नाही याचे सकुबाईंना समाधान आहे. त्यांना मक्यासाठी स्वयंचलित पेरणी यंत्रासाठी साडेतेरा हजार रुपये अनुदान मिळाले आहे. रोहयो अंतर्गत गांडूळ खत युनिटही त्यांना मिळाले आहे. 'शासनाची कोणतीही योजना आली की विश्वासाने ती घ्यायची, परिणाम चांगलेच निघतात' उत्तम अहिरे आनंदाने सांगतात.

जिल्हा माहिती कार्यालय, नाशिक

## नवी दिशा

नंदुरबार तालुक्यातील होळ येथील नथू दंगल पाटील यांच्याकडे ६ एकर कोरडवाहू शेती आहे. ही शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. पाऊस चांगला पडला तर कोरडवाहू शेतकऱ्याला भविष्य नाही तर अंधारमय जीवन, भविष्याचा विचार करता नथू पाटलाने आपणही बागाईत शेती करावी, असा विचार घरातील लोकांना बोलून दाखवला. गावात काही लोकांनी शेततळे घेतले ते बागाईत शेती करत असल्याने त्यांची परिस्थिती सुधारली असल्याचे त्यांना दिसत होते. आपणही शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा असा विचार त्यांच्या मनात आला. त्यांनी तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे मागेल त्याला शेततळे योजनेतून शेततळे मिळावे यासाठी अर्ज केला. अर्जासोबत कागदपत्रांची पूर्तता केली. 'मागेल त्याला शेततळे' या योजनेंतर्गत शेततळ्याच्या अस्तरीकरणासाठी राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत लाभ मिळवून २० x २० x ३



होळ (ता. नंदुरबार) येथील नथू पाटील यांच्या शेतातील कांदा पीक.

मीटर आकाराच्या शेततळ्याच्या खोदकामासाठी ३६ हजार व प्लास्टिक कागद खरेदीसाठी ३६ हजार असे एकूण ७२ हजार अनुदान देण्यात आले व नथू पाटील यांनी वैयक्तिक ५३ हजार रुपये खर्च केला. कारण त्यांना ६ एकर कोरडवाहू शेतीत सिंचनाची व्यवस्था करावयाची होती. शेततळे तर झाले यात पाणी कुठून आणावे या विचारात असताना श्री. पाटील यांनी होळ गावातील काही शेतकऱ्यांशी विचारविनिमय केला, गावात काही शेतकऱ्यांनाही मागेल त्याला शेततळे योजनेत शेततळे मिळाले असल्याने त्यांच्याही शेततळ्यासाठी पाण्याचा प्रश्न निर्माण झाला होताच, अशा शेतकऱ्यांशी श्री. पाटील यांनी संपर्क साधला. गावाच्या ६ कि.मी. अंतरावर तापी नदी वाहते या नदीतून पाच इंच पाईपच्या साहाय्याने पाणी आणण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी किमान २१ लाख रुपये खर्च अपेक्षित असल्याचे त्यांना कळाले, सर्वांनी मुलांबाळाच्या भविष्याचा विचार करून आपल्याकडे असलेले व काही नातेवाईकांकडून घेऊन प्रत्येक शेतकऱ्याने ७ लक्ष रुपये उभे केले. या निधीतून ६ कि.मी. पाइपलाइन टाकून होळ गावाच्या शिवारात पंपिंगने पाणी आणण्यात आले. पाणी आल्यामुळे श्री. पाटील यांचा उत्साह द्विगुणित झाला.




सहा एकर शेतात त्यांनी आपल्या कुटुंबांच्या साहाय्याने पहिल्या वर्षी कापूस व कांदे लागवड केली. सध्या श्री. पाटील यांना वर्षाकाठी खर्च वजा जाता किमान ३ ते ४ लाख रुपये बचत होते. घरात ७ लोक असून तेही शेतीच्या कामात मदत करत असतात. शेततळ्यामुळे शेतीच्या उत्पादनात वाढ झाली.

जिल्हा माहिती कार्यालय, नंदुरबार

होय, प्रगती करतोय महाराष्ट्र माझा

**रोजगार निर्मितीसाठी शासनाने विविध योजना राबवल्या आहेत. या माध्यमातून युवकांना स्वत:चे उद्योग उभारता आले. काहींनी या योजनांचा लाभ घेऊन स्वत:च्या मालकीचा व्यवसाय उभारला. २०१८ मध्ये मृद् व जलसंधारण विभागामार्फत प्रथमच सुरू केलेल्या ‘जलसमृद्धी यंत्रसामग्री (अर्थमूव्हर्स) व्याज अर्थसाहाय्य योजने’चा लाभ घेऊन आर्थिक प्रगती साधली.**

# रोजगार मिळाला, नैराश्य गेले...

## उद्योजक

तुमच्याकडे उत्तम शिक्षण, काहीतरी नवीन करून दाखवण्याची जिद्द असेल तर विविध क्षेत्रे व शासकीय योजना तुमची वाट पाहत आहेत. हे आत्मविश्वासयुक्त बोल कुणाल शेटे या युवकाचे.

कुणाल शेटे या युवकाने १२ वी नंतर जळगाव येथील गुलाबराव देवकर अभियांत्रिकी महाविद्यालयात ऑटोमोबाइल्सचा डिप्लोमा पूर्ण केला. डिप्लोमाचे शिक्षण झाल्यानंतर त्याने प्रथम नंदुरबार येथेच मारुती सेवा ऑटोमोबाइल्स येथे ६ महिने अनुभवासाठी अल्प पगारात नोकरी केली त्यानंतर त्याने मुंबई-बेलापूर येथे हुंदाई कंपनीत १२,५०० रुपयांवर एक वर्षभर खासगी नोकरी केली. यानंतर त्याने स्वत:चा व्यवसाय सुरू करण्याचा निश्चय केला. त्यासाठी त्याने अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेचा लाभ घेतला.


कुणाल शेटे

नंदुरबार येथील पटेलवाडीमध्ये सुरुवातीला छोट्या स्तरावर ऑटोमोबाइल्स स्पेअरपार्ट, ऑईल विक्रीचा व्यवसाय सुरू केला. यात अपशय आले, विक्री होत नव्हती, मोठे दुकान व माल वाढवण्यासाठी पैसे नव्हते, शेवटी हा व्यवसाय बंद करावा की काय इथपर्यंत त्याच्या मनात विचार आला, मात्र अशा विवंचनेत असतानाच वृत्तपत्रात अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या योजनांची माहिती वाचली. कार्यालयाकडे धाव घेतली. सर्व कागदपत्रांची जुळवाजुळव करून कर्ज प्रकरण सादर केले. त्याला साथ दिली युनियन बँकेने, महामंडळाच्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेनुसार ३ लाख २० हजार रुपये कर्ज मिळाले. मोडकळीस आलेल्या व्यवसायाला उभारी मिळाली. पटेलवाडी येथे मोठे दुकान भाड्याने घेतले, दुकानात ऑटोमोबाइल्स स्पेअर पार्ट बरोबर बॅटरी व ऑईल विक्रीसाठी ठेवण्यास सुरुवात केली. नामवंत ऑईल कंपन्याचे ऑईल विक्रीसाठी उपलब्ध झाल्यामुळे व होलसेल विक्री वाढल्यामुळे ग्राहक वाढले. व्यवसाय बहरला आणि समृद्धी आली, आज कुणाल यांच्या दुकानाची महिन्याकाठी ९ ते १० लाख रुपयांची उलाढाल होते. जी सुरुवातीला केवळ ८० ते ९० हजार रुपयांची होती. व्यवसायात वृद्धी झाल्यामुळे ग्राहक संख्या वाढली. नंदुरबार येथे दुसरा कुठलाही होलसेल ऑईल विक्रेता नसल्यामुळे कुणाल शेटेकडे नंदुरबारसह धुळे आणि मालेगाव येथून खरेदी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात ग्राहक येतात. ग्राहकांकडून अल्प नफा घेतल्यामुळे ते संतुष्ट होतात.




कुणाल शेटे यांनी Marg कंपनीच्या erpg+ या बिलिंगच्या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून, नंदुरबार शहरासह ग्रामीण भागात जीएसटी कपातीबाबतचे जे सॉफ्टवेअर बिलिंगसाठी वापरतात ते सॉफ्टवेअर तो किरकोळ विक्रेते उद्योजक, दुकानदार यांना अल्प किंमतीत उपलब्ध करून देतो. त्यामुळे यातूनही कुणाल शेटे याला उत्पादनाचे साधन उपलब्ध झाली आहे.

## स्वत:चा स्टुडिओ

गिरीश पाटील हा शहादा तालुक्यातील करणखेडा या गावातील सुशिक्षित तरुण आहे. त्याचे १२वी पर्यंत शिक्षण झाले आहे. कौटुंबिक परिस्थिती तशी बेताचीच. त्याला नेहमी वाटत असे की, आपण आपल्या कुटुंबाला आर्थिक हातभार लावावा. मात्र त्याला मार्ग सापडत नव्हता. मुद्रा बँक योजनेमुळे स्वत:चा स्टुडिओ उभारण्याचे त्याचे स्वप्न पूर्ण झाले आहे.

भारतीय स्टेट बँक ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था नंदुरबार येथे ४ ते २४ ऑगस्ट २०१६ या कालावधीत बेसिक फोटोग्राफी आणि व्हिडिओग्राफी या २१ दिवसांचे निवासी प्रशिक्षण गिरीशने पूर्ण केले. प्रशिक्षणादरम्यान उद्योजकीय विकास, प्रभावी संभाषण, प्रेरित करणे, बँकिंग,



गिरीश पाटील

विपणन या विषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या मार्गदर्शनामुळे त्याचा आत्मविश्वास वाढल्याने त्याने फोटोग्राफीचा व्यवसाय सुरू करण्याचा निश्चय केला. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर गिरीशला व्यवसाय सुरू करावयाचा होता मात्र त्याच्याकडे पुरेसे भांडवल नव्हते. त्याने मित्रासोबत आऊटडोअर फोटोग्राफी करून पैशाची बचत केली. बचत केलेल्या पैशातून कॅमेरा विकत घेतला. फोटो एडिटिंग आणि अल्बम डिझाईन करण्यासाठी संगणकाची आवश्यकता होती. मात्र त्याच्याकडे संगणक विकत घेण्यासाठी भांडवल नव्हते.

त्याची जिद्द आणि धडपड बघून ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थेचे संचालक संजय धामणकर यांनी भारतीय स्टेट बँक शाखा प्रकाशा येथे प्रधानमंत्री मुद्रा योजनेत त्याचे कर्ज प्रकरण पाठवले. वैयक्तिक पाठपुरावा केला व ५० हजार रुपयांचे अर्थसाहाय्य उपलब्ध करून दिले. गिरीशने जगतापवाडी नंदुरबार येथे स्माईल फोटो स्टुडिओ या नावाने फोटो स्टुडिओ सुरू केला. या परिसरात स्टुडिओ नसल्यामुळे त्याला मोठ्या प्रमाणात काम मिळू लागले.

फोटोग्राफीच्या व्यवसायातून गिरीश पाटील महिन्याला किमान २० ते २५ हजार कमवतो. गिरीशची भाषाशैली, ग्राहकाला पटवून देण्याचे कौशल्य तसेच त्याचा फोटोग्राफीमधला अनुभव याच्या जोरावर गिरीशला ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थेमध्ये फोटोग्राफी आणि व्हिडीओग्राफी या प्रशिक्षणासाठी तांत्रिक प्रशिक्षक म्हणून नियुक्त केले जाते.

गिरीश या यशाचे श्रेय ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था नंदुरबार व भारतीय स्टेट बँक शाखा यांना देतो. शासनाने बेरोजगार तरुणांना प्रशिक्षण देऊन प्रधानमंत्री मुद्रा योजनेतून स्टेट बँकच्या साहाय्याने कर्ज उपलब्ध करून दिल्यामुळे माझ्यासारख्या अनेक तरुणांना स्वत:चा व्यवसाय करण्याची व आत्मनिर्भर होण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली आहे. या संधीचा तरुणांनी लाभ घ्यावा असेही आवाहन, गिरीश पाटील यांनी केले आहे.

**जगन्नाथ पाटील**

प्र. जिल्हा माहिती अधिकारी, नंदुरबार

## अर्थकारणाला बांबूमुळे कलाटणी

बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्राची मान्यता झाल्यानंतर पाठोपाठ बांबूच्या वाहतुकीवरील करही हटवण्यात आला आणि केंद्र शासनानेदेखील बांबू हा गवताच्या श्रेणीतील एक प्रकार असल्याचे मान्य करून बांबूच्या लागवडी, विक्री वापरावरील सर्व निर्बंध दूर केले आहेत. या सर्व दूरदृष्टीच्या निर्णयाचा परिणाम चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली जिल्ह्यात दिसू लागला आहे.

चंद्रपूर जिल्ह्यामध्ये बांबू संशोधन आणि प्रशिक्षण केंद्रामुळे मोठ्या प्रमाणात बांबूपासून वेगवेगळ्या वस्तू बनवण्याच्या प्रशिक्षणाला सुरुवात झाली आहे. एवढेच नव्हे तर बांबूपासून वेगवेगळ्या वस्तू बनवण्यासाठीच्या अभ्यासक्रमाला सुरुवात झाली आहे. उमेदवाराला नि:शुल्क निवास, भोजन व्यवस्था उपलब्ध करण्यात येत असून ७० दिवसांचे प्रशिक्षण, ४५ दिवसांचे प्रशिक्षण, ६० दिवसांचे प्रशिक्षण अशा वेगवेगळ्या अभ्यासक्रमांची सुरुवात करण्यात आली आहे. चंद्रपूर सोबतच लिंबाळा, शिवणी, चिखलगाव, टेकाडी, चेक निंबाळा, निंबाळा, मोहाडी, हळदी, कोलारा, वायगाव, सातारा आदी गावांमध्ये फर्निचर, टर्निंग, बास्केट्री आदी विषयांचे प्रशिक्षण देण्यात आले. नुकतेच नवे केंद्र विसापूर येथे सुरू करण्यात आले. अनेक गावांमध्ये सर्वसाधारण उपयोगिता केंद्राची निर्मिती करण्यात आली.

### हस्तकला कौशल्य प्रशिक्षण




जिल्हा कारागृहामध्ये सुद्धा बांबू हस्तकला कौशल्य प्रशिक्षणाचा उपक्रम राबवण्यात आला. महिला बचतगटांना या उपक्रमांत सहभागी करण्यात आले. यामुळे आतापर्यंत एक हजार महिलांना रोजगार उपलब्ध झाला, त्यांच्या कौशल्याला बाजारपेठेच्या उपलब्धतेनुसार मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होणार आहे. बांबू प्रशिक्षण व संशोधन केंद्रामार्फत बनवलेल्या वस्तूंची विक्री करण्यासाठी विक्री केंद्रही उभारले जात आहे. तसेच विविध व्यावसायिक



कंपन्यांशी करार करण्यात येत आहे. अगरबत्ती, टुथपिक, झेंडे, डायनिंग टेबल, खुर्च्या, शोभेच्या वस्तू अशा वस्तूंची निर्मिती या ठिकाणी होत आहे. नुकत्याच ५० हजार बांबूच्या राख्यांची विक्री करण्यात आली आहे.

### आदिवासींना फायदा

सरकारने बदललेल्या बांबू धोरणामुळे व

या संदर्भात सुरू करण्यात आलेल्या विविध अभ्यासक्रमामुळे पूर्व विदर्भात अर्थकारण बदलण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. शासनाच्या या निर्णयाचा वनावरील अवलंबित्व असणाऱ्या आदिवासी बांधवांना मोठ्या प्रमाणात फायदा झाला आहे.

## हिऱ्यातील संधी

चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर हे शहर ऐतिहासिक शहर म्हणून परिचित आहे. परंतु आता डायमंड कटिंग सेंटरमुळे या ठिकाणी उद्याच्या डायमंड पार्कची मुहूर्तमेढ रोवली जात आहे. या ठिकाणी गेल्या फेब्रुवारी महिन्यात सुरू झालेल्या प्रशिक्षणातील पहिल्या १०० मुलांना प्रशिक्षण संपल्याबरोबर नोकरीचे आदेश हातात मिळाले आहे. त्यामुळे या ठिकाणावरून मोठ्या प्रमाणात हिऱ्याला पैलू पाडणारे कौशल्ययुक्त मनुष्यबळ निर्माण होत असल्याने याच ठिकाणी कारखाना उघडण्याचे सूतोवाच अनेक डायमंड व्यापाऱ्यांनी केले आहे.

जागतिक स्तरावर हिऱ्याला पैलू पाडण्याच्या मनुष्यबळाची प्रचंड मागणी असून कौशल्य विकास विभागांतर्गत या ठिकाणी दरवर्षी एक हजार विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

### बांबू केंद्राद्वारे रोजगार

२०१५ मध्ये सुरू करण्यात आलेल्या बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या देखण्या इमारतीला एकीकडे आकार येत असताना दुसरीकडे कौशल्य विकासाचा यज्ञ पेटला आहे. या केंद्रातून गेल्या दोन वर्षात किमान दीड हजार लोकांना प्रशिक्षण मिळाले आहे. या ठिकाणी तयार होणाऱ्या बांबूपासूनच्या विविधांगी वस्तूंनी बाजारात धूम करायला सुरुवात केली आहे.

या ठिकाणचा बांबूपासूनचा राष्ट्रध्वज प्रधानमंत्र्यांच्या कार्यालयात विराजमान झाला आहे. जागतिक ऑनलाइन कंपन्यामार्फत आता या विक्री केंद्रातून वस्तूंची मागणी होत आहे. मोठ्या प्रमाणात महिला बचतगटांना या ठिकाणी प्रशिक्षण दिले जात आहे.

### ५२०१ बेरोजगारांना नोकरी

या जिल्ह्याच्या शासन, प्रशासनाच्या रोजगार निर्मिती धोरणांतर्गत मुद्रा मेळावा नुकताच घेण्यात आला. बल्लारपूर येथे झालेल्या या युथ एम्पॉवरमेंट समिटमध्ये ५६ जागतिक कंपन्यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील ५२०१ युवकांची वेगवेगळ्या नोकऱ्यांसाठी निवड केली. ऑक्टोबर महिन्यात झालेल्या या मेळाव्यामध्ये चंद्रपूरसारख्या मागास समजल्या जाणाऱ्या जिल्ह्यामध्ये सुशिक्षित बेरोजगारांनी पाच दिवसात ३८ हजार ऑनलाइन नोंदणी केली. या मेळाव्यात सहा गटामध्ये विद्यार्थ्यांना नव्या रोजगाराच्या वाटा उपलब्ध करण्यात आल्या. सोबतच स्पर्धा परीक्षा, व्यवसाय निर्मिती व उन्नत शेती सारख्या क्षेत्राची व्याप्तीही समजून सांगण्याचे काम करण्यात आले.

चंद्रपूरमध्ये गेल्या वर्षात एक हजार आदिवासी महिलांनी कंपनी स्थापन करून देशी अंडा निर्मिती उद्योगामध्ये आघाडी घेतली आहे. मुल, बल्लारपूर व चंद्रपूर यांसह जिल्ह्यात स्पर्धा परीक्षांना चालना देण्यासाठी अभ्यासिका निर्माण केल्या आहेत. कौशल्य विकासावर आधारित व उद्योगपूरक



बचतगटांच्या माध्यमातून बांबूपासून विविध वस्तूंची निर्मिती करताना महिला.

अभ्यासक्रम आयटीआयमध्ये सुरू करण्यात आले आहे. टाटा ट्रस्टच्या मदतीने कृषी क्षेत्रातील प्रशिक्षण व समूहशेतीचे प्रयोग होत आहेत. सिमेंट, लोखंड, कोळसा, चुना, कागद, वीजनिर्मिती अशा उद्योगाची खाण असणाऱ्या चंद्रपूर जिल्ह्यासाठी उद्योग व्यवसायाचे नवीन दालन उघडले जात आहे.

**प्रवीण टाके**
जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर

## मी मालक

जालना तालुक्यापासून १० ते १५ किलोमीटर अंतरावर असलेले माळशेंद्रा हे गाव. साधारणतः दोन हजार लोकसंख्येच्या या गावाच्या उदरनिर्वाहाचे साधन शेती आहे. गावातील तरुण शेती अथवा छोटामोठा व्यवसाय करून आपली गुजराण करतात. व्यवसायासाठी खूप मोठ्या संधी आहेत पण तो करण्यासाठी गरज आहे ती भांडवलाची. असे भांडवल शासनाच्या जलसमृद्धी अर्थमूव्हर्स योजनेने उपलब्ध करून दिले आहे. या योजनेचा लाभ घेऊन आनंद म्हस्के आज मालक बनला असून महिन्याकाठी ७० ते ८० हजार रुपये कमावत आहे.




श्री. म्हस्के यांनी जालन्यातील मत्स्योदरी महाविद्यालयातून एम. कॉमपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले.पदव्युत्तर शिक्षणानंतर दोन वर्षे औरंगाबादमध्ये बँकिंगसंबंधी परीक्षांची तयारी केली. वेगवेगळ्या परीक्षा दिल्या. मात्र, यशाने थोड्या गुणांनी हुलकावणी दिली. अशा स्थितीत निराश न होता श्री. म्हस्के यांनी प्रयत्न सुरू ठेवले. शासनाने २०१८ मध्ये मृद् व जलसंधारण विभागामार्फत प्रथमच सुरु केलेल्या 'जलसमृद्धी यंत्रसामग्री (अर्थमूव्हर्स) व्याज अर्थसाहाय्य योजनेबाबत आनंद यांना माहिती मिळाली. या योजनेसंबंधीच्या शासन निर्णयाचा त्याने अभ्यास केला. या योजनेच्या माध्यमातून सुशिक्षित बेरोजगार तरुण स्वत:चा व्यवसाय सुरू करू शकतो, याची खात्री पटल्यानंतर आनंद यांनी या योजनेचा ऑनलाइन अर्ज



आनंद म्हस्के

भरला. या योजनेचा लाभार्थी म्हणून निवड झालेल्या व्यक्तीला शासनाकडून अर्थमूर्व्हस यंत्र खरेदीसाठी वित्तीय संस्थेकडून घेतलेल्या कर्जावर पाच लाख ९० हजार रुपयांपर्यंतचे व्याज अनुदान स्वरूपात टप्प्याटप्प्याने दिले जाते. व्याज रकमेची शासनाकडून हमी असल्यामुळे लाभार्थी म्हणून निवड झालेल्या व्यक्तीला वित्तीय संस्थेकडून अर्थसाहाय्य केले जाते. शिवाय मृद व जलसंधारण विभागामार्फत दुष्काळ निवारणार्थ केली जाणारी जलसंधारणाची कामेही प्राधान्याने दिली जातात.

ऑनलाइन प्राप्त अर्जांची छाननी झाल्यानंतर आनंद यांची अंतिम यादीत लाभार्थी म्हणून निवड झाली. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर त्यांनी बँक ऑफ इंडिया जालना शाखेकडून अर्थमुव्हर्स यंत्रसामग्री यंत्र खरेदीसाठी अर्थसाहाय्य मिळवण्यासाठी अर्ज केला. सोबत लाभार्थी म्हणून निवड झाल्याचे पत्रही दिले. बँक ऑफ इंडियाच्या जालना शाखेने श्री. म्हस्के यांचे शासन मर्यादेनुसार १७ लाख ६० हजार रुपयांचे कर्ज प्रकरण मंजूर केले. उर्वरित सात लाख रुपयांच्या रकमेची जुळवाजुळव करण्यासाठी आनंद यांनी कुटुंबीय व नातेवाइकांची मदत घेतली. अर्थमूव्हर्स यंत्र खरेदी केले. मे महिन्यात त्यांच्या यंत्राला चांगले कामे मिळाले. बँकेचा पहिला हप्ता त्यामुळे वेळेत भरता आला. यंत्राला चांगली कामे मिळत असल्यामुळे श्री. म्हस्के यांनी अर्थमूव्हर्स यंत्रचालक म्हणून दोन तरुणांना नोकरी दिली. शिवाय या माध्यमातून भविष्यात अन्य कामेही सुरू करण्याचा त्यांचा मानस आहे.

जलयुक्त शिवार अभियानाच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या कामांसाठी या योजनेंतर्गत निवड झालेल्या लाभार्थ्यांच्या अर्थमूव्हर्स यंत्राला प्राधान्याने कामे दिली जाणार असल्यामुळे, आपला आत्मविश्वास वाढल्याचे श्री. म्हस्के यांनी सांगितले.

**अमोल शिवकांत महाजन**

जिल्हा माहिती कार्यालय, जालना

## घरबांधणीचे कौशल्य



स्वप्नील खंडाते

असावे सुंदर अपुले घरकुल छान, अश्या गाण्याच्या ओळी आपण सहज गुणगुणतो... मात्र छान घरकूल बांधणाऱ्या सुंदर हातांना अर्थबळ देण्याचे, औजार देण्याचे काम शासनाने केले आहे.




महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत कामगारासाठी अनेक कल्याणकारी योजना राबवण्यात येतात. स्वप्नील खंडाते हा पारशिवणी तालुक्यातील २३ वर्षाचा तरुण मिस्त्री काम करतो. कुटुंबाची उपजीविका चालवण्यासाठी मोलमजुरी करणे गरजेचे होते म्हणूनच मग त्याने मिस्त्री काम सुरू केले. कामगार मंडळाकडून त्याला औजार खरेदीसाठी मिस्त्री कामासाठी ५ हजार रुपये अर्थसाहाय्य करण्यात आले. तसेच बचावासाठी सुरक्षेविषयी प्रशिक्षण देण्यात आले. हेल्मेट/गमबूट/हातमोजे देण्यात आले. उंच जागेवर काम करताना सेफ्टी बेल्ट वापरण्याचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

**शैलजा वाघ-दांदळे**


माहिती अधिकारी, नागपूर

## नवी उमेद




उस्मानाबाद जिल्ह्यातील खेड गावातील जगदीश दिगंबर लोमटे हे एक बांधकाम कामगार आहेत. कुटुंबात पत्नी, इंजिनिअरिंगचे शिक्षण घेत असलेला मुलगा. काम मिळाले तरच पोट भरण्याची सोय. घरची परिस्थिती हलाखीची. मात्र काहीतरी करण्याची जिद्द.

एकदा बांधकामावर काम करताना तेथील कंत्राटदाराने त्यांना विचारले की, जगदीश तुमची सरकारी कामगार अधिकारी कार्यालयात नोंदणी झाली आहे का? तेव्हा आधार कार्ड, रेशन कार्ड, बँक पासबुक, फोटो आदी कागदपत्रे जमा करून स्वतःची बांधकाम कामगार म्हणून सरकारी कामगार अधिकारी कार्यालयात नोंद करून घेतली. या नोंदणीच्या आधारावर त्यांना मुलाच्या शिक्षणाकरिता ३५ हजार रुपयांचे अनुदान मिळाले. मुलगा तेरणा इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये मेकॅनिकल इंजिनिअरिंग्या चौथ्या वर्षात शिकत आहे. प्रत्येक वर्षाचे शैक्षणिक शुल्क जवळपास ८५ हजार रुपये आहे, मात्र बांधकाम कामगारासाठी शासनाच्या योजनेतून मिळालेल्या ३५ हजार रुपये अनुदानामुळे जगदीश यांना मोठा आधार मिळाला. यानंतर त्यांना पुन्हा पाच हजार रुपयांचे अनुदान मिळाले. या अनुदानातून जगदीश यांना बांधकामाकरिता लागणाऱ्या जसे की फावडे, घमेले, रंधा, ओळंबा या साहित्याची खरेदी करता आली.



जगदीश लोमटे

जगदीश लोमटे यांच्या आयुष्यात बांधकाम कामगारांच्या प्रगतीसाठी, साहाय्यासाठी शासन राबवत असलेल्या या योजनेमुळे खूप फरक पडला.

जिल्हा माहिती कार्यालय, उस्मानाबाद

## कर्जमाफीमुळे डोक्यावरचा भार कमी

सातपूर गावातील सुंदराबाई विधाते यांनी पतीच्या निधनानंतर कष्टाने शेती फुलवली आणि कुटुंबाची जबाबदारी समर्थपणे पेलली. थोरल्या मुलाने केलेल्या आत्महत्येचा मोठा धक्का पचवला. शेतीवरची निष्ठा आणि कुटुंबाप्रतिची जबाबदारी अशा दोन्ही बाजू सांभाळताना संकटे आली. पण, त्या डगमगल्या नाहीत. सोने गहाण ठेवून कर्ज घेण्याची पाळी आल्यावर त्यांना प्रथमच मोठा धक्का बसला. छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेमुळे गहाण ठेवलेले सोने पुन्हा मिळवण्याचे समाधान त्यांना मिळाले.

वय वर्ष ६५ असलेल्या सुंदराबाईंचा मुलगा, मुलगी, सून आणि नातवंडे असा आठ व्यक्तींचा परिवार. पतीच्या निधनानंतर सुंदराबाई यांनी पूर्ण वेळ शेतीचा व्यवसाय चालू ठेवला. एक एकर १४ गुंठे शेतीत विविध भाजीपाल्यांची पिके घेऊन आर्थिक परिस्थिती सावरण्याचा प्रयत्न त्यांनी सुरू ठेवला.



सुंदराबाई विधाते

शेतीमध्ये अजून उत्पन्न मिळावे व पिकांची लागवड चांगली व्हावी याकरिता त्यांनी परिवारासह चांगली शेती केली. मध्यंतरी नैसर्गिक आपत्तीला तोंड द्यावे लागले. त्यामुळे त्यांच्या पिकांचे नुकसान झाले. या नुकसानीचे दु:ख व्यक्त न करता त्यांनी पुन्हा जोमाने शेती करावी, या हेतूने नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे सोने गहाण ठेवून कर्ज मिळवले.

शेतात कोबी, भेंडी विविध भाजीपाला तसेच झेंडूच्या फुलांची बाग लावली. पण अशा परिस्थितीमध्ये कर्जाच्या परतफेडीचा मोठा प्रश्न त्यांच्यासमोर होता. त्या वेळी शासनाने जाहीर केलेल्या छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान कर्जमाफी योजनेची माहिती त्यांच्या कानावर पडली. आणि सुंदराबाई विधाते यांनी बँकेमध्ये सर्व कागदपत्रे देऊन कर्जमाफीचा लाभ घेतला. त्यांनी घेतलेले १ लाख ६ हजार रुपयांचे कर्ज व्याजासह माफ झाले.

'कर्जमाफी योजनेमुळे कर्जाचा भार कमी झाला' असे सांगताना त्यांच्या डोळ्यातले अश्रू आणि चेहऱ्यावरचे समाधान बरेच काही सांगणारे आहे. या वर्षी पहिल्याच हंगामात भेंडीचे चांगले उत्पादन घेता आले याचा आनंदही त्यांना आहे.

**प्रथमेश गायकवाड**

आंतरवासिता, जिल्हा माहिती कार्यालय, नाशिक




## मिळाला आधार

त्र्यंबकेश्वर तालुक्यात चिंचवड गावातील आदिवासी पाड्यावर राहणाऱ्या रघुनाथ जांबेकर या ७० वर्षे वयाच्या व्यक्तीस प्रधानमंत्री आवास योजनेमुळे म्हातारपणी हक्काचे घर मिळाले आहे. बऱ्याच वर्षापूर्वी जांबेकर यांच्या दोन्ही मुलींची लग्न होऊन त्या सासरी गेलेल्या. लग्न कधी झाले ते त्यांना आठवतही नाही. शेतमजुरी करून म्हातारा-म्हातारी संसारगाडा पुढे नेण्याच्या धडपडीत दिवस घालवताना, इतर गोष्टींकडे त्यांचे लक्षदेखील नाही. श्री. जांबेकर यांच्या पत्नीला दृष्टिदोष असल्याने फारसे दिसत नाही आणि ऐकायलादेखील कमी येते. त्यामुळे श्री. जांबेकर मजुरीला गेल्यावर घरात कुत्रे यायचे, घाण करायचे. पावसात कामाला गेल्यावर घराची चिंता त्यांच्या मनात असायची. 'घर मिळालं ते ह्यांच्यामुळं' सरपंच यांच्याकडे बोट दाखवत श्री. जांबेकर सांगतात. सरपंचांनी त्यांना योजनेची माहिती देण्याबरोबर काम सुरू करण्यासाठी स्वत:च्या पैशाने विटा खरेदी करून दिल्या. सिमेंटचे पक्के छत असलेले घर उभे राहिले. त्या पाड्यावरचं घरकूल योजनेतील ते पहिले घर.



रघुनाथ जांबेकर यांनी प्रधानमंत्री आवास योजनेतून बांधलेले घर.

घरासमारे ओटा बांधला असल्याने आता श्रीमती जांबेकर यांना बाहेर बसता येते. येणारे-जाणारे त्यांच्याशी बोलतात, विचारपूस करतात, त्यामुळे त्यांना बरे वाटते. 'नजर असती तर आणखी चांगले सजवले असते, घर चांगले झाले म्हणून लोक संग बसत्यात' श्रीमती जांबेकरांचा आनंद त्यांच्या शब्दातून व्यक्त होतो. घरात आता जनावरांचा त्रास होत नाही. या वयात हक्काचे घर मिळाले या समाधानाने श्री. जांबेकर यांना कामाची नवी उमेद मिळाली आहे.


जिल्हा माहिती कार्यालय, नाशिक

होय, प्रगती करतोय महाराष्ट्र माझा

## दिवाळीतीतील 'सौभाग्य'

त्र्यंबकेश्वर तालुक्यात आदिवासीबहुल सारस्ते गावातील वसंत पिंपळके, यांच्यासाठी यंदाची दिवाळी विशेष आनंदाची झाली. 'सौभाग्य' योजनेंतर्गत घरात वीज आल्याने त्यांच्याकडे आनंदोत्सव साजरा होत आहे.

पिंपळके शेतमजुरी करून लहानशा कुडात राहतात. दिवसभर कष्ट करून आल्यावर घरात मिणमिणत्या दिव्याच्या प्रकाशात रात्रीचे भोजन करत आणि सकाळी परत कामावर जात. मदतीला बॅटरी असायची ती रिचार्ज करण्यासाठी दुसऱ्यावर अवलंबून राहावे लागे. आर्थिक परिस्थितीमुळे घरात दिव्याची सुविधा करणे त्यांना शक्य नव्हते. दाराशी बांधलेल्या गुरांना चारापाणी अंधारात करावे लागे. रात्री कामासाठी घराबाहेर पडणे कठीण होते. अशा परिस्थितीत सौभाग्य योजनेंतर्गत त्यांना एक दिवा आणि मोफत वीज जोडणी मिळाली. वीज जोडणी येताच घरातील व्यवहार गतिमान झाले.


घरातील वीज जोडणी दाखवताना वसंत पिंपळके

घरात दिवा आल्याने अकरावीत असलेल्या मुलाला अभ्यासाची सुविधा झाली. बॅटरी चार्जिंगची सुविधा घरातच झाल्याचा आनंद, श्री. पिंपळके यांना आहे. दिवसभर थकल्यानंतर रात्रीच्या विरंगुळ्यासाठी घराच्या छतावर डिश अँटिना त्यांनी लावला. मुलगा अॅथलिट असल्याने अभ्यासासोबत चांगल्या क्रीडा स्पर्धा टीव्हीवर बघायला मिळतील, याचा त्याला विशेष आनंद आहे. या गावातील इतर ५० पेक्षा अधिक कुटुंबांसाठी या वेळची दिवाळी सौभाग्य योजनेमुळे विशेषच झाली. गावात फिरताना त्याचा आनंद प्रत्येकाच्या चेहेऱ्यावर दिसतो. विजेमुळे बाहेरील जगाची ओळख होण्याबरोबर विद्युतदिव्याच्या प्रकाशकिरणांत विकासाचा मार्ग ग्रामस्थांना दिसत आहे.

श्री. पिंपळके यांची मुलगी आपल्या बाळासह माहेरी आली आहे. बाळाकडे लक्ष देताना रात्रीची चिंता श्रीमती गुजराबाईंना राहिली नाही. वीज आल्याने श्रीमती गुजराबाईंना रात्रीची कामे करणे सोपे झाल्याचा आनंद आहे.

जिल्हा माहिती कार्यालय, नाशिक

## 'भाग्यश्री'चे समाधान

माझी कन्या भाग्यश्री योजनेचे औरंगाबाद जिल्ह्यातील लाभार्थी आरोही शिनगारे या कन्येच्या पालकांनी या योजनेमुळे आमची दुसरी कन्या आरोही ही आमच्यासाठी भाग्याची ठरली असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली. या योजनेमुळे आमच्या कुटुंबाला मोठा आर्थिक दिलासा मिळाल्याचे सांगितले.

आर्थिकदृष्ट्या हलाखीच्या परिस्थितीतील शिनगारे हे आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी मोलमजुरीची कामे करतात. कुटुंबात कमावणारे ते एकटेच असून त्यांना चार वर्षाची पहिली मुलगी असून तिच्या जन्मानंतर दोन वर्षानी भाग्यश्री योजनेचा लाभ घेतलेली आरोही शिनगारे या द्वितीय कन्येचा जन्म झाला. पहिल्या मुलीनंतर पुन्हा मुलगी झाल्याने आता भविष्यात दोन मुलींच्या शिक्षण आणि लग्नाचा खर्च कसा करायचा, या काळजीत असलेल्या शिनगारे दांपत्याच्या विवंचनेत वाढ झाली. पण आरोहीला लस देण्यासाठी जेव्हा आम्ही जवळच्या अंगणवाडी केंद्रात गेलो. त्या वेळी तिथे आम्हाला 'माझी कन्या भाग्यश्री' या योजनेबाबत माहिती मिळाली. त्यांनी आम्हाला त्यासाठी अर्ज कसा करायचा, याची माहिती देऊन अर्ज करा, तुम्ही जर पात्र ठरला तर या योजनेंतर्गत लाभ मिळेल, मुलीला भविष्यात आर्थिक मदत होईल, असं सांगितले. आरोहीला तिच्या १८व्या वर्षी शासनाकडून आर्थिक लाभापोटी चांगली रक्कम मिळेल, जी तिच्या शिक्षणासाठी कामाला येईल असा विचार आम्ही दोघांनी केला. मग योजनेचा अर्ज भरला, त्याला आवश्यक ते कागदपत्र लावले. गेल्याच महिन्यात आम्हाला त्याबाबतचे मुदत ठेव प्रमाणपत्र मिळाले. भाग्यश्री योजनेमुळे आम्हाला आरोहीच्या भविष्यासाठी मिळालेली आर्थिक मदत समाधान देणारी आहे, अशा शब्दात शिनगारे दांपत्याने आपल्या भावना व्यक्त केल्या. औरंगाबाद जिल्ह्यात माझी कन्या भाग्यश्री योजनेंतर्गत आतापर्यंत दहा लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला.




**वंदना थोरात**

माहिती अधिकारी, औरंगाबाद

# फेटरी : उत्कृष्ट आरोग्यसेवा

आमदार आदर्श ग्राम योजनेंतर्गत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दत्तक घेतलेल्या नागपूर तालुक्यातील फेटरी येथील माता बाल संगोपन उपकेंद्राला 'आयएसओ ९००१ : २०१५' प्रमाणपत्र प्राप्त झाले. हे उपकेंद्र विदर्भातील अशा प्रकारचे पहिलेच केंद्र आहे. गोंडखैरी प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत येणाऱ्या फेटरी माता बाल संगोपन उपकेंद्राद्वारे ६८०६ लोकसंख्येची आरोग्यसेवा सांभाळली जाते. यात फेटरी, येरला, चिचोली, बोढाळा, आष्टी, पारडी आणि गोन्ही या सात गावांचा समावेश आहे. फेटरी माता–बाल संगोपन केंद्राद्वारे गरोदर माता तपासणी, प्रसूती व त्यापश्चातच्या सेवा, लसीकरण, कुटुंब कल्याण कार्यक्रम, अनुसूचित जाती–जमाती व दारिद्र्यरेषेखालील लाभार्थ्यांना जननी सुरक्षा योजनेचा लाभ पुरवणे, पहिल्यांदा गरोदर राहिलेल्या मातांना प्रधानमंत्री मातृवंदन योजनेद्वारे अनुदान उपलब्ध करून देणे, क्षयरोग व कुष्ठरोग निदान आणि उपचार, कीटकजन्य व जलजन्य आजारावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि नियंत्रण, एचआयव्हीबाधित रुग्णांचे समुपदेशन तसेच गंभीर जखमी वा आजारी असलेल्या रुग्णांना प्रथमोपचारानंतर पुढील उपचारासाठी मोठ्या सरकारी इस्पितळांमध्ये पाठविणे यासारख्या सेवा पुरवल्या जातात.




फेटरी (ता. नागपूर) येथील माता बाल संगोपन केंद्र

फेटरी येथील नागरिकांना उत्कृष्ट आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी व्हिडिओ कॉन्फरसिंगद्वारे मुंबईच्या तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा उपलब्ध करून दिली आहे. महिलांची कर्करोग तपासणी करून त्यांच्यावर योग्य उपचार करण्यात आल्यामुळे गरीब व गरजू रुग्णांना चांगला लाभ मिळाला आहे. जिल्ह्यातील अद्ययावत केंद्र म्हणून फेटरी विकसित आहे.




याशिवाय सॅनिटरी पॅड व्हेंडिंग मशिनद्वारे किशोरवयीन मुलींना नॅपकिन उपलब्ध करून देणे, रुग्णांना शुद्ध पिण्याचे पाणी पुरवणे आणि सुदृढ आरोग्यासाठी विविध रोगांची दृकश्राव्य यंत्रणेद्वारे माहिती दाखवून जनजागृती केली जाते. या उपकेंद्राला यापूर्वी डॉ. आनंदीबाई जोशी गौरव पुरस्कार आणि फ्लॉरेन्स नाइटिंगेल हे जिल्हास्तरीय पुरस्कार मिळाले आहेत.

**डॉ. विजय पवार,** नागपूर

## उपचारासाठी मदत : लाभार्थी

यवतमाळ जिल्ह्यातील कुंडी (ता. झरीजामणी) येथे २६ वर्षीय किरण दुल्लरवार राहतात. साधारण परिस्थितीतील किरण व पुरूषोत्तम यांचे लग्न झाले. संसार व्यवस्थित सुरू असतानाच मलविसर्जनाच्या जागी किरणला गाठ आली. गाठीमुळे मलविसर्जनास त्रास होत होता. झरीजामणी तालुका हा भौगोलिक दृष्ट्या बऱ्यापैकी दुर्गम.

वेगवेगळ्या रूग्णालयात तपासणी करून शेवटी नागपूर येथील कर्करोग रूग्णालयात किरणला दाखल करण्यात आले. त्यांना रेक्टम कॅन्सरचे निदान झाले. महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजनेतून उपचारासाठी आर्थिक मदत झाली.



किरण पुरूषोत्तम दुल्लरवार



यशवंत नंदकुमार वाघ

## लाखाची मदत

मुख्यमंत्री सहायता निधीतून अपंग खेळाडू असलेल्या नागपूरच्या यशवंत वाघला एक लाख रूपयांची मदत झाली. विदर्भ दिव्यांग क्रिकेट असोसिएशनकडून तो क्रिकेट खेळायचा. मार्च २०१८ मध्ये राज्यस्तरीय चमूची निवड होत असताना झालेल्या अपघाताने तो कोलमडला. भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार अजित वाडेकर यांनी या खेळाडूला मदत करण्याची विनंती राज्य शासनाला केली. ३० एप्रिल रोजी त्याच्या हाताची शस्त्रक्रिया करण्यात आली. उपजीविका चालवण्यासाठी ३ चाकी सायकल त्याला देण्यात आली.

**सौर ऊर्जेवर आधारित उपसा सिंचन, हा प्रकल्प आर्वी तालुक्यातील बोथली नटाळा व पिंपळगाव भोसले या दोन गावांत यशस्वीपणे राबवण्यात आला. या अभिनव प्रकल्पासाठी चीनच्या युनॉन रिन्युएबल एनर्जी या कंपनीने सौर ऊर्जेवर आधारित यंत्रणा उपलब्ध करून दिल्यामुळे दोन्ही गावात शंभर हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले. अशा प्रकारचा हा राज्यातील पहिला प्रकल्प आहे.**

# सौर ऊर्जेवर 'सिंचन'

आर्वी तालुक्यातील बोथली नटाळा व पिंपळगाव भोसले ही गावे सुकळी मध्यम प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात येतात. येथील कठीण स्वरूपाच्या खडकाच्या भूगर्भाची रचना असल्यामुळे सिंचनाचा या गावांना लाभ मिळत नव्हता. शेतकऱ्यांची बऱ्याच वर्षाची मागणी लक्षात घेऊन नानाजी देशमुख प्रतिष्ठान, जिल्हाधिकारी शैलेश नवाल तसेच मुख्यमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी सुमीत वानखेडे यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे शेतकऱ्यांना सौर ऊर्जेवर आधारित सिंचन विहिरी उपलब्ध झाल्या आहेत. या प्रकल्पासाठी वर्धा जिल्हा प्रशासनाने वितरण प्रणालीसाठी ३० लक्ष रुपये उपलब्ध करून दिल्यामुळे शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ मिळाला आहे.

## ३० के.व्ही. ऊर्जा निर्मिती

या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी चीनच्या दूतावासाकडून सौर ऊर्जा संच उपलब्ध करून देण्यात आल्यामुळे या दोन्ही गावांत ३० के.व्ही. ऊर्जा निर्मिती सुरू झाली. त्यामुळे ३० एच. पी. क्षमतेची विद्युत मोटारपंप कार्यान्वित झाली. सुकळी मध्यम प्रकल्पातून दिवसातून किमान ५ लक्ष लिटर उपसा होतो. सात ते आठ तास विनाखंड सिंचन करणे शेतकऱ्यांना शक्य झाले. या प्रकल्पामुळे दोन्ही गावांना शंभर हेक्टर सिंचन उपलब्ध झाले. यामध्ये सौर ऊर्जा संच, मोटरपंप आणि मुख्य वहन नलिका चीनच्या दुतावासामार्फत उपलब्ध करून देण्यात आली.

## समप्रमाणात पाणी

सौर ऊर्जेवर आधारित या सिंचन योजनेसाठी बंद नलिका वितरण प्रणालीचा वापर करण्यात येत असल्यामुळे पाण्याचा अपव्यय कमी होऊन प्रत्येक शेतकऱ्यांना समप्रमाणात पाणी उपलब्ध झाले. शेतकऱ्यांना सारख्या प्रमाणात नैसर्गिक पद्धतीने पाणी मिळत नसल्यामुळे कोठेही वाटर मीटरचा वापर न करता वहनाच्या नैसर्गिक नियमातील तत्त्व स्वीकारण्यात आले. यासाठी मुख्य वितरण टाकी बांधण्यात आली. पन्नास आऊटलेटच्या माध्यमातून पाच भागात विभाजित करण्यात आली. यासाठी दहा शेतकऱ्यांचा समूह तयार करण्यात आला. पाणी वाहून नेण्यासाठी ११० मि.मी. व्यासाच्या पाईपलाईनचा वापर करण्यात आला. शेतीमध्ये ९० मि.मी. व्यासाच्या भूगर्भातील पाइपलाइनद्वारे समप्रमाणात पाणी उपलब्ध झाले. या योजनेच्या माध्यमातून पहिल्या टप्प्यातील दोन झोनमधील २० हेक्टरचे प्रत्यक्ष सिंचन सुरू झाले आहे.



**आर्वी तालुक्यातील बोथली नटाळा व पिंपळगाव भोसले या दोन गावात सौर ऊर्जेवर आधारित उपसा सिंचन या प्रकल्पाची पाहणी करताना पदाधिकारी.**

## पाणी वापर संस्था

सिंचन व्यवस्थापनाच्या तत्त्वानुसार लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांसाठी पाणी वापर संस्था निर्माण करण्यात येत आहे. यामधून देखभाल व दुरुस्तीचा खर्च करण्यात येईल. त्यामुळे शासनावर अवलंबून न राहता संपूर्ण खर्च पाणी वापर संस्थेच्या माध्यमातूनच होईल. पाण्याच्या सूक्ष्म नियोजनांतर्गत प्रत्येक शेतकरी पाण्याच्या साठवणुकीसाठी शेततळे बांधणार असून शेतात येणारे पाणी साठवून घेण्याची सुविधा सुद्धा उपलब्ध होईल. या शेततळ्यांच्या माध्यमातून आवश्यकतेनुसार ठिबक व तुषार सिंचन पद्धतीने पिकांचे नियोजन होईल. या योजनेमुळे वर्षभर पाणी मिळेल. त्यामुळे कापूस, ज्वारी, सोयाबीन या पारंपरिक पिकांऐवजी बारमाही ओलिताखाली पिके घेणे शक्य झाले. या प्रकल्पासाठी मृद् व जलसंधारण विभागाचे उपविभागीय अधिकारी सुदेश ससाणे तसेच चीनच्या युनॉन रिन्युएबल एनर्जी कंपनीच्या सौर प्रणाली व चीन कॉन्सुलेट यांच्या समन्वयामुळे या प्रकल्पाला मूर्तरूप आले. सौर ऊर्जेवर आधारित उपसा सिंचन प्रकल्प हा पारंपरिक विजेवर अवलंबून न राहता कमी खर्चात जास्तीत–जास्त क्षेत्राला सिंचनाच्या सुविधा उपलब्ध करून देणारा ठरला आहे.

**अनिल गडेकर**
जिल्हा माहिती अधिकारी,
नागपूर

■■

होय, प्रगती करतोय महाराष्ट्र माझा

**पुणे शहरात वस्ती पातळीवरील तरुणतरुणींसाठी स्वतःची करिअरविषयक स्वप्ने प्रत्यक्षात आणण्यासाठी आणि त्यातून उपजीविकेचे साधन मिळवून आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यास मदत करण्याच्या हेतूने जून २०१६ ला लाईटहाऊस हा प्रकल्प सुरू झाला. औंध, येरवडा आणि हडपसर येथे ३ लाइटहाऊस केंद्रे कार्यरत आहेत. लॅपटॉप, व्हिडिओ वॉल यासारख्या तंत्रज्ञानाचा वापर, करिअरची वाट शोधण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष तसेच विद्यार्थी आणि त्याच्या कुटुंबाला महानगरपालिकेच्या विविध योजनांची माहिती करून घेण्याची संधी हे या प्रकल्पाचे वैशिष्ट्य आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला त्याचा आवडता कौशल्य विकास कार्यक्रम येथे विनामूल्य करता येतो.**




**पुणे येथील लाईट हाऊस प्रकल्प**

# करिअरचा 'प्रकाशमार्ग'

आजच्या तरुण पिढीला आपली स्वप्न पूर्ण करण्यासाठी विविध मार्ग उपलब्ध असले तरी नेमक्या कोणत्या मार्गांचा वापर करावयाचा, याबाबत त्यांच्या मनात संभ्रम असतो. ज्यांची आर्थिक परिस्थिती उत्तम असते, ते आपल्या सोयीनुसार स्वतःच्या पायावर उभे राहू शकतात. मात्र, ज्यांची आर्थिक, सामाजिक परिस्थिती अनुकूल नसते, अशा वस्ती पातळीवरील तरुणांसाठी पुणे महानगरपालिका आणि पुणे सिटी कनेक्ट यांच्या संयुक्त विद्यमाने स्मार्टसिटी प्रकल्पांतर्गत 'लाईट हाऊस – कौशल्य विकास आणि रोजगार केंद्र' हा प्रकल्प वरदान ठरत आहे.

होय, प्रगती करतोय महाराष्ट्र माझा

या प्रकल्पाच्या अमृता बहुलेकर म्हणाल्या, 'वयाची १८ वर्षे पूर्ण केलेला विद्यार्थी जेव्हा लाइट हाऊसमध्ये पहिल्यांदा येतो तेव्हा कोणताही कौशल्य विकास कार्यक्रम सुरू करण्यापूर्वी, ८० तासाच्या (अंदाजे २० दिवसांच्या ) फाऊंडेशन कोर्सने या प्रवासाची सुरुवात होते. स्वतःमधील क्षमता, बुद्धिमत्ता आणि कौशल्य एकदा शोधायची संधी यातून मिळते. विविध खेळ आणि सर्जनशील उपक्रमातून संभाषण कौशल्य, नेमकेपणाने आपले मत मांडणे, गटामध्ये सगळ्यांसोबत काम करणे, नेतृत्व

कौशल्य आजमावणे याची संधी मिळते. स्वत:चा शोध घेतानाच काळात कोणत्या प्रकारच्या कामाला जास्त वाव आहे, हे देखील मुले प्रत्यक्ष प्रकल्पामधून शिकतात. कामाच्या ठिकाणी यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेल्या क्षमतांवर फाऊंडेशन कोर्समध्ये काम केले जाते.

### करिअर चाचणी

फाऊंडेशन कोर्स पूर्ण केलेल्या तरुण वर्गाची आवड, क्षमता आणि गुणवत्ता, व्यक्तिमत्त्व याविषयी अधिक माहिती देणारी करिअर चाचणी घेतली जाते. या चाचणीचा निकाल, तरुणाचे मत, आणि भोवतालची परिस्थिती लक्षात घेऊन त्यांचे आणि पालकांचे समुपदेशन केले जाते. विद्यार्थी पूर्ण विचार करून कौशल्य विकास कार्यक्रमाची निवड स्वतः करतात. याबाबत त्यांच्यावर विश्वास ठेऊन, त्यांनी सगळ्या गोष्टी लक्षात घेऊन घेतलेला निर्णय अंतिम असतो.

या केंद्राद्वारे विविध प्रकारचे कौशल्य विकास कार्यक्रम चालू आहेत. उदा. टॅली, कॉम्प्युटर ऑपरेटर, टेलरिंग, ब्युटी आणि हेल्थ, जिम इंस्ट्रक्टर, नर्सिंग सहायक, कुकिंग, ग्राफिक डिझाइन, सॉफ्टवेअर लॅंग्वेजेस इत्यादी संगणक साक्षरतेचे शिक्षणही सर्वांना दिले जात असल्याचे, गणेश नटराजन यांनी सांगितले.

### मदत आणि मार्गदर्शन

लाइट हाऊस प्रकल्प इतर कौशल्य विकास कार्यक्रमांपासून वेगळा आहे कारण, कोणत्याही टप्प्यावर शिक्षण थांबवणारी कोणतीही अडचण आल्यास लाइट हाऊसची

### अभिप्राय



मी लाईट हाऊसमध्ये प्रशिक्षण घेतले. सध्या स्वतःचा मसाला बनवण्याचा व्यवसाय सुरू केला आहे. परदेशातही मसाले पाठवत आहे. आशेचा नवीन किरण सापडला आहे. आता स्वतःचे स्नॅक सेंटरही सुरू करणार आहे. – **वंदना पगार**

'इन्फोसिस' या कंपनीमध्ये काम करत असून, लाईट हाऊसमध्ये येऊन मी माझे संभाषण कौशल्य सुधारले. इंदिरा वसाहत, औंध ते इन्फोसिस हा प्रवास माझ्यासाठी अनेक नव्या शक्यता निर्माण करणारा आहे. वस्तीतील प्रत्येक तरुणाला यापर्यंत आणण्याचा माझा प्रयत्न राहील. **– अल्ताफ सय्यद**

'लाइट हाऊस' ही एक 'सुरक्षित जागा' असून या सगळ्या गोष्टी करताना एक मोकळेपणा येत असतो. आपापसात विश्वास निर्माण होण्यासाठी पूरक वातावरण निर्माण होते. इथे आलेली व्यक्ती, कोणताही भेदभाव न करता, 'माणूस' म्हणून तिच्या भल्या–बुऱ्या गुणांसकट स्वीकारली जाते. योग्य संधी आणि साथ मिळाली तर प्रत्येक व्यक्तीमध्ये यशस्वी होण्याची क्षमता आहे, यावर आमचा विश्वास आहे आणि यावरच हे केंद्र उभारलेले आहे. **– रुची माथूर**

पूर्ण टीम त्या मुलीमागे/मुलांमागे उभी असते आणि निवडलेला कोर्स पूर्ण होईल याची खबरदारी घेतली जाते. कोर्स पूर्ण झाल्यानंतर मुलांना काम शोधण्यासाठी व कामावरचे पहिले ३ महिने पूर्ण होईपर्यंत त्यांना मदत आणि मार्गदर्शन केले जाते. लाइट हाऊसमध्ये एकदा आलेली व्यक्ती या परिवाराचा कायमस्वरूपी सदस्य बनते.

### पुण्यामध्ये चार केंद्रे

पुणे महापालिका क्षेत्रात चालू असलेल्या ४ केंद्रांमध्ये एकत्रितपणे ४ हजारांहून अधिक तरुण वर्ग सहभागी झाला आहे. यापैकी २ हजार ४०० हून अधिक तरुणांनी कौशल्य विकास कार्यक्रम निवडून, ते कौशल्य शिकण्यास सुरुवात केली आहे. उर्वरित विद्यार्थी फाऊंडेशन कोर्सशी निगडित विविध टप्प्यांवर आहेत. ८१६ मुले टेक महिंद्रा, मेट्रोग्लोबल, इन्फोसिस, नासा अशा संस्थांमध्ये कार्यरत आहेत. काही स्वतःचा व्यवसाय यशस्वीपणे चालवत आहेत.

सध्या लाईट हाऊस पुण्यातील ४ ठिकाणी चालू आहे. लाईट हाऊसमध्ये इच्छुकांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा, असे आवाहन नोडल ऑफिसर गणेश सोनुने यांनी केले आहे.

■ लाइट हाऊस – औंध : जुने औंध वॉर्ड ऑफिस, ब्रेमेनचौक, औंध. (संपर्क – अश्विनी – ७२१८१६६६०५). ■ लाइट हाऊस – येरवडा : क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवेई – लर्निंगस्कूल, अण्णाभाऊ साठे सभागृहामागे, गुंजन टॉकीज शेजारी, येरवडा. (संपर्क– श्रुती – ९८३४५५५७३०). ■ लाइट हाऊस – हडपसर: हडपसर पी.एम.टी. बिल्डिंग, तिसरा मजला, हडपसर (संपर्क– विजय –९९७५७८७९४१). ■ लाइट हाऊस – वारजे : तिरुपतीनगर शेजारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, वारजेनाका (संपर्क – विद्या – ९४०३१४८७९२).

**राजेंद्र सरग**

जिल्हा माहिती अधिकारी, पुणे

### सकारात्मक बदलासाठी काम करण्याची संधी

लाइट हाऊसमध्ये आलेल्या तरुण–तरुणींच्या माध्यमातून वस्त्यांचे परिवर्तन होण्यासाठी अथक प्रयत्न चालू आहेत. पुण्यातील प्रत्येक प्रशासकीय वॉर्डमध्ये लाइट हाऊसची स्थापना करून पुण्यातील वस्ती पातळीवरील तरुण पिढीचे आर्थिक, सामाजिक परिवर्तन करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. लाईट हाऊसच्या निमित्ताने सरकारी यंत्रणा, विविध कॉर्पोरेट संस्था, स्वयंसेवी संस्था आणि जागरूक नागरिक या साऱ्यांना एकत्रितपणे सकारात्मक बदलासाठी काम करण्याची संधी निर्माण झाली आहे.

**– सौरभ राव, आयुक्त, पुणे महानगरपालिका**

**आदिवासी विकास विभागाच्या 'अटल आरोग्य वाहिनी' व 'कायापालट अभियान' या दोन योजनांचा शुभारंभ सोहळा विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व आदिवासी विकास मंत्री विष्णू सवरा यांच्या हस्ते २२ नोव्हेंबर रोजी विधान भवन प्रांगणात पार पडला. अटल आरोग्य वाहिनीच्या माध्यमातून दुर्गम भागात आदिवासी विद्यार्थ्यांना आरोग्य सेवा पुरवल्या जाणार आहेत तर कायापालट अभियानाच्या माध्यमातून आश्रमशाळांचा कायापालट केला जाणार आहे.**

# आश्रमशाळांचा कायापालट

आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळा या अतिदुर्गम भागामध्ये आहेत. तेथील मुलांना तातडीची वैद्यकीय सेवा अथवा इतर नियमित आरोग्य सेवा पुरवणे आव्हानात्मक ठरले आहे. वैद्यकीय मदत न मिळाल्यामुळे होणाऱ्या आजारांचे व मृत्यूंचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांकरिता एकात्मिक आरोग्य सेवा पुरवण्याची संकल्पना विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती मनीषा वर्मा यांनी मांडली. या योजनेचा आराखडा बनविण्यात मुख्यमंत्री फेलो डॉ. सफवान पटेल यांचे मोलाचे योगदान राहिले. या उपक्रमात नागरिकांचा सहभाग असावा यासाठी योजनेचे नाव नागरिकांच्या सहभागातून 'महाराष्ट्र मायगव्हर्नमेंट' या उपक्रमाद्वारे निवडण्यात आले आहे.

राज्यातील अतिदुर्गम भागामध्ये असणाऱ्या ३०१ शासकीय आश्रमशाळा व ८ एकलव्य निवासी शाळांमध्ये १ लाख ५ हजार विद्यार्थी शिक्षण घेतात. 'अटल आरोग्य वाहिनी'च्या माध्यमातून या विद्यार्थ्यांकरिता एकात्मिक आरोग्य सुविधा प्राप्त होईल. योजनेंतर्गत ५ ते ६ शाळांचा १ क्लस्टर (समूह) असे ४८ क्लस्टर निर्माण करण्यात आले आहेत. प्रत्येक क्लस्टरमध्ये १ रुग्णवाहिका याप्रमाणे ४८ बेसिक लाइफ सपोर्ट (जीवरक्षक) रुग्णवाहिका व आयुष डॉक्टर उपलब्ध असतील. क्लस्टरमधील मध्यवर्ती शाळेमध्ये रुग्णवाहिकेचे मुख्य ठिकाण ठेवण्यात आले आहे. प्राणवायू यंत्रणा, इ.सी.जी.मशीन, पल्स ऑक्सिमीटर, ग्लुकोमीटर, फिटल डॉपलर, स्कूप स्ट्रेचर व सर्प, विंचू दंशावरील उपाय म्हणून ॲन्टीव्हेनोम, लाइफ सेविंग औषधे यांच्यासह विविध वैद्यकीय उपकरणांनी सज्ज रुग्णवाहिका २४ x ७ सेवा पुरवण्यास उपलब्ध असेल.



**अटल आरोग्य वाहिनीच्या शुभारंभप्रसंगी विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आदिवासी विकास मंत्री विष्णू सवरा.**

## सोय आणि सुविधा

आश्रम शाळांमध्ये दुर्घटना घडल्यास १०८ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधून रुग्णवाहिका बोलवता येईल. रुग्णवाहिकांशी समन्वय साधाण्यासाठी इमर्जेन्सी रिस्पॉन्स सेंटर (इआरसी) स्थापन करण्यात आले आहे. तेथून जी.पी.एस.ने रुग्णवाहिका कोठे आहे, हे तपासून संबंधित ठिकाणी जाण्याच्या सूचना देण्यात येतील. तातडीच्या वेळी इआरसी, विद्यार्थ्याला रुग्णवाहिका पुरवण्यापासून ते रुग्णालयात त्यावर होणारे उपचार इत्यादी बाबींवर लक्ष ठेवेल. ज्या वेळी काही कारणास्तव रुग्णवाहिका उपलब्ध नसेल किंवा एकापेक्षा जास्त दुर्घटना घडतील तेव्हा जवळील अतिरिक्त १०८ रुग्णवाहिका उपलब्ध करण्याची सोय करण्यात आली आहे. या योजनेमध्ये तातडीची वैद्यकीय सेवा पुरवण्याबरोबरच इतर महत्त्वपूर्ण बाबींचा समावेश करण्यात आला आहे. आयुष डॉक्टर व रुग्णवाहिका नियमित शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांची सखोल आरोग्य तपासणी करतील. प्रत्येक विद्यार्थ्याच्या आरोग्य विषयक बाबींची माहिती डिजिटल हेल्थ कार्डच्या माध्यमातून जतन केली जाईल. आपत्कालीन घटना, आरोग्य तपासणीचे वेळापत्रक, दुर्धर आजाराने पीडित विद्यार्थ्यांच्या उपचाराची प्रगती इत्यादी बाबी डॅशबोर्डवर प्रकल्प कार्यालयापासून मंत्रालय स्तरापर्यंत उपलब्ध असतील. यामुळेच ठरावीक भागात एखाद्या आजाराचे प्रमाण जास्त आढळून आल्यास त्यावर वरिष्ठ पातळीवरून त्वरित उपाययोजना करण्यात येतील. नियमित आरोग्य तपासणी व आजारी

विद्यार्थ्यांवर उपचार योग्य प्रकारे होण्याकरिता शाळांमध्ये सुसज्ज डिस्पेन्सरी उभारण्यात आल्या आहेत. यामध्ये वैद्यकीय तपासणीकरिता आवश्यक असणारी साधने उपलब्ध असतील. आवश्यक व पुरेशा औषधसाठ्यांसह शाळेमध्येच आयुष डॉक्टर विद्यार्थ्यांवर उपचार करतील. रोगनिदनासंदर्भाने या डॉक्टरांना काही अडचण असल्यास इआरसीच्या माध्यमातून तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन उपलब्ध करण्यात येईल. जसे की, एम.डी मेडिसिन, बालरोग तज्ज्ञ, कान-नाक-घसा तज्ज्ञ, त्वचा रोगतज्ज्ञ, दंत रोगतज्ज्ञ इत्यादी. यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये विद्यार्थ्यांच्या फेऱ्या कमी होऊन त्यांना अभ्यासाला अधिक वेळ मिळेल. पर्यायाने शिक्षकांनाही अध्यापनाचे कार्य व्यवस्थित करता येईल.

एकात्मिक आरोग्य सेवा परिणामकारकरीत्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावी याकरिता शाळा आरोग्य समितीची स्थापन करण्यात आली आहे. यामध्ये मुख्याध्यापक, वैद्यकीय अधिकारी, शिक्षक, अधीक्षक-अधिक्षिका, एन.एम विद्यार्थी व पालक यांचा समावेश आहे. या समितीद्वारे आरोग्य शिक्षण विद्यार्थ्यांच्या आचरणात उतरवणे, आरोग्यविषयक जनजागृतीचे कार्यक्रम राबवणे जसे, प्रभात फेरी, प्रश्नमंजुषा, चित्रकला, वादविवाद स्पर्धा, व्याख्याने इत्यादी बाबींमध्ये पुढाकार घेतला जाईल. उपचारांसोबतच आजार होऊ नयेत म्हणून प्रतिबंधात्मक उपायदेखील अवलंबण्यात येतील. उन्हाळी सुट्ट्यांच्या कालावधीमध्ये नेमून दिलेल्या गाव-पाड्यांमध्ये डॉक्टर जाऊन तेथील सरपंच व ग्रामसेवकाच्या मदतीने मोफत आरोग्य शिबिरांचे आयोजन करतील. आयुष डॉक्टर नजीकच्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या संपर्कात असल्याने शाळेमध्ये साथीच्या रोगांचे व्यवस्थापन सोपे जाईल.

**डॉ. मयूर मुंढे,**
मुख्यमंत्री फेलो, आदिवासी विकास विभाग

## कायापालट अभियान

आदिवासी आश्रमशाळांमध्ये विद्यार्थी त्यांचा बालवयातील १२ वर्षांचा कालावधी व्यतीत करतात. शाळेतील शिक्षण, पोषण व सामाजिक भान जपणारे वातावरण विद्यार्थ्यांच्या प्रगतीत नेहमीच मोलाचे काम करते. या विद्यार्थ्यांचे बालपण जपण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाने उचलेले महत्त्वपूर्ण पाऊल म्हणजे 'कायापालट अभियान'. २०१७ च्या उन्हाळ्यामध्ये या अभियानाचा एक टप्पा पार पडला. यामध्ये आश्रमशाळांचे मूल्यमापन केले गेले व आवश्यक पावले उचलली गेली. यामुळे मूलभूत सुविधांचा दर्जा सुधारण्यास मदत झाली. यामुळे आय.एस.ओ प्रमाणित आश्रमशाळांची संख्या ५ हून १०२ पर्यंत पोहोचली. मूलभूत सुविधांचा दर्जा सुधारण्याबरोबरच विद्यार्थ्यांना इतर भौतिक सुविधा पोहोचवणे आवश्यक आहे. ही गरज ओळखून 'कायापालट अभियानाचे' मोहिमेत रूपांतर केले गेले.

या माध्यमातून शाळा, शिक्षक व विद्यार्थी यांना पुरवण्यात येणाऱ्या सुविधांचे मूल्यमापन करणे व त्यांची उपलब्धता करण्यासाठी उपाययोजना करणे. या अभियानांतर्गत मंत्रालय ते प्रकल्प कार्यालय व विभागाच्या अधीनस्थ संस्था यांमधील ४०० अधिकारी व कर्मचाऱ्यांची १२५ पथके तयार करण्यात आली आहेत. ही पथके डिसेंबर २०१८ ते फेब्रुवारी २०१९ या ३ महिन्यांच्या कालावधीत राज्यातील ५०२ शासकीय आश्रमशाळा, १४ एकलव्य निवासी शाळा व ४९१ शासकीय वसतिगृहे यांना ३ टप्प्यांत भेटी देतील. या भेटीदरम्यान आश्रमशाळा व वसतिगृह यांच्या सद्य:स्थितीचे मूल्यमापन केले जाईल. दुरुस्ती करून वापरात आणता येण्यासारख्या सुविधा, त्यांचे आधुनिकीकरण आणि नवीन सुविधा निर्माण करणे, अशा तीन प्रकारे बाबी अभियानांतर्गत हाताळल्या जातील.

२६ नोव्हेंबर पासूनच्या पहिल्या भेटीत हे पथक एका शाळेमध्ये व वसतिगृहामध्ये पूर्ण दिवस थांबेल. पथकातील सदस्य शाळेतील परिस्थितीचे निरीक्षण करतील व नोंदी घेतील. विद्यार्थ्यांकरिता शाळेत उपलब्ध असणारे शैक्षणिक वातावरण, वर्ग खोल्या, फर्निचर, संगणक कक्ष, ग्रंथालय, प्रयोगशाळा, खेळांचे व इतर साहित्य, व्यायाम शाळा, स्वच्छतागृहे व मुला-मुलींचे वसतिगृह येथील भौतिक सुविधा जसे गाद्या-खाटांची स्थिती, अन्य फर्निचर, शौचालये, स्नानगृहे, हात धुण्याच्या जागा तसेच स्वयंपाकगृहातील स्वच्छता, भांडी, अन्न धान्याची कोठारे यांचे सद्य:परिस्थितीनुसार मूल्यमापन करतील. यांसह विद्युतीकरण, शाळेचा पाणीपुरवठा, शाळा व आसपास परिसरातील धोकादायक बाबी यांचा अभ्यास करतील. तदनंतर नोंद केलेल्या बाबींचे वर्गीकरण करण्यात येईल. विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी व पालक यांच्याशी आश्रमशाळेतील सद्य:स्थिती व करावयाच्या आवश्यक उपाययोजनांबद्दल चर्चा केली जाईल. शाळेचा कायापालट करण्याच्या दृष्टीने एक आराखडा बनविला जाईल. शाळा व्यवस्थापन समितीमार्फत स्थानिक पातळीवर निर्णय घेतले जातील. समितीच्या सभेमध्ये करावयाच्या कामांचा ठराव मांडून कामांना तातडीने सुरुवात करण्यात येईल. धोरणे आखणे व अंमलबजावणी करणे यांचे विकेंद्रीकरण केल्यामुळे सुधारणा लवकर प्रत्यक्षात येतील. दरम्यान आवश्यक बाबींचे प्रस्ताव वरिष्ठ पातळीवर पाठवण्यात येतील.

पथकाच्या दुसऱ्या भेटीदरम्यान शाळा व वसतिगृह स्तरावर होणाऱ्या कामाचे परीक्षण करून सुधारणा सुचवल्या जातील. 'जीइएम पोर्टल'वर होणारी खरेदी प्रक्रिया पूर्ण केली जाईल. वरिष्ठ पातळीवर असणाऱ्या प्रस्तावांना गती दिली जाईल. फेब्रुवारी २०१९ मध्ये तिसऱ्या व अंतिम भेटीदरम्यान झालेल्या कामांची पाहणी व दर्जा तपासला जाईल. अशा प्रकारे सर्व सोयीसुविधाप्राप्त शाळांचा व वसतिगृहांचा कायापालट सर्वांच्याच प्रयत्नातून साकार होईल.

**२०१८ च्या खरीप हंगामात १५१ तालुक्यांमध्ये तसेच २६८ महसुली मंडळांमध्ये दुष्काळ असल्याचे शासनाने जाहीर केले. या परिस्थितीवर उपाययोजना म्हणून या तालुक्यांमध्ये आठ विविध सवलती लागू करण्यात आल्या आहेत. संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना या उपाययोजना राबवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.**

# उपाय आणि दिलासा

२०१८ च्या खरीप हंगामामध्ये राज्यातील सर्व तालुक्यांचे महामदत संगणक प्रणालीद्वारे दुष्काळी परिस्थितीचे मूल्यांकन करण्यात आले. या मूल्यांकनानुसार राज्यातील २०१ तालुक्यांमध्ये 'ट्रिगर वन' लागू झाले होते. या तालुक्यांचे प्रभावदर्शक निर्देशांकांचे मूल्यांकन करून 'ट्रिगर टू'मध्ये समाविष्ट झालेल्या १८० तालुके जाहीर करण्यात आले. या तालुक्यांमधील रँडम पद्धतीने १० टक्के गावांमध्ये प्रत्यक्ष पाहणी करून अहवाल पाठवण्याच्या सूचना सर्व विभागीय आयुक्त, कृषी आयुक्त व संबंधित जिल्हाधिकारी यांना देण्यात आल्या.

## सूट आणि सवलती

**दुष्काळसदृश** परिस्थिती जाहीर झालेल्या तालुक्यांमध्ये जमीन महसुलातून सूट, सहकारी कर्जाचे पुनर्गठन, शेती निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती, कृषी पंपाच्या चालू बिलामध्ये ३३.५ टक्के सूट, शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी, रोहयोंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता, आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरवण्यासाठी टँकरचा वापर व टंचाई जाहीर केलेल्या गावांमध्ये शेतकऱ्यांच्या शेती पंपाची वीज जोडणी खंडित न करणे आदी उपाययोजना जाहीर केल्या आहेत.

## दुष्काळ व्यवस्थापन संहिता

**दुष्काळ** व्यवस्थापन संहिता २०१६ नुसार खरीप हंगामात दुष्काळ घोषित करण्याची अंतिम तारीख केंद्र शासनाच्या दिनांक २९ मे २०१८ च्या पत्रान्वये सुधारित करून ३१ ऑक्टोबर निश्चित केली आहे. त्यामुळे राज्य शासनाने दुष्काळ व्यवस्थापन संहितेनुसार विहित मुदतीत दुष्काळ घोषित करण्याची कार्यवाही केली.

शासन निर्णय ३१ ऑक्टोबर २०१८ अन्वये राज्यात खरीप २०१८ हंगामात १५१ तालुक्यात मध्यम / गंभीर दुष्काळ घोषित करण्यात आला. तर राज्यातील दुष्काळ घोषित केलेल्या १५१ तालुक्यांव्यतिरिक्त इतर तालुक्यांतील २६८ महसुली मंडळामध्ये शासन निर्णय ६ नोव्हेंबर २०१८ अन्वये दुष्काळ घोषित करून सवलती लागू करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ नुसार खरीप हंगामात दुष्काळ घोषित करण्याची अंतिम तारीख केंद्र शासनाच्या दिनांक २९ मे २०१८ च्या पत्रान्वये सुधारित करून ३१ ऑक्टोबर निश्चित केली आहे. त्यामुळे शासनाने विहित मुदतीत दुष्काळ घोषित करण्याची कार्यवाही केली आहे. सर्व शास्त्रीय निर्देशांकानुसार मूल्यांकन करूनच दुष्काळ घोषित करण्यात आला आहे.

## शेतरस्ते बांधकामासाठी ५१ कोटी

**शेत** रस्त्यांच्या कामासाठी मनरेगासह इतर विविध योजनांचा निधी उपलब्ध करून घेण्यात येईल. मनरेगातील कुशल-अकुशल निधी आणि इतर योजनांचा निधी यामधून पक्क्या शेतरस्त्यांची निर्मिती करण्यात येईल. चौदावा वित्त आयोग, आमदार निधी, खासदार निधी, गौण खनिज विकास निधी, ग्रामपंचायतींना जनसुविधांसाठी मिळणारे अनुदान, जिल्हा योजना, महसुली अनुदान, पेसा अंतर्गत उपलब्ध होणारा निधी इत्यादी विविध योजनांचे मनरेगासह अभिसरण करून शेत रस्ते तयार करण्यात येतील.

ही योजना राबवण्यासाठी पहिल्या टप्प्यात प्रत्येकी दीड कोटी रुपयांप्रमाणे ३४ जिल्ह्यांना ५१ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. यासंदर्भातील शासन निर्णय १२ ऑक्टोबर रोजी जारी करण्यात आला. शेतरस्ते तयार करण्यासाठी विशेष बाब म्हणून गौणखनिज स्वामित्व शुल्कामध्ये सूट देण्यात येत आहे. मोजणीसाठी कोणतेही शुल्क आकारण्यात



शेतरस्ता

येणार नाही. तसेच तहसीलदारांनी आदेश दिल्यानंतर मोजणी करणे, रस्त्यावरील अतिक्रमण काढणे, रस्ता बांधकाम यासाठी देण्यात येणाऱ्या पोलीस बंदोबस्ताकरिता कोणतेही शुल्क आकारण्यात येणार नाही.

गावकऱ्यांची मागणी आल्यास 'गाव तेथे तलाव' ही योजना राबवण्यात येईल. मनरेगामधून ही योजना राबवण्यात येईल.

## मनरेगासह विविध योजनांचा सहभाग

**दुष्काळी** परिस्थितीवर मात करण्यासाठी राज्यात मनरेगा योजनेतून मागणीनुसार 'गाव तेथे तलाव' ही योजना राबवण्यात येणार आहे. शेतीसाठी आवश्यक सामानाची वाहतूक करणे सुलभ होण्याच्या दृष्टीने मनरेगा आणि शासनाच्या इतर योजनांच्या एकत्रित सहभागातून शेतरस्ते तथा पाणंदरस्ते तयार करण्यात येणार आहेत.

रोहयो विभागाने रोजगार निर्मितीचे संपूर्ण नियोजन केले आहे. या योजनेतून सध्या राज्यात ३५ हजार ७४० कामे सुरू असून त्यावर १ लाख ५४ हजार १३८ इतके मजूर काम करीत आहेत. योजनेसाठी सध्या भरीव निधी उपलब्ध असून मागणीप्रमाणे सर्वांना रोजगार उपलब्ध करून देण्यात येईल.

## नवीन २८ कामांचा समावेश

**मनरेगामधून** आता शाळेसाठी संरक्षक भिंत तसेच साखळी कुपण बांधणे, खेळाच्या मैदानासाठी संरक्षक भिंत, साखळी कुंपण, छतासह बाजारओटा, शालेय स्वयंपाकगृहासाठी निवारा, नाला-मोरीचे बांधकाम, सार्वजनिक जागेवरील गोदाम, सिमेंट रस्ता, पेव्हिंग ब्लॉक रस्ता, डांबर रस्ता, अंगणवाडी बांधकाम, ग्रामपंचायत भवन, बचतगटांच्या जनावरांसाठी सामूहिक गोठे, स्मशानभूमी शेड बांधकाम, नाडेप कंपोस्ट, सामूहिक मत्स्यतळे, सार्वजनिक जागेवरील शेततळे, काँक्रिट नाला बांधकाम, पीव्हीसी पाईप निचरा प्रणाली, भूमिगत बंधारा, सिमेंट नाला बांध, कॉम्पोझिट गॅबियन बंधारा ही २८ नवीन कामे करण्यात येतील. मनरेगामधून या योजनांसाठी प्रामुख्याने मजुरांचा पुरवठा तसेच कुशल योजनेचा निधी देण्यात येईल.

## टंचाई नियंत्रण कक्ष

**राज्यातील** काही जिल्ह्यात या वर्षी तीव्र पाणी टंचाई भासण्याची शक्यता आहे. जनतेकडून येणाऱ्या पाणी टंचाईच्या तक्रारीची तत्परतेने नोंद घेऊन उपाययोजना करण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयात टंचाई नियंत्रण व समन्वयासाठी एक स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात येत आहे.

काही जिल्ह्यात या वर्षी तीव्र पाणी टंचाई भासण्याची शक्यता आहे. सोलापूर जिल्ह्यात ५० टक्क्यांपेक्षा कमी पर्जन्यमान झाले आहे. १६ जिल्ह्यांत ५० ते ७५ टक्के पर्जन्यमान झाले असून १६ जिल्ह्यांत ७५ ते १०० टक्के पर्जन्यमान झाले. केवळ सातारा जिल्ह्यात १०० टक्क्यांपेक्षा जास्त पर्जन्यमान झाले. काही जिल्ह्यात टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येत आहे. ४८९ टँकर्सद्वारे पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली आहे.

पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ ग्रामीण/नागरी क्षेत्रात घ्यावयाच्या उपाययोजनांकरिता वेळोवेळी स्थायी आदेशाद्वारे संबंधित यंत्रणांना सविस्तर

## परिवहन महामंडळाचा दिलासा

**राज्यात** निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर एसटी महामंडळाने ग्रामीण भागातील शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मोठा दिलासा आहे. दुष्काळसदृश म्हणून नुकत्याच जाहीर केलेल्या तालुक्यातील विद्यार्थ्यांना उर्वरित शैक्षणिक वर्षासाठी मोफत प्रवास सवलत पास देण्यात येईल.

शालेय, महाविद्यालयीन आणि व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या मासिक पाससाठी सध्या ६६.६७ टक्के इतकी सवलत देण्यात येते. आता शासनाने दुष्काळसदृश म्हणून जाहीर केलेल्या तालुक्यातील विद्यार्थ्यांना उर्वरित शैक्षणिक वर्षासाठी सवलत १०० टक्के इतकी देण्यात येईल. ही संपूर्ण सवलत एसटी महामंडळामार्फत देण्यात येईल. त्यासाठी महामंडळावर साधारण ८५ कोटी रुपयांचा अतिरिक्त बोजा पडेल. राज्यातील साधारण ३५ लाख विद्यार्थ्यांना या सवलत योजनेचा लाभ मिळेल.

पावसाअभावी शेतकरी अडचणीत आहे. ग्रामीण भागातील इतर लोकही दुष्काळसदृश परिस्थितीमुळे अडचणीत आहेत. त्यांना या अडचणीच्या काळात त्यांना मदत करणे हे एसटीचेही कर्तव्य असल्याचे मानून त्यांच्या शाळा, महाविद्यालयात शिकणाऱ्या मुलांना दिलासा देण्याचा निर्णय महामंडळाने घेतला आहे. त्यानुसार उर्वरित शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थी मासिक पाससाठी १०० टक्के सवलत देण्यात येईल.



सूचना दिल्या आहेत. पाणीटंचाई निवारणार्थ उपाययोजना प्रस्तावित करताना त्या खरोखरच गरजेप्रमाणे आवश्यक आहेत काय याची खात्री करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत घेण्यात येणारी उपाययोजना मंजूर करताना ती किमान खर्चाची असल्याची दक्षता घेण्यात येईल. संभाव्य पिण्याच्या पाण्याच्या टंचाईचे निवारण करण्याच्या दृष्टीने विकास कार्यक्रम व पाणी पुरवठ्याच्या इतर योजनांतर्गत तरतुदींचाही पुरेपूर वापर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ज्या नळ योजनांची पूर्वीच हाती घेतलेली कामे प्रगतिपथावर असतील व ती पूर्ण झाल्यास, चालू वर्षाच्या उन्हाळ्यात ग्रामस्थांना त्याचा लाभ मिळणार असेल तर अशा योजनांच्या कामांना प्राधान्य देण्यात येईल. या योजनांतर्गत निधीचा पुरेपूर वापर करून




गावातील पिण्याच्या पाण्याच्या अस्तित्वात असलेल्या योजना नादुरुस्त झाल्या असतील तर त्या लवकरात लवकर दुरुस्त केल्या जातील. ग्रामस्थांस या योजनांपासून किमान पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होईल अशी दक्षता संबंधित यंत्रणा घेत आहे. यामुळे टंचाई निवारण कार्यक्रमाखाली आणखी अन्य तत्कालीन उपाययोजना करून ग्रामस्थांना पाणीपुरवठा करण्याची आवश्यकता भासणार नाही.

संभाव्य टंचाईग्रस्त गावांना नवीन विंधन विहिरी घेण्याचा पर्याय किफायतशीर ठरणार असेल तर तेथे पाणी टंचाई सुरू होण्यापूर्वी नवीन विंधन विहिरी घेता येतील. केवळ पाणी टंचाई कार्यक्रमांतर्गत विंधन विहिरी न घेता आमदारांच्या स्थानिक त्या त्वरित पूर्ण करण्यात येतील.

टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत तात्पुरत्या पूरक नळयोजना किमान खर्चाच्या असतील. या योजनांची अंदाजपत्रके व आराखडे मोका पाहणीवर आधारित व प्रत्यक्ष भूस्तर तपासणी करून वस्तुनिष्ठपणे तयार केले जातील. पूर्वीच्या योजनेच्या साधनसामग्रीचा योग्य तो वापर करण्यात येईल.

नळ योजनांच्या विशेष दुरुस्तीचे प्रस्ताव हे टंचाई निवारणार्थ इतर उपाययोजना घेण्यापेक्षा व्यवहार्य ठरत असतील तरच जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त हे त्यांना असलेल्या वित्तीय अधिकारात मंजूर करतील. विहिरीची खोली आवश्यकतेपेक्षा कमी असल्यास स्रोताची क्षमता कमी होते म्हणून बऱ्याच वेळा नवीन स्रोत निर्माण करून द्यावा लागतो. नवीन स्रोत निर्माण करण्यापेक्षा उपलब्ध स्रोत पूर्णत: विकसित करणे आर्थिकदृष्ट्या किफायतशीर होईल. याबाबी विचारात घेऊन विहिरी खोल करणे कार्यक्रम प्राधान्याने राबवण्यात येईल.

पिण्याच्या पाण्याचे टँकर मंजुरीचे प्रस्ताव तहसीलदार, उपविभागीय कार्यालय व जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर चार दिवसांपेक्षा जास्त काळ प्रलंबित ठेवले जाणार नाहीत. या प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांनी तत्काळ निर्णय घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

## मनरेगा योजनेचा आराखडा

**दुष्काळाच्या** पार्श्वभूमीवर ग्रामीण भागात अधिकाधिक रोजगार निर्मिती व्हावी, यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत (मनरेगा) राज्य अभिसरण आराखडा अंमलबजावणी करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. यानुसार मनरेगा योजनेसोबत शासनाच्या इतर योजनांचा सहभाग घेऊन ग्रामीण भागात रोजगार निर्मितीसह मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधांची निर्मिती केली जाईल. या संदर्भातील अंमलबजावणी तत्काळ करण्यासंबंधीचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

यापुढे विविध विभागांच्या योजनांचे अभिसरण मनरेगा योजनेशी करण्याचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. प्रत्येक आर्थिक वर्षात १५ ऑगस्ट ते ३० नोव्हेंबर दरम्यान ग्रामसभेच्या मान्यतेने मनरेगाअंतर्गत मजूर अर्थसंकल्प व वार्षिक कृती आराखडा तयार केला जातो. मनरेगाअंतर्गत २६० कामे करता येतात. या कामांपैकी २८ कामांचे विविध विभागांच्या योजनांसोबत अभिसरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या कामांसोबतच सामाजिक संस्था आणि सामाजिक दायित्व यांचा सहभाग घेऊनही कामे केली जातील. ग्रामीण भागासाठीच ही कामे केली जातील.

यंत्रसामग्रीचा वापर न करता ही कामे करावयाची असून यातून अधिकाधिक ग्रामीण कुशल, अकुशल मजुरांना रोजगार दिला जाईल.

२०१८-१९ या आर्थिक वर्षातही ही कामे करण्याची अनुमती देण्यात आली आहे. त्यासाठीचे अंदाजपत्रकही तयार करण्यात आले आहे.

### समन्वय समिती

योजनेच्या अंमलबजावणीसाठी विविध पातळीवर अभिसरण अंमलबजावणी समिती स्थापन केल्या जाणार आहेत. राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय अभिसरण समिती असेल. त्यात वित्त, नियोजन, कृषी, आदिवासी, जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम, ग्रामविकास, वने, सामाजिक न्याय, महिला बालकल्याण, वस्त्रोद्योग, मृद् जलसंधारण, पशुसंवर्धन, दुग्ध, मत्स्यव्यवसाय, रोहयो आदी १५ खात्यांचे सचिव सदस्य असतील. या व्यतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्या नेतृत्वखाली जिल्हास्तरीय आणि तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय अभिसरण समिती कार्यरत असणार आहे.

हा शासन निर्णय www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०१८११०५१४४४३६५७१६ हा आहे.

### जनकल्याण योजनेतून ८ लाख कामे

**मनरेगांतर्गत** ११ कलमी 'समृद्ध महाराष्ट्र जनकल्याण योजना' सुरू करण्यात आली आहे. गेल्या ४ वर्षात ग्रामीण भागात या योजनेंतर्गत ८ लाख १३ हजार १२३ कामे केली गेली असून ज्यातून कोट्यवधींची रोजगार निर्मिती झाली आहे.

या योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागात अहिल्यादेवी सिंचन विहीर योजनेंतर्गत आतापर्यंत १ लाख ३० हजार ८९८ विहिरी बांधण्यात आल्या. ९७ हजार २०१ शेततळी झाले असून ज्यातून लाखो हेक्टर जमीन ओलिताखाली आली आहे. महात्मा गांधी नरेगा योजनेच्या माध्यमातून आतापर्यंत २३ हजार ८९७ पाणंदरस्ते बांधले गेले. अंकुर रोपवाटिका योजनेतून २० कोटी ७५ लाख रोपनिर्मिती करण्यात आली आहे.

'अभिसरणातून विकासाकडे' हे ब्रीद खऱ्या अर्थाने सार्थक झाल्याने महाराष्ट्र रोहयो विभागाच्या या कार्याची दखल राष्ट्रीय स्तरावरील ४ पुरस्कार देऊन घेतली गेली आहे.

**टीम लोकराज्य**

## आयएनएस विराट युद्ध नौकेचे होणार वस्तुसंग्रहालय



**गौरवशाली** इतिहास असणारी आयएनएस विराट युद्धनौकेचे वस्तुसंग्रहालयात रुपांतर करण्याच्या प्रस्तावास राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. प्राथमिक अंदाजानुसार ८५२ कोटी खर्चाचा हा प्रकल्प सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्त्वावर राबवण्यात येणार आहे.

आयएनएस विराट युद्ध नौकेला देशाच्या लष्करी इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे. मार्च २०१७ मध्ये ती भारतीय नौसेनेच्या सेवेतून निवृत्त झाली. सध्या ती नौसेना गोदीमध्ये (नेव्हल डॉकयार्ड) ठेवण्यात आली आहे. भारतीय नौसेनेचा समृद्ध इतिहास नव्या पिढीला माहिती व्हावा, तसेच शालेय-महाविद्यालयीन तरुणांमध्ये सागरी क्षेत्रामध्ये आवड निर्माण व्हावी, यासाठी तिचे वस्तुसंग्रहालयात रुपांतर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय संरक्षण मंत्रालयास सादर केलेल्या प्राथमिक प्रस्तावानुसार ही नौका सिंधुदुर्ग जिल्ह्यातील निवती रॉक्स येथे किनाऱ्यापासून सात सागरी मैल अंतरावरील समुद्रात काँक्रीट पायाभरणी करून स्थापित करण्यात येईल. या ठिकाणी असणारे वैविध्यपूर्ण सागरी जैवविश्व पर्यटकांना पाहता येणार आहे. तसेच सेलिंग, स्काय डायव्हींग आदी साहसी सागरी खेळांसाठी तिचा वापर होऊ शकणार आहे. सागरी प्रशिक्षणासाठीही जहाजावर सुविधा उपलब्ध होणार असून या ठिकाणी व्यापारी जहाजावर काम करणाऱ्या व्यक्तींसाठी प्रशिक्षण देण्याचाही प्रस्ताव आहे. या नौकेवरील वस्तुसंग्रहालयात सागरी क्षेत्राशी संबंधित वस्तू, दृकश्राव्य कार्यक्रम, सागरी क्षेत्राचा इतिहास प्रदर्शित करणारे आभासी दालन इत्यादी सुविधा असतील. तसेच येथे भेट देणाऱ्या पर्यटकांसाठी विविध सुविधा उपलब्ध केल्या जाणार आहेत.

### उज्वला - महाराष्ट्र अग्रेसर

प्रधानमंत्री उज्वला योजनेअंतर्गत देशात ५ कोटीहून अधिक गॅस कनेक्शन्स देण्यात आली आहेत. या योजनेंतर्गत महाराष्ट्रात ऑगस्ट २०१८ अखेर २९ लाखाहून अधिक गॅस कनेक्शन्स देण्यात आले आहेत.

देशातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील महिलांना गॅस जोडणी देण्याऱ्या प्रधानमंत्री उज्वला योजनेचा शुभारंभ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी १ मे २०१६ रोजी केला होता.

## नोंदी

### विद्यार्थ्यांना सुविधा

राज्यातील दुर्गम व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाची दारे खुली करण्यासाठी शासनाने ३३ प्राथमिक आश्रमशाळांना आठवी ते १० वी तर २६ माध्यमिक शाळांना उच्च माध्यमिक वर्ग सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.



या शाळांची माध्यमिक व उच्च माध्यमिक अशी श्रेणीवाढ करण्यासाठी २६.०३ कोटी इतका अतिरिक्त खर्च येणार आहे. या निर्णयानुसार ठाणे, पालघर, यवतमाळ, अमरावती, अकोला, नंदुरबार, अहमदनगर, नाशिक व गडचिरोली या जिल्ह्यातील दुर्गम व आदिवासी भागांमध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी २७ शासकीय व सहा अनुदानित प्राथमिक आश्रमशाळांमध्ये आठवी ते १० वीचे वर्ग सुरू करण्यात येणार आहेत. यामुळे या भागातील ४९५० विद्यार्थ्यांना माध्यमिक शिक्षणाची सोय उपलब्ध होणार आहे. तसेच १५ शासकीय व ११ अनुदानित माध्यमिक आश्रमशाळांमध्ये ११ वी व १२ वीचे कला व विज्ञान शाखेचे वर्ग सुरू करण्यात येणार आहेत. यामुळे या भागातील ५२०० विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक शिक्षणाची सोय उपलब्ध होईल.

### महाराष्ट्रात 'खेलो इंडिया' योजना

केंद्र शासनाने सुरू केलेली 'खेलो इंडिया'–क्रीडा विकासाचा राष्ट्रीय कार्यक्रम, या योजनेची, २०१८–१९ या वर्षापासून राज्यात अंमलबजावणी करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या योजनेमुळे राज्याच्या क्रीडा विकासासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांना मोठ्या प्रमाणात गती मिळेल.

या योजनेंतर्गत विविध उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत. त्यामध्ये खेळाच्या मैदानांचा (क्रीडांगण) विकास, सामूहिक (क्रीडा शिक्षकांचे) प्रशिक्षण कार्यक्रम, राज्यस्तर खेलो इंडिया केंद्राची स्थापना, खेळाच्या वार्षिक स्पर्धा, प्रतिभावंत खेळाडूंचा शोध आणि विकास (शिष्यवृत्ती), खेळाच्या पायाभूत सुविधांचा वापर आणि निर्मिती–सुधारणा, क्रीडा अकादमीसाठी साहाय्य, ग्रामीण आणि देशी खेळांच्या प्रोत्साहन स्पर्धा, शाळेतील मुलांची शारीरिक तंदुरुस्ती (तपासणी व मापदंड), महिलांसाठी खेळ–स्पर्धा, दिव्यांगांना खेळाच्या सुविधा व स्पर्धा यांचा समावेश आहे. यापैकी काही बाबींसाठी यापूर्वीच राज्यस्तरीय योजना अस्तित्वात असली तरी त्यासाठीची आर्थिक तरतूद पुरेशी पडत नाही. केंद्राच्या या नवीन योजनेमुळे त्या बाबींसाठी अतिरिक्त किंवा पूरक निधी उपलब्ध होणार असल्याने जास्तीत जास्त ठिकाणी आणि अधिक उच्च दर्जाच्या क्रीडा सुविधा निर्माण करता येतील. उच्च दर्जाचे आणि अधिक प्रमाणात प्रशिक्षक तयार होणार असल्याने त्याचा ज्येष्ठ खेळाडूंना अधिक लाभ होईल. खेळाडूंना मिळणाऱ्या शिष्यवृत्तीतही वाढ करणे शक्य होईल.

### पंजाबमध्ये 'महाफार्म' ब्रँन्ड

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाच्या




**चंदीगड येथील विक्री केंद्रांवर आणि लुधियाना येथे 'महाफार्म'चा शुभारंभ सहकार मंत्री सुभाष देशमुख यांच्या उपस्थितीत करण्यात आला.**

(एमसीडीसी) माध्यमातून राज्यातील सहकारी संस्थांचे सक्षमीकरण करण्यात येत आहे. सहकारी संस्थांनी तयार केलेल्या उत्पादनाचे ब्रँन्डिग, पॅकेजिंग आणि मार्केटिंग करण्यासाठी महाराष्ट्राने 'महाफार्म' ब्रँन्ड तयार केला आहे. या'महाफार्म' ब्रँडचा शुभारंभ पंजाबमध्ये करण्यात आला.

राज्यातील सहकारी पणन व्यवस्था बळकट करण्यासाठी महाराष्ट्र शासन अटल महापणन विकास अभियान राबवत आहे. २५ जुलै २०१८ रोजी महाराष्ट्र पणन महासंघाचे (महामार्कफेड) आणि पंजाब मार्केटिंग फेडरेशन (मार्कफेड), विदर्भ पणन महासंघ आणि पंजाब मार्कफेड तसेच महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ (एमसीडीसी) आणि पंजाब मार्कफेड यांच्यात सामंजस्य करार करण्यात आले होते. त्याचा पुढचा टप्पा म्हणून 'महाफार्म' ब्रँन्डचा शुभारंभ पंजाबमध्ये करण्यात आला. यामध्ये महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्यांची वैशिष्ट्ये असलेली सेंद्रिय गूळ, हळद पावडर, काजू, काळा मसाला या उत्पादनाचा समावेश आहे.

पंजाब आणि महाराष्ट्र राज्यातील कृषीमाल तसेच कृषी प्रक्रियायुक्त पदार्थांच्या विक्रीची व्यवस्था निर्माण केल्यास दोन्ही राज्यांमधील शेतकऱ्यांच्या शेतमालाला चांगला दर मिळू शकेल. पंजाब राज्य कृषीच्या बाबतीत देशामध्ये अग्रगण्य आहे. तेथील शासनाच्या पणन महासंघामार्फत कृषीमालावर अत्याधुनिक पद्धतीने प्रक्रिया

केली जाते. पंजाबने केलेल्या ब्रँडिंगच्या पद्धतीचा उपयोग महाराष्ट्रातील कृषिप्रक्रिया व ब्रँडिंग करण्यासाठी होईल.

## नॅसकॉम संस्थेसोबत सामंजस्य करार

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील नामवंत संस्था नॅशनल असोसिएशन ऑफ सर्विसेस अँड सॉफ्टवेर कंपनी म्हणजे नॅसकॉमसोबत राज्यशासनाच्या उद्योग विभागाने पाच वर्षांसाठी सामंजस्य करार केला आहे. या करारानुसार नॅसकॉमची 'टेक्नोलॉजी अँड लीडरशिप फोरम' ही परिषद पुढील पाच वर्षांसाठी महाराष्ट्रात होणार आहे. या परिषदेच्या माध्यमातून जागतिक गुंतवणूकदार राज्यात आकर्षित होणार आहेत.

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात राज्य अग्रेसर राहण्यासाठी नॅसकॉम सोबत झालेला करार महत्त्वपूर्ण असून यामुळे राज्यातील माहिती तंत्रज्ञानाशी निगडित उद्योगांना चालना मिळेल.

## महाराष्ट्रात 'होलटेक' प्रकल्प

अणुऊर्जा प्रकल्पांमध्ये इंधन साठवणूक आणि ऊर्जा वहनासह विविध उद्दिष्टांसाठी लागणाऱ्या उपकरणांसह इतर सामग्री पुरवण्यामध्ये जगप्रसिद्ध असलेल्या होलटेक इंटरनॅशनल या कंपनीने महाराष्ट्रामध्ये अणुऊर्जा प्रकल्पांसाठी लागणारी उच्च दर्जाची सामग्री उत्पादित करणारा प्रकल्प उभारण्याची तयारी दर्शवली आहे. त्यासाठी शासनाने होलटेक कंपनीसमवेत सामंजस्य करार केला आहे. यामुळे अणुऊर्जा साधनांचे उत्पादन करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरणार आहे. होलटेक इंटरनॅशनल ही ऊर्जा तंत्रज्ञान क्षेत्रातील विशेषत: अणुऊर्जा क्षेत्राशी निगडित कंपनी आहे. आजवर जगात ६ खंडांमध्ये मिळून ३५ देशांतील २०० पेक्षा जास्त अणुऊर्जा प्रकल्पांना या कंपनीने सुटे भाग पुरविले आहेत.

या सामंजस्य करारानुसार, हा प्रकल्प उभारण्यासाठी महाराष्ट्रामध्ये कंपनीकडून ६८० दशलक्ष अमेरिकन डॉलर्स (सुमारे ४ हजार ८०० कोटी रुपये) गुंतवणूक होणे अपेक्षित आहे. होलटेक कंपनीच्या अमेरिकेतील प्रकल्पासारखाच हा प्रकल्प असेल. ऊर्जा आणि प्रक्रिया, एरोस्पेस, पेट्रोकेमिकल आणि इतर क्षेत्रातील कंपन्यांना संयंत्रांची निर्मिती करताना लागणाऱ्या अवजड सुट्या भागांची निर्मिती करण्यासाठी हा प्रकल्प उभारला जाणार आहे. यासाठी राज्य सरकारकडून आवश्यक आणि योग्य ते सहकार्य पुरवले जाईल. यामध्ये प्रकल्प उभारणीसाठी लागणाऱ्या मंजुऱ्या–परवानग्या एक खिडकी योजनेतून सुलभरीत्या देण्यात येणार आहेत. प्रकल्पासाठी नियोजित गुंतवणुकीला राज्य सरकारच्या विविध धोरणे आणि नियमांनुसार प्रोत्साहन आणि सुविधा पुरवण्यात येतील.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योगमंत्री सुभाष देसाई यांच्या उपस्थितीत होल्टेक प्रकल्पासाठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली.

## इमारतींच्या वीज बचतीसाठी करार

गॅसवर आधारित ट्रायजनरेशन ऊर्जानिर्मिती करून वीजबचत व संसाधन संवर्धनासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत राज्य शासनाच्या विविध विभागांनी केंद्र शासनाच्या एनर्जी एफिशिएन्सी सर्व्हिसेस लिमिटेडबरोबर सामंजस्य करार केला. यामुळे मोठ्या प्रमाणावर ऊर्जा बचत होणार असून, त्यावरील खर्चही कमी होण्यास मदत होणार आहे.

जे. जे. हॉस्पिटल व बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई येथील इमारतींमध्ये ऊर्जा उपकरणांसाठी वैद्यकीय शिक्षण विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाबरोबर तर आमदार निवास व राज्यातील शासकीय विश्रामगृहांसाठी सामान्य प्रशासन विभाग (राजशिष्टाचार) यांच्यासोबत, आदिवासी विभागाच्या वसतिगृहांसाठी आदिवासी विकास विभाग यांच्याबरोबर ईईएसएलने सामंजस्य करार केला आहे.

ट्रायजनरेशन या तंत्रज्ञानामध्ये उष्णता निर्माण करणे, थंड करणे आणि ऊर्जा निर्मिती करणे या प्रक्रिया एकाचवेळी घडत असतात. ट्रायजनरेशनसाठी सर्वात स्वच्छ जळाऊ हायड्रोकार्बन म्हणून उपलब्ध असणारे गॅस हे इंधन वापरले जाते. या तंत्रज्ञानाच्या वापराने कोळसा इंधनावर आधारित पारंपरिक ऊर्जा निर्मिती प्रकल्पावरील अवलंबित्व कमी करता येईल.

**पंचायत राज प्रशासन आणि विकास कार्यात उत्कृष्ट काम केल्याबद्दल यशवंत पंचायत राज अभियानात सांगली जिल्हा परिषद राज्यात सर्वोत्कृष्ट ठरली आहे. २०१६-१७ साठी हा बहुमान मिळाला आहे. जिल्हा परिषदेच्या सर्वच विभागांनी उत्कृष्ट कामगिरी करत योगदान दिले. पंचायत समित्यांमध्ये शिराळा पंचायत समितीने राज्यात तृतीय क्रमांक आणि आटपाडी पंचायत समितीने पुणे विभागीय स्तरावर तृतीय क्रमांक पटकावला.**

# सांगली सर्वोत्कृष्ट

सर्वांगीण ग्रामीण विकासात जिल्हा परिषदेची भूमिका महत्त्वपूर्ण ठरते. जितक्या दूरदृष्टीने जिल्हा परिषद कार्य करेल; विकासाची फळे तितकीच तळागाळातील, ग्रामीण वर्गापर्यंत पोहोचतील. याची जाणीव ठेवत शासनाच्या




विविध योजना प्रभावीपणे राबवत सांगली जिल्हा परिषद अव्वल ठरली.

सांगली जिल्हा परिषदेने नावीन्यपूर्ण योजना राबवल्या. संगणकीकरण, ग्रामविकासाचे कार्यक्रम यातील कामगिरीचीही दखल घेत, जिल्हा परिषदेच्या शिरपेचात हा मानाचा तुरा खोवला गेला, त्यासाठी सांगली जिल्हा परिषदेला ३० लाख रुपयांचे बक्षीस मिळाले. यापूर्वीही यशवंत पंचायत राज अभियानात सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी सांगली जिल्हा परिषदेने २००५-०६ राज्यस्तरावर प्रथम आणि २०१२-१३ या वर्षांसाठी राज्यस्तरावर द्वितीय असा बहुमान पटकावला होता.

जिल्हा परिषदेस २००८ साली आयएसओ मानांकन मिळाले आहे. सांगली जिल्हा परिषदेने नेहमीच वैविध्यपूर्ण कामगिरी केली. स्वच्छ भारत अभियानांतर्गत जिल्हा हागणदारीमुक्त झाल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ज्येष्ठ अभिनेते व या अभियानाचे ब्रँड अम्बॅसिडर अमिताभ बच्चन यांच्याहस्ते जिल्हा परिषदेचा गौरव करण्यात आला. या अभियानांतर्गत स्वच्छता दर्पण रँकिंगमध्ये देशामध्ये प्रथम आल्याबद्दल केंद्रीय राज्यमंत्री एस. एस. अहलुवालिया यांच्या हस्ते गत वर्षी सन्मान करण्यात आला.

## दिव्यांगांसाठी विशेष कार्यक्रम

जिल्हा परिषदेने दिव्यांगांसाठी नावीन्यपूर्ण उपक्रम हाती घेतला. दिव्यांग मित्र अभियानांतर्गत जिल्ह्यात ३५ हजार दिव्यांगांची ऑनलाइन नोंदणी करण्यात आली. प्रथम टप्प्यात दिव्यांगांची सिव्हिल हॉस्पिटल सांगली व मिरज येथे तपासणी करून त्यांना अपंगत्व प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सुरू आहे. आतापर्यंत १ हजार २५७ लाभार्थींना प्रमाणपत्र देण्यात आले. याशिवाय तालुकानिहाय शिबिरांचे आयोजन करून १२ हजार लाभार्थींची तपासणी करण्यात आली. यापैकी ७,७०० लाभार्थींना दिव्यांग साहित्यासाठी पात्र ठरविण्यात आले. या लाभार्थींना लवकरच दिव्यांग साहित्याचे मोफत वाटप करण्यात येणार आहे.

त्याचबरोबर अपंग (दिव्यांग) कल्याण आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अंतर्गत असलेल्या व जिल्हा समाजकल्याण कार्यालय, सांगली नियंत्रित शासकीय अपंग बालगृह व शाळा मिरज या संस्थेस आय.एस.ओ. मानांकन प्राप्त झाले आहे. दिव्यांग व अव्यंग विवाह प्रोत्साहन अनुदान योजनेंतर्गत विवाह केलेल्या २६ जोडप्यांचा सत्कार करण्यात आला.

शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी बाल भवन विज्ञान केंद्र हा उपक्रम सांगली जिल्ह्यात राबवण्यात आला. अनेक प्राथमिक शाळा तसेच, अंगणवाड्या आयएसओ मानांकन प्राप्त झाल्या आहेत. आरोग्य विभागामार्फत राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमातून अनेक विद्यार्थी बालकांवर हृदय शस्त्रक्रिया करण्यात आल्या.


**वर्षा पाटोळे**

जिल्हा माहिती अधिकारी, सांगली

# ग्रंथसंपदा

## माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाची दर्जेदार व संग्रहणीय ग्रंथसंपदा





### महाराष्ट्र वार्षिकी

किंमत रु. २५०





### Magnificent Maharashtra

किंमत रु. २००




### महाराष्ट्र आणि महात्मा गांधी

किंमत रु. २००




### महामानव

किंमत रु. १००

ही पुस्तके सर्व जिल्हा माहिती कार्यालयांमध्ये उपलब्ध

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन**

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month




Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

**प्रति/TO**

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

मीनल जोगळेकर
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक मीनल जोगळेकर, वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी डिलिजंट मीडिया कॉर्पोरेशन लि., प्लॉट नं. ईएल /२०१, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, महापे, नवी मुंबई - ४०० ७०४ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: ब्रिजेश सिंह